म. ग्रं. सं. ठाणें
विषय भासाव्याक
सं. क्र. 23

REFBK-0006555
REFBK-0006555

म. ग्र. स. ठाणे
विषय भाषा व्याकरण
क्र. नं. २३

प्राथमिक शाळेंत

# मराठी भाषा कशी शिकवावी?

लेखक :
वासुदेव दामोदर गोखले,
एम्. ए., बी. टी.
व्हाईस प्रिन्सिपॉल, गांधी ट्रेनिंग कॉलेज, पुणें.

जगताप पब्लिशिंग हाउस, पुणें

# अनुक्रमणिका


| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ भाषेची उत्पत्ति | ... | ... | १ |
| २ माणसांचे व्यवहार व भाषा | ... | ... | ७ |
| ३ मातृभाषा | ... | ... | ११ |
| ४ मराठी भाषेचा कुलवृत्तांत | ... | ... | १७ |
| ५ मूल भाषा कशी शिकतें ? | ... | ... | २३ |
| ६ भाषाशिक्षणाचीं मूलतत्त्वें | ... | ... | २८ |
| ७ तोंडी काम ( निवेदन ) | ... | ... | ३४ |
| ८ निवेदनाचीं साधनें | ... | ... | ३९ |
| ९ गोष्ट कशी सांगावी | ... | ... | ४४ |
| १० वाचनाचा आरंभ | ... | ... | ४७ |
| ११ लेखनाचा आरंभ | ... | ... | ५३ |
| १२ वाङ्मय, वाङ्मयप्रकार व क्रमिक पुस्तकें | | ... | ५७ |
| १३ गद्याचें अध्यापन | ... | ... | ६२ |
| १४ काव्याचें अध्यापन | ... | ... | ६८ |
| १५ वाचन व त्याचे प्रकार | ... | ... | ७४ |
| १६ व्याकरणाचें अध्यापन | ... | ... | ७६ |
| १७ लेखी काम ( प्रबंधन ) | ... | ... | ८१ |
| १८ लेखी काम कसें तपासावें ? | ... | ... | ८७ |
| परिशिष्ट १ लें ... भाषाशिक्षणांतील विविध क्रीडा | | ... | ९० |
| परिशिष्ट २ रें ... नमुन्याचे पाठ | ... | ... | ९२ |

शिक्षक मासिक प्रकाशन

प्राथमिक शाळेंत

# मराठी भाषा कशी शिकवावी ?


: लेखक :

वासुदेव दामोदर गोखले,

एम्. ए., बी. टी.

व्हाईस प्रिन्सिपॉल, गांधी ट्रेनिंग कॉलेज, पुणे.



REFBK-0006555

REFBK-0006555



आळवणी ब्रदर्स,
बुकसेलर्स अँड स्टेशनर्स,

किं. १॥ रु.

सोलएजंट:–

आळवणी ब्रदर्स,

बुकसेलर्स अँड स्टेशनर्स

प्रकाशक—
ज. बा. जगताप, बी. ए. ( ऑनर्स ) बी. टी.
१२४८ शुक्रवार पेठ, पुणें शहर

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

मुद्रक—
विठ्ठल हरि बर्वे
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

# आविष्कार

१९३९ साल. जुलई महिन्याचा पहिला आठवडा. मुंबईतील ताराबाग इस्टेटमध्यें मी राहात होतों. त्यावेळीं सकाळीं ७ च्या सुमारास माझे मित्र डॉ. भालेराव खोलीवर आले. " अभिनंदन, वा. दा., ( माझे साहित्यिक मित्र मला वा. दा. याच नांवानें संबोधतात. ) झालां बुवा प्रिन्सिपाल ! ". डॉक्टरांच्या शब्दांचा मला अर्थच कळेना ! अभिनंदन कसलें, प्रिन्सिपाल कसला; सगळेंच अनपेक्षित !! हळूंच डॉक्टरनीं खिशांतील पत्र काढलें. आचार्य प्र. के. अत्रे यांचें पत्र होतें तें. पुण्याच्या नगरपालिकेनें ट्रेनिंग कॉलेज काढावयाचें ठरविलें होतें. प्रिन्सिपालची जागा मी स्वीकारावी अशी आचार्यांची इच्छा ! या योगायोगानें प्राथमिक शाळांशीं व प्राथमिक शिक्षकांशीं माझा जिव्हाळ्याचा संबंध जडला व अद्यापहि तो कायम आहे.

ट्रेनिंग कॉलेजमध्यें आल्यावर " भाषा " आणि " मानसशास्त्र " हे विषय माझ्याकडे आले. दोन्ही विषय माझ्या आवडीचे.

ट्रेनिंग कॉलेजांत शिक्षकांना पाठाचें मार्गदर्शन व अवेक्षण या गोष्टी ओघानेंच येतात. या गोष्टी करतांना आलेला अनुभव हाच प्रस्तुत पुस्तकाच्या मुळाशीं आहे. प्राथमिक शिक्षकांना या विषयाचें मार्गदर्शन व्हावें अशी किती तरी तीव्र इच्छा ! इतक्यांत बेळगांवच्या बी. टी. कॉलेजमधील प्राध्यापक श्री. स. रा. भट यांचें पत्र आलें. तें याच विषयावर बी. टी. कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठीं पुस्तक लिहिण्याच्या तयारींत होते. त्या पुस्तकाला पूर्णता यावी म्हणून प्राथमिक शाळेसंबंधींचा भाग मी लिहावा अशी त्यांनीं इच्छा व्यक्त केली होती. मी कबूलहि केलें. पण पुढें कांहीं कारणांमुळें प्रा. भटांनीं आपला बेत रद्द केला. माझ्या डोक्यांत मात्र पुस्तकाचा विचार सारखा घोळत होता व त्या दृष्टीनें अध्यापन–शाळेंत प्रयोगहि सुरू होते.

१९४२ सालीं पुणें नगरपालिकेनें " गांधी ट्रेनिंग कॉलेज " बंद केलें व पुण्याच्या श्रीशिवाजी मराठा सोसायटीच्या ताब्यांत दिलें. माझ्यावरील मुख्याध्यापकत्वाची जबाबदारी कमी झाली व " भाषाध्यापनाच्या " प्रयोगाकडे मी पूर्णतया लक्ष देऊं लागलों. श्रीशिवाजी मराठा प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. सर्जेराव जगताप व त्यांचे सहकारी या सर्वांनीं मोठ्या प्रेमानें या बाबतींत सहकार्य केलें. एकत्र बसून चर्चा झाल्या, निर्णय ठरले व ते अमलांत आणले. त्या सर्वांचा परिपाक म्हणजे प्रस्तुतचें पुस्तक होय.

माझें पुस्तक झालें ! पण या महागाईच्या काळांत तें छापतो कोण ? हीहि पण काळजी दूर झाली.

शिक्षक मासिकाचे संपादक मे. वा. ग. जगताप यांनीं या पुस्तकाचीं प्रकरणें क्रमशः आपल्या मासिकांतून प्रसिद्ध केलीं आणि " जगताप पब्लिशिंग हाऊस " चे चालक श्री. जयवंतराव जगताप यांनीं आतां हें पुस्तक संपूर्ण स्वरूपांत प्रकाशित केलें.

पुस्तक लिहितांना भाषाध्यापनविषयक अनेक इंग्रजी व मराठी पुस्तकांचा मला उपयोग झाला आहे. बी. टी. कॉलेजांत असतांना या विषयावर प्रा. बी. एम. मीमांसी; प्रा. बी. आर. कोलटकर यांनी सुंदर व्याख्यानें दिलीं होतीं. त्यांचीं टांचणें माझ्याकडे होतीं. त्यांचाहि या पुस्तकांत मी उपयोग करून घेतला आहे. वर उल्लेखिलेल्या सर्व व्यक्तींचे व ग्रंथकर्त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

हे भाषाविषयक प्रयोग चालू असतांना गांधी ट्रेनिंग कॉलेजमधील माझ्या प्रिय विद्यार्थ्यांनीं मला दिलेलें साहाय्य विसरणें शक्य नाहीं. त्यांचे आभार मानणें हें माझें कर्तव्य आहे.

प्राथमिक शाळेंतील शिक्षकांनीं या पुस्तकाचे सहानुभूतिपूर्वक पठन करावें, आवडेल तो भाग स्वीकारावा, नावडेल तो तसाच ठेवावा. अशी विनंति करून हें निवेदन संपवितों.

रामनवमी, पुणें.
१-४-४४

वा. दा. गोखले

★

शिक्षणमंदिराच्या पायांत दडून बसलेल्या परंतु अचेतन दगडांप्रमाणें न राहतां मुळांच्या स्वरूपानें शिक्षण–वृक्षास जीवन पुरविणाऱ्या माझ्या आवडत्या प्राथमिक शिक्षकबंधूंस हें पुस्तक आदरपूर्वक अर्पण केलें आहे.

—लेखक

★

## प्रकरण १ लें

# भाषेची उत्पत्ति

अगदीं बारीक एकपेशी जीव व अनेक पेशींचा बनलेला प्राणी हे एकाच सांखळीचे दुवे आहेत असें आपण समजतों. या सांखळीची सुरवात केव्हां झाली, कुठें झाली, कशी झाली, कां झाली हे प्रश्न जरी समाधानकारक रीतीनें अद्याप सुटलेले नाहींत, तरी या सांखळीचा आजचा शेवटचा दुवा म्हणजे मनुष्य होय असें विकासवाद सिद्ध करीत आहे व पुष्कळांना तें पटत आहे. मनुष्यरूपी हा दुवा विकास पावून, उत्क्रान्त होऊन त्यांतून पुढचा दुवा कोणत्या स्वरूपाचा निघणार हें भविष्यकाळ ठरवील. पण आज तरी मनुष्यप्राणी अधिक बुद्धिमान, अधिक कल्पक, अधिक ज्ञानी ठरला आहे. सर्व विद्यमान चराचर सृष्टीचा मालक होण्याची महत्त्वाकांक्षा तो उराशीं बाळगून राहिला आहे.

अनेक अवस्थांतून, अनेक स्थित्यंतरांतून, अनेक कोटी वर्षे प्रवास केल्यानंतर मनुष्य प्राण्यानें आपल्या कल्याणासाठीं कांहीं गोष्टींचा संचय केला असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. भाषा ही या संचितांपैकीं एक महत्त्वाची गोष्ट होय. भाषेचें सध्यांचें स्वरूप फारच पूर्णत्वास पोहोंचलेलें आहे. या पूर्ण स्वरूपावरून भाषेचें मूळ शोधून काढणें अशक्य आहे. त्या मूळावर आतां इतके लेप बसले आहेत, इतके संस्कार झाले आहेत, कीं तें मूळस्वरूपांत सांपडणेंच कठीण. असें असतांहि भाषेच्या उत्पत्तीविषयीं निरनिराळ्या पंडितांनीं, शास्त्रज्ञांनीं आपापलीं मतें मांडलीं आहेत.

भाषा हा शब्द भाष् म्हणजे बोलणें या धातूपासून बनला. बोलण्यांत निरनिराळ्या लहानमोठ्या ध्वनींचा समावेश होतो. हे ध्वनि मुखावाटे बाहेर पडण्यास कांहीं तरी कारण असावें लागतें. हें कारण म्हणजे मनुष्याचे मनांतील व्यापार होय. मनुष्याचे व्यापार चालू असतात, त्यावेळीं तो कसलाना कसला तरी विचार करतो. याच विचाराला ध्वनीच्या साहाय्यानें बाहेर वाट मिळते म्हणून कोणत्याहि भाषेचें अस्तित्व विचार आणि उच्चार यांवर अवलबून राहतें.

ध्वनि किंवा आवाज उत्पन्न करण्याची शक्ति ही जन्मतः उत्पन्न झालेली असते. मनुष्याप्रमाणें ती लहान मोठ्या प्राणीमात्रांतहि दिसून येते. ती सहज आहे. या ध्वनीचा उपयोग संकटाची सूचना देण्याकरितां, अगर भक्ष्यलाभ झाला असतां प्राणिमात्र मुख्यत्वें करतात. मुंगीसारखे क्षुद्रजंतू या बाबतींत मुखापाशीं असलेले स्पर्शतंतू उपयोगांत आणतात. सस्तन पशु व पक्षी ध्वनींच्या मदतीनें आपल्या वरील भावना व्यक्त करितात. पशुपक्ष्यांच्या आवाजाचे दोन, तीन व कांहींच्या बाबतींत दहा बारा प्रकार आहेत. त्या त्या प्रकाराचा आवाज तो तो प्राणी करूं शकतो व त्याच्या जातीचे पशु किंवा पक्षी तो आवाज ओळखूं शकतात व त्या आवाजांत सूचित केलेल्या भावनांप्रमाणें ते वागतात. इतर प्राण्यांप्रमाणेंच मनुष्याची आवाज करण्याची शक्ति उपजत आहे, परंतु मनुष्यानें या शक्तीला फारच निराळें स्वरूप दिलें आहे. किंबहुना मनुष्यामध्येंच या ध्वनिशक्तीला पूर्णता प्राप्त झाली आहे, कारण आवाज उत्पन्न होण्याचें मानवी इंद्रिय इतर प्राण्यांच्या त्या इंद्रियापेक्षां अधिक विकास पावलेलें आहे. दुसरें असें कीं मनुष्याचा सामाजिक व्यवहार इतर प्राण्यांच्या व्यवहारापेक्षां अधिक विस्तृत व गुंतागुंतीचा आहे. मनुष्याचे मनोव्यापारहि विविधप्रकारचे असतात. या तीन गोष्टी ध्यानांत ठेवल्या म्हणजे मानवानें आपल्या जन्मजात अशा ध्वनिशक्तींत कां विकास घडवून आणला हें सहज ध्यानांत येईल.

या सृष्टीच्या घडामोडींत जे मनुष्यप्राणी प्रथम उत्पन्न झाले, त्यांचें वर्तन इतर प्राण्यांसारखेंच असलें पाहिजे. परंतु विचार करण्याची शक्ति ही मनुष्याकडे अधिक होती. या शक्तीच्याच जोरावर त्यानें आपणाला होणारे सुखदुःख दुसऱ्याला समजावून देण्याचा प्रयत्न केला असावा. किंबहुना आपलीं सुखदुःखें व्यक्त करतांना पहिल्या मानवांनीं जे आवाज काढले असतील, ज्या किंकाळ्या फोडल्या असतील, तेच आवाज, त्याच किंकाळ्या हीं भाषेच्या उगमस्थानीं आहेत असें विकासवादाचे पुरस्कर्ते आज आग्रहानें सांगत आहेत. वास्तविक मनांतील विचार किंवा भावना दुसऱ्यांस कळविण्याचीं मानवांजवळ अनेक साधनें आहेत. हातापायांच्या हालचालींनीं वरील गोष्टी व्यक्त करतां येतील, तसेंच चेहऱ्यावरील फरकांनींहि ही गोष्ट करणें शक्य आहे. प्रसंगवशात् चित्रें, आकृति काढूनहि मानवांनीं आपलें मनोगत व्यक्त केलें असेल आवाज म्हणजेच तोंडांतून शब्द काढून आपल्या कल्पना आपण दुसऱ्यांस कळवित

आहोंतच. हावभाव, चेहेऱ्यावरील फरक, चित्रें आणि मुखांतून निघालेला आवाज यांपैकीं कोणत्या मार्गाचा अवलंब पहिल्या मानवांनीं केला, केव्हां केला हें ठरविणें अशक्य आहे. पहिल्या पहिल्यांदा वरील सर्व साधनांचा उपयोग झालाहि असेल. परंतु अगदीं प्राथमिक अवस्थेंत हातपायांच्या हावभावांना प्राधान्य देण्यांत आलें असावें. कारण करपल्लवी भाषा रानटी लोकांत अद्यापीहि वापरण्यांत येते. परंतु परिणाम व उपयोग या दृष्टीनें आवाज करणें ही गोष्ट अधिक सुलभ जावी व मनांतील विचार, भावना, कल्पना बाहेर प्रकट करण्याचें प्रमुख साधन म्हणजे आवाज हें निश्चित व्हावें ही गोष्ट क्रमप्राप्त ठरते.

अशा रीतीनें आपल्या बुद्धीच्या जोरावर मनुष्यानें आपल्या ध्वनिशक्तीचा उपयोग करण्याचें ठरविलें. मानवी व्यवहार सुरू झाले. माणसें एकत्र येऊं लागलीं, एकमेकाशीं बोलूं लागलीं, भांडूं लागलीं, प्रेम करूं लागलीं; भूक, तहान, भीति, आशा, इच्छा, सुख, दुःख इत्यादि भावना व्यक्त होऊं लागल्या. हळू हळू या गोष्टी व्यक्त करतांना होणारे आवाज निश्चित झाले. ते मानवांना करतां येऊं लागले व ते केल्यानंतर दुसऱ्यांना समजूं लागले. इतर प्राण्यांप्रमाणें मुळांत एकतानी असलेल्या आवाजांत विविधता आणि पुनरावृत्ति, कमी अधिक प्रमाणांत होणारे त्याचे ऱ्हस्व दीर्घ उच्चार हे मानवी भाषेचे पहिले प्रयत्न होत.

पुढें कित्येक शतकें गेल्यानंतर बुद्धिवान मानवांनीं अमुक स्थिति आली असतां एक विशिष्ट आवाज करावा, अमुक वस्तु किंवा प्राणी पाहिल्यावर एक विशिष्ट उच्चार करावा असें ठरवून व्यवहार अधिक सुकर केला असावा. अमुक वस्तूला अमुक म्हणावें, अमुक क्रियेला अमुक शब्द करावा असे संकेत तयार झाले. या भाषेच्या अवस्थेंत आवाजाला व्यवहाराला, उपयोगी पडेल असा अर्थ देण्याचा प्रयत्न झाला. वस्तु पाहिल्याबरोबर ध्वनि निघून वस्तु आणि ध्वनि यांचें साहचर्य साधलें गेलें. एकंदरींत भाषेच्या साहाय्यानें मानव आपलें जीवित अधिक सुखी, अधिक आनंददायक, अधिक सुरक्षित करूं लागला.

भाषेच्या जन्माचा हा शास्त्रीय इतिहास आहे. जुन्या काळांतहि भाषेच्या जन्माचा शोध करण्याचा प्रयत्न झाला. ज्या वेळीं एकाद्या गोष्टीचें कारण आपणांस समजत नाहीं, त्या वेळीं त्या गोष्टीचें जनकत्व आपण देवाकडे देतों. आपल्या धर्मग्रंथांतहि भाषा ईश्वरनिर्मित आहे असे उल्लेख आहेत. देवाला

पुष्कळ होण्याची इच्छा झाली, त्यानें प्रत्येक वस्तूंत आपला अंश घातला व सर्व सृष्टीची उभारणी केली. सर्व वस्तूंच्या अगोदर भाषेची उत्पत्ति झाली आणि तिनें सर्व वस्तूंना नांवें दिलीं अशा प्रकारचें वर्णन वेदांत आढळतें.

ईश्वरानें ॲडम हा पहिला मनुष्य उत्पन्न केला, त्याच्या उपयोगासाठीं ईश्वरानें सुंदर भाषा त्याला दिली. मूळांत एकच भाषा होती. बाबेल येथें पृथ्वीवरील सर्व भाषांचा घोटाळा होऊं लागला. देवानें त्या निरनिराळ्या देशांत फेंकल्या. अशा तऱ्हेनें ख्रिश्चन धर्मांत भाषेची कथा दिली आहे.

सांप्रतच्या सुधारलेल्या जगांत वरील उत्पत्ति हास्यास्पद ठरल्या तर कांहीं आश्चर्य नाहीं. देवावरील आत्यंतिक श्रद्धेनें मनुष्य अनेक कल्पना रंगवितो, त्यापैकींच भाषेच्या जन्माविषयींची वरील कल्पित चित्रें आहेत.

या सृष्टींत जन्माला आलेल्या पहिल्या मानवांनीं एकत्र जमून शब्द तयार केले व कांहीं नियम ठरवून भाषेची सुरवात केली असें कांहीं लोकांचें मत आहे. यांतील " एकत्र जमून शब्द तयार केले " या विधानाबद्दल शंका येते. मानवी व्यवहार चालू झाला, कांहीं गोष्टींची पुनरावृत्ति होत गेली व त्यायोगें संकेत ठरत गेले हें अधिक सयुक्तिक वाटतें. दुसरें असें कीं, कायदा व आचरण याबद्दलचे नियम तयार करणें व्यवहाराला धरून आहे, परंतु अमुक तऱ्हेचा आवाज अमुक वेळीं कर अशी सक्ति कितीशी बंधनकारक होईल याबद्दल शंका व्यक्त करण्यांत येते. एकंदरींत सभा भरवून संकेत व नियम ठरविले असें मानण्यापेक्षां मानवी व्यवहाराबरोबर संकेत व नियम आपोआप ठरत गेले असें समजणें अधिक तर्कशुद्ध होईल.

भाषेच्या उत्पत्तीचें हें सर्व साधारण विवेचन झालें. आतां जगांतील प्रसिद्ध पंडितांनीं यासंबंधीं आपलीं काय मतें नमूद केलीं आहेत तीं आपण पाहूं.

प्राणिमात्रांच्या ठिकाणीं ज्या अनेक सहज प्रवृत्ति व वृत्ति आहेत, त्यापैकीं अनुकरण ही एक आहे. आपल्या आजूबाजूला नेहमीं वावरणारे मांजर, कुत्रा, कावळा, गाय इत्यादि प्राणी निरनिराळे आवाज करतात. त्या आवाजाचें अनुकरण करून तो अनुकरणात्मक शब्द त्या प्राण्याच्या बाबतींत लहान मुलें वापरतात. हम्मा म्हणजे गाय, भो भो म्हणजे कुत्रा, काव् काव् म्हणजे कावळा, म्यॉंव म्हणजे मांजर हे बालभाषेंतील शब्द वरील विधानास पुष्टि देतात. नामांच्या बाबतींत हा नियम जसा लागू पडतो, तसा क्रियावाचक शब्दांसहि तो लागू होतो.

टरकणें, बोंबलणें, मुसमुसणें, तणतणणें, झिमझिमणें वगैरे कित्येक शब्दांत ध्वनींचें अनुकरण स्पष्ट होतें. प्रत्येक शब्दाला कांहींना कांहीं नाद, आवाज आहे. शब्दानें सूचित केलेल्या पदार्थाकडून जी क्रिया होते, त्या क्रियेचा दर्शक तो शब्द होतो. म्हणून भाषेची उत्पत्ति व वाढ याबाबतींत वरील सिद्धान्त लागू पडतो. यालाच " अनुकरण सिद्धान्त " असें म्हणतात.

परंतु वरील सिद्धान्तानें भाषेंतील सर्वच शब्दांची उपपत्ति लागत नाहीं. प्राण्याच्या स्वराचें अनुकरण करणें शक्य आहे. निर्जीव, अचेतन पदार्थांचीं नांवें कशीं सिद्ध होतील ? त्याचप्रमाणें भय, भूक, तहान, सुख, दुःख इत्यादि भावनांचें काय ? ती ती भावना दाखविणारे शब्द कसे तयार झाले ? हे आक्षेप अनुकरण सिद्धान्तावर घेण्यांत येतात. या लोकांच्या मतें भावना व भावना उचंबळून आल्यानंतर मुखावाटे होणारे ती ती भावना दाखविणारे शब्द यांत भाषेचा उगम आहे. अबब, अरेरे, छी, छे, छि, इत्यादि उद्गारवाचक शब्दच भाषेच्या उत्पत्तीच्या मुळाशीं आहेत. म्हणून भावनेच्या उत्कटतेनें उत्पन्न होणाऱ्या शब्दांत भाषा जन्मते असे " भावनामय उद्गार सिद्धान्त " प्रतिपादणाऱ्या पंडितांचें मत आहे.

पहिला मानव समाज एकत्र जमून, त्यानें एकत्र मिळून आनंद व्यक्त करण्यासाठीं, अगर सांघिक कामाच्या वेळीं श्रम हलका होण्यासाठीं गायन स्वरूपाची जी स्वरमालिका तयार केली असेल त्यावरून भाषा निर्माण झाली असें कांहीं भाषाशास्त्रज्ञ मानतात. हल्लीं सुद्धां शेतांत राबणारे शेतकरी, त्यांच्या स्त्रिया, इमारत बांधणारे कामगार आपापलीं कामें व्हावीं, श्रम हलके व्हावे म्हणून गाणीं गातांना आपल्या दृष्टीस पडतात.

भाषेच्या जन्माची आणखी एक मनोरंजक कहाणी सांगण्यांत येते. एकमेकां-बद्दल आकर्षण वाटणें ही प्राणिमात्रांत एक सहज वृत्ति आहे. मनुष्य तर या वृत्तींचें मोठेंच प्रदर्शन करतो. आपल्या आवडत्या व्यक्तीवरील आपणांस वाट-णारा आपलेपणा किंवा प्रेम दाखविण्याचा मनुष्य सारखा प्रयत्न करीत असतो. या प्रदर्शनाच्यावेळीं तो नाचतो, गातो, बागडतो, उड्या मारतो, काय वाटेल ते थेर करतो. त्याला त्यावेळीं इतर गोष्टींचें भानच राहात नाहीं. आपलें प्रेम व्यक्त करतांना तो ध्वनीचा भरपूर उपयोग करतो. या ध्वनीची म्हणजेच भाषेची आवश्यकता त्यावेळीं मनुष्याला पटते. याच प्रेमाच्या गुणगुण्यांत

किंवा प्रेम व्यक्तीच्या आराधनेंत प्रकट होणाऱ्या तालबद्ध स्वरांत भाषेचें पहिलें स्वरूप दिसतें असें या लोकांचें म्हणणें आहे.

वरील सिद्धान्ताशिवाय मानसशास्त्रदृष्ट्या आणखी एक प्रकारें भाषेची उत्पत्ति सांगण्यांत येते. मुलाची मानसिक व शारीरिक वाढ ही त्यांच्या सहजवृत्तींवर अवलंबून असते. सहानुभूति, सूचना, अनुकरण, क्रीडा इत्यादि सहज वृत्ति मानवांना फार उपयुक्त आहेत. या सर्वांत क्रीडा-वृत्ति फार महत्त्वाची व उपयुक्त आहे. लहान मूल कधींहि स्वस्थ बसलेलें दिसावयाचें नाहीं. त्याच्या हातपायांची सारखी हालचाल चाललेली असा-वयाची, तोंडानें कांहींतरी फुरफुरण्यासारखे आवाज निघत असावयाचे. या सर्व क्रिया करण्याची शक्ति मुलांना उपजतच मिळालेली असते. या क्रियांनींच मुलांची वाढ होते ही जी मुलांमधें जन्मजात क्रीडेची शक्ति असते ती अमर्यादित असते. या शक्तीच्या जोरावरच मूल तोंडानें विविध स्वर उच्चारूं शकतें. या उच्चारांत भाषेचें मूळ आहे असें समजण्यांत येतें.

भाषेच्या उत्पत्तीबद्दल मोठमोठ्या पंडितांनीं वरीलप्रमाणें आपले सिद्धान्त मांडले आहेत. वरील पैकीं कोणत्याहि एकानें भाषेची उत्पत्ति सर्वतोपरी लागत नसल्यानें सर्व सिद्धान्तांतील सत्य एकत्र करून मनाचें समाधान करावें लागतें. एवढें मात्र खरें कीं आवाजाची शक्ति सर्व प्राण्यांत जन्मजात असून मानवानें मात्र त्या शक्तीचा आत्मरक्षणासाठीं व जातिरक्षणासाठीं पुरेपुर उपयोग करून घेतला आहे. भाषा ही जशी मानवसमाजावर आधारलेली आहे, त्याचप्रमाणें मानव समाजहि आज भाषेवर अवलंबून आहे. मानव आणि भाषा हीं अन्योन्याश्रयी आहेत. भाषा हें मानव जातीचें वैशिष्ट्यच आहे. ती मानव समाजावर सर्वस्वी अवलंबून असल्यामुळें माणसाप्रमाणेंच तिलाहि सर्व विकार आहेत. अस्तित्व, जन्म, वाढ, विपरिणाम ( विकास ), क्षय व नाश हे सर्व विकार भाषेला लागू पडतात. मानवी प्राण्यांच्या विकासांत अनेक मानवी समाज उत्पन्न झाले, उत्कर्ष पावले, नाशास गेले, त्याचप्रमाणें आतांपर्यंत अनेक भाषा-म्हणजे त्या त्या समाजानें त्या त्या वेळीं ठरविलेले संकेत — उत्पन्न झाल्या, उत्कर्ष पावल्या, शेवटीं नाहींशा झाल्या. मात्र या भाषेनें मनुष्यावर अगणित उपकार करून ठेविले आहेत, यांत शंका नाहीं.

## प्रकरण २ रें

# माणसांचे व्यवहार व भाषा

मनुष्य आणि इतर प्राणी यांमधील एक मुख्य फरक म्हणजे मनुष्याची भाषा हा होय. आपल्या विचारशक्तीच्या जोरावर मानवांनीं भाषा बनविली व त्यायोगें आपली सुधारणा घडवून आणली. भाषा मुळींच अस्तित्वांत आली नसती, तर मनुष्य आणि पशु यांचा जीवितक्रम जवळ जवळ सारखाच राहिला असता. मनुष्याला बुद्धीची देणगी स्वभावतः मिळाली. बुद्धीचें कार्य विचार, या विचाराला भाषेमुळेंच चांगलें स्वरूप प्राप्त झालें. जन्मानेंच मुके व बहिरे असलेले लोक आपलें मनोगत हावभावांनीं व मुद्रेवरील फरकांनीं सांगूं शकतात हें खरें, परंतु दररोजच्या साध्यासुध्या व्यवहारांतील त्यांचें म्हणणें दुसऱ्यांस कसें तरी समजतें. पण एखादा कठीण प्रश्न सोडविण्याचे वेळीं मुक्या बहिऱ्यांचे हावभाव आणि मुद्राविचार लुळे पडतात. आपल्या अगदीं लहानपणांतील महत्त्वाचे प्रसंगही आपण आठवूं शकत नाहीं, याचेंहि मुख्य कारण ते प्रसंग घडतात त्यावेळीं आपणांस भाषा येत नसते. हें भाषाविषयक मत आतां बहुतेक शास्त्रज्ञांना आज संमत होत आहे.


भाषा उत्पन्न होण्यापूर्वींच मानवांना विचारशक्ति मिळालेली होती हें खरें असलें तरी भाषा बनली गेल्यावर ही विचारशक्ति विकास पावत चालली. आज तर आपण शब्दांशिवाय विचार करूंच शकत नाहीं. कोणत्याही बारीक सारीक अगर मोठ्या महत्त्वाच्या गोष्टीविषयीं आपण मनांत चिंतन करतों, त्यावेळची आपल्या मनाची स्थिति आठविण्याचा आपण प्रयत्न करूं. आपणांस खात्रीनें आढळून येतें कीं, मनांतल्या मनांत आपण त्या गोष्टीविषयीं शब्दांच्या साहाय्यानें विवेचन किंवा वादविवाद करीत असतों. आणि शेवटीं जो निर्णय घेतों तोहि भाषेच्या स्वरूपांत मनांत ठेवून देतों. म्हणूनच शास्त्रज्ञ म्हणतात कीं, विचार म्हणजे स्वगत भाषण; आपण मनांतच स्वतःशींच बोलतों. म्हणून विचार प्रकट करण्याला ज्याप्रमाणें भाषा हें साधन मानण्यांत येतें, त्याप्रमाणेंच विचार करतांना सुद्धां भाषेची फार आवश्यकता लागते.

विचार करण्याचें भाषा हें साधन आहे. इतक्यानेंच भागत नाहीं, मनाचे व्यापार सुरू होण्याला कोणतीना कोणती सहजप्रवृत्ति कारणीभूत होते. या सहजप्रवृत्तीच्या जागृतीनें मनांत भावना निर्माण होतात, भावनांतूनच विचार सुरू होतात, व मनोव्यापारांत विचाराएवढेंच भावनांनाहि महत्त्व आहे. भाषा ही जशी विचाराला साहाय्य करते, तशी ती भावनांनाहि उपयोगी पडते. दुसऱ्यांच्या सुखदुःखाशीं आपण समरस होतों, ही जी सहानुभूतीची मानवी वृत्ति ती भाषेमुळेंच अस्तित्वांत येते. उपजत मुकें, बहिरे लोक

विचारांत मागासलेले दिसतात, त्याचप्रमाणें भावनेंतहि सर्वसाधारण माणसां-प्रमाणें उत्कटता दाखवूं शकत नाहीं.

व्यक्तीचे विचार आणि भावना या बाबतींत भाषा किती उपयोगी आहे, हें आपण पाहिलें. जो नियम व्यक्तीला लागू पडतो, तो व्यक्तींनीं बनलेल्या समाजाला लावतां येतो. समाजाला भाषेचें योग्य रीतीनें शिक्षण दिलें नाहीं, तर तो समाज बौद्धिक व नैतिक क्षेत्रांत प्रगति करूं शकत नाहीं.

वरील विवेचन ध्यानांत घेतलें म्हणजे भाषेचीं दोन स्वरूपें आपणांस दिसतात. एक भावना व्यक्त करणारी भाषा व दुसरी विचारांना, बुद्धीला चालना देणारी भाषा. या दोन स्वरूपांचे प्रत्येकीं दोन भाग पडतात. भावना किंवा विचार प्रकट—आविष्करण करणारी आणि दुसऱ्यांच्या भावना किंवा दुसऱ्यांचे विचार स्वीकारणारी-ग्रहण करणारी भाषा; आविष्करण हें बोलण्यानें अगर लेखनानें शक्य होतें, ग्रहणासाठीं श्रवण (दुसरा सांगतो तें ऐकणें) व वाचन यांचा उपयोग होतो. त्यांतहि बोलणें अगर लिहिणें या क्रियांना प्रत्येकीं दोन हेतु असतात. केव्हां केव्हां आपण दुसऱ्यांना समजावें म्हणून बोलतों किंवा लिहितों, तर मधून मधून आपण स्वतःशींच बोलतों किंवा स्वतःच्या समाधानासाठीं लिहितों. वरील सर्व प्रकार कोष्टक रूपानें मांडतां येतील:—




*स्वनिवेदनांत स्वतांशीं शपथ घेणें, मनांतील बोलणें, दिनचर्या लिहिणें इत्यादि गोष्टी येतात.

भाषेला व्यक्तीच्या आणि समाजाच्या जीवनक्रमांत किती महत्त्वाचें स्थान आहे, हें आतांपर्यंतच्या विवेचनावरून चांगलें लक्षांत येईल. भाषेच्या उपयुक्ततेचा आणखी एक महत्त्वाचा विचार सांगण्यासारखा आहे.

प्राण्यांच्या ठिकाणीं जन्मजात अशा कांहीं प्रवृत्ति आहेत. या प्रवृत्तींची जास्तींत जास्त संख्या मनुष्यांत दिसून येते, आणि त्यामुळेंच इतर पशुपक्षांपेक्षां मनुष्य श्रेष्ठ ठरतो. या प्रवृत्तींतील कांहींच्या साहाय्यानें मनुष्य आपल्या इतर बांधवांकडून उपयुक्त गोष्टी अनायासें शिकतो. मानवी समाजांतून परंपरागत आलेलें ज्ञान, शहाणपण, कलाकौशल्य आत्मसात् करण्याची मानवाची शक्ति अलौकिक आहे. मनुष्याच्या सुधारणेचा उगम याच शक्तींत दिसून येतो. भाषेमुळें अर्थातच शिकण्याची क्रिया सुलभ झाली म्हणून मानवी सुधारणेला भाषेनें फारच मोठा हातभार लावला असें म्हणावें लागतें. एका पिढीचे अनुभव भाषेमुळें दुसऱ्या पिढीला सुलभ होतात. आणि याचा अनुभव परंपरेंतून माणसांचा मानसिक व शारीरिक विकास होत जातो. बुद्धीची उपजतच जोड मिळालेली कांहीं अर्भकें मनुष्यसमाजापासून पूर्णत्वानें अलिप्त ठेवलीं, तर त्यांची वाढ व प्रगति किती व कशी होईल हें निश्चित सांगतां आलें नाहीं. तरी परंपरेनें सुलभत्वानें ज्ञान मिळालेल्या मुलांपेक्षां अशीं मुलें विचारशक्तींत मागासलेलीं राहतील यांत शंका नाहीं.

मागील पिढ्यांचें ज्ञान, संस्कृति, कलाकौशल्य भाषेच्या साहाय्यानें अल्पश्रमांत मिळवितां आल्यामुळें मनुष्याचा श्रमभार फारच हलका झाला. मूल जो शब्द शिकतें त्या प्रत्येक शब्दांत कितीतरी पिढ्यांचा अनुभव सांठलेला असतो. पदार्थांचीं नांवें—नामें ओळखतां आलीं म्हणजे अल्पकाळांत हजारों वस्तूंचे ठसे मुलांच्या मनांत कायमचे उमटतात. सामान्यनामांच्या ओळखीनें सजीव-निर्जीव वस्तूंची सहजच वर्गवारी करतां येतें. क्रियावाचक शब्दांनीं क्रियेचा व स्थितीचा तावडतोब बोध होतो. विशेषणें आणि क्रियाविशेषणें वस्तूंचे व क्रियेचे गुणधर्म सांगतात. शब्दयोगी अव्ययांनीं शब्दांचे स्थलकालवाचक संबंध, पौर्वापर्य, संयोगवियोग यांची स्पष्टता येतें. अशा रीतीनें मानवांचे बाह्य जगाशीं हरघडी येणारे संबंध भाषेमुळें व्यक्त झाले म्हणजे मानवांचे अनुभव विविधप्रकारें वाढत राहतात. अनुभवाच्या वाढीबरोबर बुद्धीचा विकास होत जातो.

नैतिक क्षेत्रांतहि मनुष्याचें श्रेष्ठत्व भाषेमुळेंच प्रस्थापित झालें आहे.

आत्मसंयमन, स्वार्थत्याग, पावित्र्य, शान्ति इत्यादि दैवी गुण संपादन करूं इच्छिणाऱ्या माणसास परंपरागत संस्कृतीचें फार साहाय्य होतें. ही संस्कृति भाषेमुळेंच आपण आपलीशी करूं शकतों.

भाषेनें स्थळ आणि काळ या दोन्हींवर विजय मिळविला आहे. बोलल्या जाणाऱ्या भाषेनें दूरच्या माणसासही आपण आपले विचार व कल्पना समजावून देऊं शकतों. टेलिफोन, रेडिओ इत्यादि यंत्रांनीं तर हजारों मैलांवरचे दोन मानव एकत्र आणून सोडले आहेत. लेखी भाषा स्थलाची व त्याबरोबर कालाची पर्वा बाळगत नाहीं. मुद्रणकलेनें तर भाषेच्या लेखी स्वरूपाला चिरंजीव केलें आहे.

आज जगांतील सुधारलेल्या देशांत मानवी जीवित भाषेवरच सर्वस्वीं अवलंबून आहे. प्रत्येक देशांतील शिक्षणक्रमांत भाषाविषयाला प्रथम स्थान कां दिलें जातें याचें निराळें विवेचन करण्याची आतां आवश्यकता नाहीं.

शिक्षणांत भाषाविषयाची अनास्था झाल्यास, अनर्थ ओढवण्याचा संभव असतो. मुलांच्या भावना आणि विचार यांची योग्य वाढ होत नाहीं. मुलें आपलें मनोगत दुसऱ्यास योग्य तऱ्हेनें सांगूं शकत नाहीं. सामाजिक ऐक्य आणि स्वास्थ हीं परस्पर विचारविनिमयावर आधारलेलीं असतात. भाषाशिक्षणाच्या अनास्थेमुळें एकमेकांशीं होणारा विचारविनिमय जर एकांगी होऊं लागला, तर आदर्श राष्ट्रीय भावना कशा निर्माण होतील ? समाजांतील व्यक्तींचे एकमेकांशीं होणारे विचार संक्रमण मातृभाषेच्या द्वारां होत असतें हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. अर्थात मातृभाषेच्या अध्ययनाला आणि अध्यापनाला शिक्षणक्रमांत तितकें अधिक महत्त्व, तितका तो समाज अधिक सुखी होतो. मानवी जीविताच्या वाढींत व प्रगतींत माते इतकीच भाषेचीहि जरूरी आहे, असें प्राज्ञ म्हणतात त्यांतील रहस्य हेंच आहे.

## प्रकरण ३ रें

# मातृभाषा

**" मराठी असें आमुची मायबोली ! "**

विचार आणि भावना यांच्या प्रकटनाला भाषेचा उपयोग फार होतो. आतांपर्यंत हजारों वर्षें मिळवून ठेवलेला मानवांचा अनुभवसंग्रह सहजासहजीं मिळाविण्याचें अत्यंत महत्त्वाचें साधन म्हणजे भाषा.

भाषा ही मानवांना मिळालेली ईश्वरदत्त देणगी आहे, असें पुष्कळांच्या तोंडून बाहेर पडणारें विधान आपण ऐकतों. पण विधानांत थोडीशी अशास्त्रीयता आहे. प्राणिमात्र जन्माला आला त्यावेळीं त्याच्याजंवळ सहज असलेली देणगी म्हणजे आवाज करण्याची शक्ति. या शक्तीला वाटल्यास ईश्वरदत्त म्हणावें. ही देणगी इतर प्राण्यांप्रमाणें मनुष्यांनाही प्राप्त झालेली आहे. या आवाज करण्याच्या शक्तींत भाषेचा उगम आहे हें निश्चित. पण ज्या समाजांत मूल वावरत असतें, त्या समाजांत भाषा बनविणारे जे "संकेत" (अमूक वस्तूंस अमुक म्हणावें इ० ) ठरलेलें असतात, ते संकेत मूल शिकतें व त्या समाजाची भाषा ती त्या मुलाची भाषा होते.याच भाषेला इतर भाषांहून वेगळें संबोधावें म्हणून त्या मुलाची " मातृभाषा " असें म्हणतात. मातृभाषा म्हणजे आईची भाषा असा सरळ अर्थ या ठिकाणीं तितकासा लागू पडत नाहीं. कारण मूल भाषा शिकतें तें फक्त आईकडूनच शिकतें असें नाहीं. इतरही समाजांतील अनेक घटक भाषा शिकतांना साहाय्य करणारे होतात. आजूबाजूचीं मुलें, घरचे चाकर-नोकर इत्यादिकांकडून मुलाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भाषा शिकविली जाते.

भाषेचें शिक्षण हें सभोंवतालच्या सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतें. मराठी बोलणारे आईबाप कामधंद्यासाठीं कानडी प्रांतांत जाऊन राहिलें तर त्यांचीं मुलें उत्तम कानडी बोलूं शकतात. इंग्रजी मातृभाषा असणाऱ्या मिशनरी लोकांचीं मुलें चांगल्या रीतीनें मराठी बोलतांना पुष्कळांनीं ऐकिलें असेल. म्हणून समाजाची भाषा ती त्या मुलाची मातृभाषा असें म्हणणें अधिक शास्त्रीय ठरेल.

मूल आपली मातृभाषा फार सुलभतेनें शिकतें. भाषाशिक्षणांत ही सुलभता कां उत्पन्न होते याचें विवेचन थोडेसें मनोरंजक होईल. यासंबंधीं अनेक विद्वानांनीं आपलीं मतें नमूद केलीं आहेत. लहान वयांत आपली वाणी उत्पन्न करणारें इंद्रिय हालचाल करण्यांत फार लवचिक असतें. हा लवचिकपणा पुढें राहात नाहीं. लहान मुलाचे कानहि फार तीक्ष्ण असतात, त्यामुळें कानाच्या द्वारां होणारे संस्कार अधिक टिकाऊ असतात. आजूबाजूच्या लोकांचे निरानिराळे शब्द मूल ऐकतें व लगेच ते शब्द उच्चारण्याचा प्रयत्न मुलांकडून होतो. त्या शब्दाचा पुनरुच्चार झाल्यामुळें मेंदूवरील ठसे कायम राहातात. लहानपणीं शरीराच्या हालचालींशिवाय दुसरा कांहींच उद्योग मुलांना नसतो. म्हणून धांवपळ व आरडाओरड यांतच मुलें दंग असतात. आरडाओरडींत भाषा शिकण्याचा भाग येतोच. या वयांत मुलांची ग्रहणशक्तीहि अत्यंत तीव्र असते. ग्रहणाबरोबर धारणाहि आलीच. या सर्वांपेक्षां फार बलिष्ठ असें एक कारण आहे. मुलाला आपली मातृभाषा सारखी अष्टौप्रहर ऐकूं येते. भाषेच्या द्वारें व्यक्त होणाऱ्या वस्तू, व्यक्ति अगर प्रसंग--सर्वच्या सर्व त्याच्या समक्ष असतात. त्यामुळें श्रवण आणि नयन या इंद्रियांमार्फत होणारे संस्कार चिरंतन स्वरूपाचे होतात, इतकेंहि असून मुलांच्या बोलण्यांत होणाऱ्या चुका तावडतोब प्रेमळ माणसांकरवीं सुधारल्या जातात, शुद्ध शब्दाची अनेकदां पुनरावृत्ति करविण्यांत येते आणि या रीतीनें निसर्गसहज परिस्थितींत मूल आपली मातृभाषा शिकते व दोन तीन वर्षांच्या अवधींत आपल्या भावना आणि विचार भाषणद्वारां व्यक्त करण्याचें सामर्थ्य त्याचे ठिकाणीं उत्पन्न होतें. याच अवधींत त्याला "स्वत्वा"ची जाणीव होते. हें माझें, हें माझें नव्हें, हा फरक त्याला कळतो. ही माझी आई, हे माझे बाबा, हें माझें खेळणें, हा माझा पोषाक या "माझ्या, माझ्या"च्या यादींत हळूं हळूं भाषा, धर्म, देश याचा समावेश होऊं लागतो आणि स्वभाषा, स्वधर्म आणि स्वदेश यांच्या अभिनिवेशाला सुरुवात होते. लहान वयांत अन्तःकरणांत दृढ झालेली ही "स्व"ची त्रयी आमरण टिकते, व त्यांच्या बद्दलचें प्रेमही इतकें अगाध असतें कीं, आपली भाषा, आपला धर्म, आपला देश यांपैकीं एकालहि इवलीशी कोणी दुखापत केली तर मनुष्याला मरणप्राय वेदना होतात. इतकेंच काय पण आपल्या भाषेसाठीं, धर्मासाठीं किंवा देशासाठीं प्राणांचा यज्ञ करणारांचीं उदाहरणें प्रत्येक इतिहासांत कांहीं कमी सांपडावयाचीं नाहींत. इतका प्रभाव स्वभाषा, स्वधर्म आणि स्वदेश यांतील "स्व"चा आहे.

भाषेच्या बाबतींत केवळ उद्बोधक म्हणून Mulcastor या नांवाच्या एका इंग्लिश ग्रंथकाराचे विचार वाचनीय आहेत. तो म्हणतो—

'केवळ ज्ञान मिळवावें या हेतूनें आयुष्यभर परकीय भाषेची उपासना करीत राहाणें यासारखी आश्चर्यकारक दुसरी कोणती गुलामगिरी आहे? खरें पाहातां हें सर्व ज्ञानभांडार मातृभाषेच्या द्वारां आत्मसात् होण्याजोगें असतें. इंग्रजीभाषा आपल्या मनांत स्वातंत्र्याची रम्य कल्पना उत्पन्न करते; याविरुद्ध लॅटिन् भाषा म्हणजे मूर्तिमंत गुलामगिरी! माझे मनांत रोमशहराबद्दल प्रेमभावना आहे; पण लंडनवरील माझ्या प्रेमाला सीमा नाहीं. इटली देशाबद्दल माझे अन्तःकरणांत आदर वसत आहे; पण इंग्लंडविषयक माझ्या अन्तःकरणांत जीवंत ओलावा आहे. लॅटिनभाषा मला वंदनीय वाटते; पण इंग्रजी भाषेची मी नित्य पूजाअर्चा करतों. लॅटिनसारख्या विद्वन्मान्य भाषांनीं दुसऱ्या भाषांपासून किती तरी उसनवारी करून आपली ज्ञानसंपत्ति वाढविली. ती सर्व संपत्ति माझ्या मायबोलींत—इंग्रजींत—असावी अशी माझी मनापासूनची इच्छा. या बाबतींत लॅटिन भाषा व तत्सदृश भाषा पूर्वीच्या भाषांशीं कशा वागल्या? आतां लॅटिनभाषेशीं मी त्याच न्यायानें वागलों तर त्यांत वावगें तें काय? त्यांचेंच उदाहरण मी गिरविलें इतकेंच! खरें पाहतां प्रत्येकानें आपल्या मायबोलीची मनापासून सेवा केली पाहिजे. पण ही गोष्ट आपल्यांतील कांहींना पटत नाहीं. परकी भाषेची सेवा करण्यांत त्यांना समाधान वाटतें. आपल्या भाषेची वृद्धि करून स्वदेशाच्या ऐश्वर्यांत भर घालावी हें त्यांच्या ध्यानींमनींहि येत नाहीं! पण मी तरी असल्या लोकांची पर्वा कां करावी?'

लॅटिन् ही परकीभाषा आणि इंग्रजी ही मातृभाषा अशी भावना मनाशीं बाळगणाऱ्या इंग्लिश लोकांचें खरें अन्तःकरण, मातृभाषेंविषयीं त्यांना वाटणारी तळमळ, आपल्या मायबोलीची सेवा करण्याची उत्कट उत्कंठा वरील उताऱ्यांत स्पष्ट दिसत आहे. परकी भाषेचें प्रभुत्व स्वीकारलें म्हणजे आपल्या मातृभाषेची उपेक्षा होते. मुलांनाहि मातृभाषेचें योग्य तऱ्हेनें शिक्षण मिळत नाहीं. मुलांच्या शिक्षणांत एक प्रकारचें न्यून राहातें. त्यामुळें मुलांची मानसिक वाढच खुंटते, कारण मनोवृक्षाचीं मुळेंच किडलेलीं असतात. मानसिक गुलामगिरीचा रोग बळावतो व त्यामुळें लोकांचें व त्याबरोबर अखिल राष्ट्राचें मनःस्वास्थ्य नाहींसें होतें. इंग्लंडसारख्या स्वतंत्र वातावरणाच्या देशांत लॅटिनभाषेचें जूं झुगारून देणें फारसें कठीण झालें नाहीं, पण मराठी भाषेच्या मानेवरील ही धुरा जरा वर उचलण्याचा सुद्धां प्रयत्न विफल ठरत आहे. लॅटिन—इंग्रजी भाषेप्रमाणेंच प्रथम

मराठीला सर्वगुणसंपन्न, विद्वन्मान्य अशा संस्कृत भाषेशीं लढा करावा लागला. परंतु त्या लढ्यांत ज्ञानेश्वर—एकनाथ—तुकारामासारखे अद्वितीय सामर्थ्याचे सेनापती भाग घेण्यास पुढें सरसावले व एकदोन शतकांच्या आंतच संस्कृत भाषेच्या महालांत राबणाऱ्या आपल्या मराठी मातेची त्यांनीं मुक्तता केली. त्यांच्या या अलौकिक कार्याची महती पुढील विवेचनावरून आपल्या चांगली ध्यानांत येईल.

ज्ञानेश्वरांच्या काळांत संस्कृत भाषेला फार मान्यता असे. सर्वसाधारण जनता आपला व्यवहार मराठींत करी. परंतु मराठींत ग्रंथरचना करणें मूर्खपणाचें समजलें जाई. या मानसिक ठेवणीला ज्ञानेश्वरांनीं चांगलाच टोला दिला. मराठी भाषेचा जाज्वल्य अभिमान त्यांचे ठिकाणीं होता म्हणून ते आत्मविश्वासानें व अभिमानानें आपल्या ग्रंथांत मराठीचें ऐश्वर्य वाखाणतात —

**माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । परी अमृतातेंही पैजा जिंके ।**
**ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥** ( अ० ६ )
**देशियेचिये नागरपणें । शांत शृंगारातें जिणें ।**
**तरी ओविया होती लेणें । साहित्यासी ।** ( अ० १० )
**आणि तोचि हा मी आतां । श्रीव्यासाचीं पदें पाहातां पाहातां ।**
**आणिला श्रवणपथा । मऱ्हाठिया ॥** ( अ० १८ )

एकनाथ महाराज मराठीचे पक्के पक्षपाती होते. त्यांनीं मराठीवरील आपलें अलोट प्रेम ठिकठिकाणीं व्यक्त केलें आहे. भागवताच्या नमन प्रकरणांत मोठ्या हिरिरीनें नाथ मराठीची बाजू मांडित आहेत.

**संस्कृत ग्रन्थकर्ते ते महाकवी । मा प्राकृतीं काय उणीवी ॥**
**नवीं जुनीं म्हणावीं । कैसेनि केवीं सुवर्ण सुमनें ॥ ३ ॥**
**कापिलेचें म्हणावें क्षीर । मा इतरांचें तें काय नीर ॥**
**वर्णस्वादें एकचि मधुर । दिसे साचार सारिखें ॥ ४ ॥**
**जें पाविजे संस्कृत अर्थें । तेंचि लाभे प्राकृतें ॥**
**तरि न मनावया येथें । विषमाचि तें कायी ? ॥ ५ ॥**
**कां निरंजनीं बैसला रावो । तरी तोचि सेवकां पावन ठावो ॥**
**तेथें सेवेसि न वचनां पावो । दंडी रावो निजभृत्यां ॥ ६ ॥**
**कां दुबळी आणि समर्थ । दोहींस रायें घातले हात ॥**
**तरी दोघींसिही तेथ । सहजें होत समसाम्य ॥ ७ ॥**
**देशभाषा वैभवें । प्रपंच पदार्थीं पालटलीं नांवें ॥**
**परी रामकृष्णादिनामां नव्हे । भाषा वैभवें पालटू ॥ ८ ॥**

संस्कृतवाणी देवें केली । तरी प्राकृत काय चोरापासोनि झाली ? ॥
असोत या अभिमानभुली । वृथा बोलीं काय काज ॥ ९ ॥
आतां संस्कृता किंवा प्राकृता । भाषा जाली जे हरिकथा ॥
ते पावनचि तत्त्वतां । सत्य सर्वथा मानली ॥ १० ॥
संस्कृत प्राकृत पखडी । सज्ञान सेविती स्वानंद गोडी ॥
गाय काळी आणि लांबडी । परी दुधीं वांकुडी चवी नाहीं ॥ १३ ॥
तेवीं संस्कृत प्राकृत भाषा ॥ ब्रह्मासी पालट नाहीं देखा ॥
अभय अभेदें वदला एका । साह्य निजसखा जनार्दन ॥ १४ ॥

संस्कृत भाषेच्या तावडींतून आपली मायबोली बाहेर पडली आतां ती सुखानें नांदेल, महाराष्ट्राची देवतां बनून सिंहासनावर तिची स्थापना होईल, तिच्या सेवेसाठीं तिचें सत्पुत्र प्राण खर्चीं घालतील अशीं सुखस्वप्नें आपण पाहातों न पाहातों तोंच तिच्यावर यावनी भाषांनीं आक्रमण करण्यास सुरवात केली. चौदाव्या शतकानंतर मुसलमानी साम्राज्यांत फारसी–अरबी भाषांशीं मराठीचा संयोग झाला. पण सुदैवानें या यावनी भाषा मराठीची हकालपट्टी करूं शकल्या नाहींत; उलट मराठीनें या भाषांतून अनेक शब्द घेऊन आपली संपत्ति वाढविली. शब्दसंपन्न झालेल्या मराठींत वाङ्मयांतील अनेक भूषणें निर्माण झालीं. स्वराज्यांतील सर्व सौख्यें मराठीला मिळालीं. आतां तरी मी पूर्ण स्वातंत्र्यानें वागेन असें तिला वाटूं लागलें. पण विधिघटना वेगळीच होती ! पश्चिमेकडील केवळ चार दिवसांचा पाहुणचार घेण्यासाठीं आलेल्या गोऱ्या इंग्रजी भाषेनें आपलें बिऱ्हाड मराठीच्या घरीं जें मांडलें तें अद्याप कायम आहे. बिऱ्हाडाला राहिलेली ही परकी भाषा पुढें मराठीची धनीण बनली. मराठीचा सासुरवास सुरू झाला.

स. १८१८ नंतर हिंदुस्थानांत इंग्रजी सत्ता सुरू झाली. महाराष्ट्राचें स्वराज्य नष्ट झालें. पश्चिमेकडील सुधारणा इकडे येऊं लागल्या, इंग्रजी भाषेच्या अध्ययनाला जोर चढला. पाश्चात्यांच्या चमकणाऱ्या संस्कृतीनें आपण दिपलों. इंग्रजी भाषेनें देशी भाषाचीं सिंहासनें काबीज केलीं. इंग्रजी भाषेच्या राजमहालांत देशी भाषांचें दास्य सुरू झालें. स्वराज्याचीं गोड गोड सुखें अनुभविलेल्या मराठीच्या नशिबीं गुलामगिरी आली. तिचीं मुलें आतां तिची उपेक्षा करूं लागलीं. ती रोडावत चालली. तिचा हा क्षयरोग पाहून तिच्या मातृवत्सल सुपुत्रांचीं अन्तःकरणें तिळ तिळ तुटूं लागलीं ! कवि मोगरे हात जोडून आपल्या मायबोलीला औषध देण्याची विनंती करीत आहेत. त्यांना मातेपेक्षांहि भाषेची योग्यता अधिक वाटते.

माता तशी स्वभाषा, सेवाया होय आपणा उचित ।
किंबहुना मातेहुनि अधिक हिची योग्यता असे खचित ॥
दे जन्म मात्र माता, भाषा व्यवहार चालवी सकळ, ।
मातेशिवाय जन्महि जाय, न भाषेशिवाय एक पळ ॥

अशा या मातेच्या शुश्रुषेची सर्व जबाबदारी ग्रंथकारांवर आहे, त्यांनीं तिला औषधोपचार करून वांचवावी. नंतर ती पुष्ट होऊन तिचें स्वरूप विलोभनीय होईल असें सुखस्वप्न मोगरे पाहातात.

क्षयरोगमुक्त अंतीं तुमचीं होऊन देश भाषा ही
तुमच्या भव्य यशानें भरुनी टाकील हो दिशा दाही ॥

कवि मोगऱ्यांप्रमाणेंच माधव ज्यूलियन् ( डॉ. माधवराव पटवर्धन ) यांनीं आपला जिवंत अभिमान व दुर्दम्य आशावाद "आमुची मायबोली" या आपल्या प्रसिद्ध गीतांत व्यक्त केला आहे.

मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे
नसो आज ऐश्वर्य या माऊलीला, यशाची पुढें दिव्य आशा असे ।
जरी पंचखंडांत ही मान्यता घे स्वसत्ताबळें श्रीमती इंग्रजी
मराठी भिकारीण झाली तरीही कुशीचा तिच्या तीस केवी त्यजीं ॥

* * * *

हिच्या लक्तरांची असे लाज आम्हां, नका फक्त पाहूं हिच्या लक्तरा
प्रभावी हिचें रूप, चापल्य देखा, पडावी फिकी ज्यापुढें अप्सरा,
न घालूं जरी वाङ्मयांतील उंची हिरेमोतियांचे हिला दागिने
मराठी असे आमुची मायबोली, वृथा ही बढाई सुकार्याविणें ।

आपल्या प्रिय मायबोलीच्या अवस्थेचें व तिच्या अंगीं असलेल्या शक्तीचें वर्णन आपल्या प्रतिभेच्या उज्वल उन्मेषानें करून कवि मराठीच्या भविष्यकाळचें चित्र रेखाटीत आहे.

मराठी असे आमुची मायबोली, अहो पारतंत्र्यांत ही खंगली,
हिची थोर संपत्ति गेली उपेक्षेमुळें खोल कालार्णवाच्या तळीं,
तरी सिंधु मंथूनि काढूनि रत्नें नियोजूं तयांना हिच्या मंडणीं
नको रीण ! देवोत देतील तेव्हां, जगांतील भाषा हिला खंडणी

एकंदरींत स्वदेश आणि स्वधर्म यांच्याइतकीच मानवाला स्वभाषा प्रिय असते—प्राणापेक्षांहि प्यार असते आणि ती तशी असणें आवश्यक आहे. आपल्या प्रिय मराठी भाषेच्या कहाणीचा उत्तरभाग सारांशानें आपण पाहिला. त्या कहाणीचा पूर्वभाग जाणण्याचीहि आपल्याला जिज्ञासा असेल, त्याकडे आपण वळूं.

---

# प्रकरण ४ थें

# मराठी भाषेचा कुलवृतांत

पृथ्वीच्या पाठीवर व्यवहारांत असलेल्या परंतु पुढें नष्ट झालेल्या, त्याचप्रमाणें सांप्रत चालू असलेल्या भाषांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचें एक शास्त्र तयार झालें. त्या शास्त्राला भाषाशास्त्र म्हणतात. हें शास्त्र पूर्णपणें जाणणाऱ्या विद्वानांनीं–भाषाशास्त्रज्ञांनीं–प्रचलित भाषांच्या अनेक कुळी मानल्या आहेत. या कुळींत " आर्यन " हीं एक प्रसिद्ध कुळी आहे. या कुळींत मोडणाऱ्या ज्या अनेक भाषा आज व्यवहारांत आहेत, त्यांतील सर्वसामान्य खूण म्हणजे या भाषांतील बहुतेक शब्द धातूंवरून बनले आहेत. त्याचप्रमाणें या कुळींतील बहुतेक भाषा " बोलभाषा " ( लोकांत बोलल्या जाणाऱ्या ) म्हणून सुधारलेल्या देशांत आज वापरांत आहेत. याच " आर्यन " कुळीच्या अनेक शाखा झाल्या. " आर्य भारतीय " ही शाखा भारतांत–हिंदुस्थानांत–फोफावली. याच शाखेपासून आपल्या देशांतील बऱ्याच भाषा निर्माण झाल्या. दक्षिण हिंदुस्थानांत बोलल्या जाणाऱ्या तामिळ, तेलगू, कानडी व मल्याळी या द्राविडी शाखेंतून आल्या. " आर्यन " कुळीप्रमाणें " द्राविडी " ही एक स्वतंत्र कुळी समजली जाते.

" आर्यन " या कुळीचें आद्य स्वरूप म्हणजे वेदकाळाच्या पूर्वीची जी भाषा ती होय. या भाषेची माहिती विद्वान् लोक अनुमानानें देऊं शकतात. यानंतर जी भाषा आपणांस दिसते ती वेदभाषा अर्थात् वैदिक भाषा. जगांतील अत्यंत जुन्या वाङ्मयांत वेद वाङ्मयाचा समावेश होतो. किंबहुना भाषाशास्त्राच्या दृष्टीनें वेदवाङ्मयाला अग्रस्थान देण्यांत येतें.

या वैदिक भाषेची पुढली पायरी म्हणजे संस्कृत भाषा. या भाषेचें महत्त्व हिंदवासियांना सांगण्याची आवश्यकता नाहीं. अनेक पाश्चात्य पंडित संस्कृत भाषेवर इतके मोहित झाले व होत आहेत कीं, संस्कृत भाषेचा अभ्यास हें त्यांनीं आपल्या जीवितांचें उच्च ध्येय ठरविलें. वेदकालीन कश्यपादि ऋषींप्रमाणें व्यासवाल्मिकींनीं या भाषेची सेवा केली, कालिदास, भवभूतिसारख्या मान्यवर


कवींनीं तिची अलौकिक सजावट केली, बाणभट्टासारख्या लेखकांनीं तिला अलंकार अर्पण केले, शंकराचार्य, रामानुजाचार्य इत्यादि जगन्मान्य आचार्यांनीं तिला जागतिक कीर्ति प्राप्त करून दिली, पाणिनीसारख्या व्याकरणकारांनीं तिच्या स्वरूपाला नीटसपणा आणला, जगन्नाथ पंडितासारख्या कविवरांनीं तिच्या वैभवदर्शनानें लोकांना मुग्ध बनविलें, अशा या भाषाराज्ञीनें कित्येक शतकें आपलें वर्चस्व हिंदुस्थानभर गाजविलें. अशा रीतीनें वेदपूर्व भाषा, वैदिक भाषा आणि संस्कृत अशीं भाषेचीं स्वरूपें जुन्या वाङ्मयांत दिसतात.

वरील भाषा या ग्रंथांतील भाषा होत्या. त्यांच्या बरोबरीनें अति प्राचीन काळापासून लोकांच्या व्यवहारांतील, नित्याच्या बोलण्यांतील भाषा होत्या. त्यांनाच "प्राकृत" भाषा म्हणतात. प्राकृत भाषा म्हणजे प्रकृतीच्या भाषा—सामान्य लोकांच्या बोलभाषा. या बोलभाषा निरनिराळ्या प्रांतात बोलल्या जात व त्या प्रांताचें नांव त्या बोलभाषेस दिलें जाई.

वेदभाषा चालू असतांना जी प्राकृत भाषा लोकांच्या बोलण्यांत होती, ती प्राकृताची पहिली अवस्था. त्यांतूनच निर्माण झालेली प्राकृत म्हणजे पाली. जुन्या वाङ्मयांत पाली भाषेची योग्यता फार मोठी आहे. आपला धर्म सर्व लोकांना नीट कळावा म्हणून भगवान बुद्धानें याच भाषेचा आश्रय केला. याच भाषेप्रमाणें पुढें पैशाची, शौरसेनी, मागधी व महाराष्ट्री या प्राकृत भाषा प्रसिद्धीस आल्या. वायव्येकडील डोंगराळ प्रांतांत पैशाची भाषा बोलली जाई. मथुरेच्या आजूबाजूला शूरसेन राजाच्या प्रान्तांतील भाषा ती शौरसेनी. मगध देश म्हणजे सध्यांचा बहार. हा मागधीचा प्रदेश. महाराष्ट्राची भाषा ती महाराष्ट्री.

याप्रमाणें पैशाची, शौरसेनी, मागधी आणि महाराष्ट्री या प्राकृत भाषा संस्कृत भाषेच्या बरोबरीनें व्यवहारांत उपयोगिल्या जात होत्या. या प्राकृत भाषांतहि सुंदर वाङ्मय निर्माण झालें. कित्येक शतकांनीं याच प्रांतिक भाषांचीं स्वरूपें बदललीं व त्या बदललेल्या स्वरूपांना अपभ्रंश भाषा असें संबोधिलें जाई.

महाराष्ट्री अपभ्रंशांतूनच प्रामुख्यानें आपली मायबोली—मराठी—जन्माला आली. वरील सर्व माहिती कोष्टकरूपानें ध्यानांत ठेवणें सोईचें होईल:—




वरील विवेचनावरून मराठीची कुळी किती प्राचीन काळची आहे हें ध्यानांत येईल. इतकें असूनहि मराठी भाषा कोणत्या भाषेंतून निर्माण झाली याबद्दल अनेक विद्वानांत वाद चालू आहेत. कांहींचें म्हणणें मराठी प्रत्यक्ष संस्कृतांतून आली;कांहीं म्हणतात ती प्राकृतांतून आली. प्रत्येक पक्ष आपलें म्हणणें पुराव्यानें सिद्ध करतो. वादाचा निष्कर्षच काढावयाचा तर असें म्हणतां येईल अमुक एका भाषेंतून मराठी निर्माण झाली असें म्हणतां येणार नाहीं. मराठींत कितीतरी शब्द संस्कृत भाषेंतील आहेत, त्याचप्रमाणें प्राकृत भाषांच्या निरनिराळया प्रकारांतील पुष्कळ शब्द मराठीनें आत्मसात् केलें आहेत. प्राकृत भाषा बोलणारे निरनिराळे समाज निरनिराळया काळीं आपापल्या प्रांतांतून महाराष्ट्रांत आले व तेथेंच कायम वस्ती करून राहिले. त्या सर्वांच्या बोलण्याचें मिश्रण होऊन मराठी भाषा बनली यांत शंका नाहीं.

ऐतिहासिक दृष्टया विचार करितां महाराष्ट्र देश, मराठा समाज आणि मराठी भाषा यांची घटना इ. स. ६००–७०० च्या सुमारास झाली. हा काल निश्चित करण्याजोगीं साधनें आज उपलब्ध नाहींत. कोणत्याहि प्रौढ भाषेचीं दोन स्वरूपें असतात; एक बोली व दुसरें लेखी. लेखी भाषा व्याकरणशुद्ध, व्यवस्थित व नीटस असते. एकादी भाषा कित्येक वर्षें प्रथम बोलीच्या स्वरूपांत असते व ती बरींच प्रौढ झाली म्हणजे ती लेखनांत उतरते. भाषेच्या लेखी स्वरूपाचा उगम शोधण्यास त्या भाषेंतील वाङ्मय ग्रंथ साहाय्य करतात, पण बोलीचें तसें नसतें. शिलालेख, ताम्रपट पत्रव्यवहार इत्यादि साधनांच्या आधारें बोलीची उत्पत्ति ठरवितां येतें.

मराठीचा आरंभ काल ठरवितांना खालीं दिलेले महत्त्वाचे आधार विचारांत घेतले जातात.

( १ ) सन ४८८ सालीं लिहिलेला मंगळवेढ्याचा ताम्रपट.

( २ ) सन ७३६ मधील चिकुड्याचा ताम्रपट.

( ३ ) सन ९०३ मधील म्हैसूरजवळील श्रवणबेलगोळच्या गौतमेश्वराच्या खालील शिलालेख. यांत "श्री चावुण्डरायें करविलें" व "गंगरायें सुत्താळें करवियले," अशा दोन ओळी मराठी आहेत.

( ४ ) ११ व्या शतकांतील "राजीमती प्रबोध" या पुस्तकांतील महाराष्ट्र स्त्रीचें वर्णन."

( ५ ) सन ११२९ तील "मानसोल्लास" ग्रंथांतील मराठी वळणाचीं रूपें.

( ६ ) सन ११८७ तील परळचा शिळालेख. यांत "अथ तु जो कोणु हुविए शासन लोपी तेया श्री वैद्यनाथ देवाची भाल सकुटंबिआ पडे" इ० शपथ मराठींत आहे.

( ७ ) सन १२०६ तील चांगदेवानें कोरविलेला पाटणच्या भवानी मंदिरांतील लेख.

( ८ ) सन १२७३ मधील पंढरपूरच्या देवळांतील चौऱ्यायशींच्या शिळेवरील लेख.

याप्रमाणें साधनें उपलब्ध झालीं आहेत. त्यावरून विद्वानांचें असें मत ठरतें कीं मराठी भाषेचा उदय इसवी सनाच्या चवथ्या–पांचव्या शतकांत झाला असावा. इ० स० ७०० च्या सुमारास मराठीला बोलभाषा म्हणून पूर्णत्व आलें असावें. या अवधींत संस्कृत हीच ग्रंथ भाषा होती. खरें व उत्तम दर्जाचें मराठी वाङ्मय बाराव्या शतकांत निर्माण झालें.

"राजा कालस्य कारणम्" हें सुभाषित इतर गोष्टींप्रमाणें भाषेलाहि लागू पडतें. भाषेवर त्या त्या काळच्या राजकारणाचा प्रभाव निश्चयेंकरून पडलेला दिसतो. राजक्रान्ति, धर्मक्रान्ति यांबरोबरच भाषाक्रान्ति झालेली दिसते. याच कारणानें मराठी भाषेचीं अनेकविध स्वरूपें आपणांस दिसतात. त्याची स्थूल कल्पना पुढें दिली आहे.

( १ ) यादवकालीन मराठी ( सन १२५०–१३५० ) महानुभाव व ज्ञानेश्वर.

( २ ) बहामनीकालीन मराठी ( १३५०–१६०० )

एकनाथ, नाथपंचक, दासोपंत याच कालावधींत मराठीचा फारशी भाषेशीं संबंध आला. मुसलमानांनीं सन १३१८ पासून दक्षिणेचें राज्य हस्तगत केलें. फारशी भाषेची राजवट सुरू झाली व ज्ञानेश्वरकालीन मराठीचें शुद्ध स्वरूप कलुषित झालें. मुसलमानांच्या संसर्गानें महाराष्ट्राच्या चालीरीती, पोशाख, राहणी, घरगुती व बाहेरील व्यवहार यांमध्यें बरेच फेरफार झाले. कसबा, जिल्हा, कारकून, पेशवा, किल्ला, मुनसफ, हुजूर, अत्तरदाणी, बगीच्या, दस्तऐवज, इमारत, जहागीर इत्यादि हजारों शब्द मराठींत कायमचें ठाणें देऊन बसले.

( ३ ) शिवकालीन मराठी ( १६००–१७०० ) रामदास, तुकाराम.

मुसलमानांच्या तावडींतून मायभूमीची सुटका करण्याचें ब्रीद शिवाजी महाराजांनीं धारण केलें. तो काळच असा होता कीं, जिकडे पाहावें तिकडे म्लेंच्छधर्मीयांची छाप. या गोष्टींची महाराजांना फार चीड येई. भाषेच्या बाबतींत फारशी शब्द काढून टाकून त्याऐवजीं आपले शब्द यावे या हेतूनें शिवाजी महाराजांनीं रघुनाथ पंडिताकडून "राजव्यवहार–कोश" तयार करविला व मराठीचें शुद्धीकरणाचा पाया घातला.

( ४ ) पेशवेकालीन मराठी ( १७००–१८०० ) मोरोपंत रामजोशी इ. शाहीर.

( ५ ) इंग्रजकालीन मराठी ( १८०० चालू ).

मुसलमानी राजवटीमुळें फारशी भाषेनें मराठीच्या घरीं भयंकर धुडगुस घातला. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीपासून फारशी युक्त मराठी भाषेची पाश्चात्य भाषांशीं तोंडओळख झाली व त्या भाषांतूनहि मराठीनें कांहीं शब्द घेतले.

अरबी—नजर, मुरांबा, तक्रार, जबाब.

उर्दू—भाई, बढती, उल्लू, नाका.

तुर्की—बंदूक, कजाग.

पोर्तुगीज—पगार, लिंबू, चावी, जुगार, आरबार, साबण.

स्पॅनिश—बटाटा.

इंग्रजी—कोर्ट, फी, स्टेशन, बुक, पास इ०

सांप्रत इंग्रजी भाषेचा अंमल किती प्रमाणांत चालू आहे याचें विवेचन करावयास नकोच.

राजकारणामुळें मराठी भाषेवर परदेशी भाषांचा परिणाम कसा व किती झाला याचें विवेचन आतांपर्यंत केलें. मराठी भाषेंतील शब्दसंपत्ति तपासून पाहतां मराठीनें आजूबाजूंच्या भाषाभगिनीकडूनहि बरीच उसनवारी केल्याचें दिसून येईल.

कानडी—कडबोळें, चिंधी, अण्णा, ताई, खोली, हंडा, आडकित्ता, बांगडी, तूप.

तेलुगू—बंडी, डबी, कुळकरणी.

हिंदी—पाटील, व्याही, पंत.

गुजराथी—नवलकथा, चोपडी, लुगडें, सदरा.

असा हा मराठी भाषेचा गोतवळा आहे. यावरून मराठी भाषेंतील शब्द-संपत्ति फार मोठी असावी असें अनुमान काढणें धोक्याचें होईल. इंग्रजी भाषेचा विचार केला तर मराठीचें शब्ददारिद्र्य चांगलेंच उठावदार दिसेल. कोणत्याहि इंग्रजी कोशांतील शब्दांची संख्या पांच लाखांहून कमी भरणार नाहीं. अगदीं अलीकडील मराठी शब्दकोशांत हीच संख्या सुमारें १,२५,००० भरते.

मराठीचीं जशीं निरनिराळ्या काळांत निरनिराळीं स्वरूपें झालीं, त्याच-प्रमाणें मराठीचीं निरनिराळ्या प्रान्तांत निरनिराळीं स्वरूपें आहेत. "दर बारा कोसांवर भाषा बदलते" अशी म्हण प्रचलित आहेच. या दृष्टीनें नागपुरी, माळवी, वऱ्हाडी, खानदेशी, पुणेरी, कोल्हापुरी, सातारी, कर्नाटकी, कोंकणी, चित्पावनी अशीं मराठीचीं प्रान्तिक रूपें आहेत. महाराष्ट्र, नागपूर, वऱ्हाड, माळवा, बडोदें, निजामचे सहा जिल्हे, कर्नाटक, कोंकण व गोंवा इत्यादि प्रांतांत आज मराठी बोलली जाते. मराठी भाषा बोलणारांची संख्या सुमारें दोन कोटी पंधरा लक्ष आहे.

आज हिंदुस्थानांत अनेक भाषा प्रचलित आहेत, त्या भाषा बोलणाऱ्या लोकांच्या संख्येचा विचार करतां मराठीचा क्रमांक चवथा लागतो. मुख्य मुख्य भाषांचा हा क्रम पुढील कोष्टकावरून समजेल.

दर हजारीं विशिष्ट भाषा बोलणाराचें प्रमाण कोष्टकांत दिलें आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हिंदी | हजारीं | ३०६ | मराठी | ,, | ६० |
| बंगाली | ,, | १९२ | कानडी | ,, | ३२ |
| तेलगू | ,, | ७५ | गुजराती | ,, | ३१ |

आपल्या प्रिय मायबोली हा मनोरंजक कुलवृतान्त आहे. ही मायबोली मूल कशी शिकतें याचा यापुढें विचार करूं.

---

## प्रकरण ५ वें

# मूल भाषा कशी शिकतें ?

मानवी मन मानसशास्त्र दृष्ट्या जीं अनेकविध कार्यें करीत राहातें, त्यांत भाषेचा उपयोग हें अत्यंत महत्त्वाचें व विशिष्ट स्वरूपाचें कार्य आहे. शैशवावस्थेपासून तो वृद्धावस्थेपर्यंतच्या सर्व कालावधींत मनुष्य भाषेचा व्यवहार अधिकाधिक वाढत्या प्रमाणांत करतो. भाषेवर जितकें अधिक प्रभुत्व त्या मानानें त्याचें ज्ञान अधिक सखोल होतें. शालेय क्षेत्रांत मुलांना भाषावैभव आवश्यक आहे हें खरें पण त्याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलाचें शील, व्यक्तिमत्व इत्यादि गुणांचा परिपोष ज्या भाषेच्या द्वारें मुलाचें शिक्षण होत असतें, त्या भाषेवर प्रामुख्यानें अवलंबून असतो.

ज्या समाजांत मूल जन्मतें, वाढूं लागतें, त्या समाजाची भाषा–मुलाची मातृभाषा–तें कसें शिकतें याबद्दल शास्त्रज्ञांनीं पुष्कळ प्रयोग केले आहेत. त्या प्रयोगांच्या आधारें पुढील विवेचन केलें आहे. भाषा आणि भाषेनें होणारें व्यवहार या गोष्टी जन्मसिद्ध नसून अर्जित म्हणजे मागाहून संपादिलेल्या आहेत यांत शंका नाहीं. भाषा संपादन करतांना मुख्यतः चार मुद्दे दृष्टीसमोर उभे राहातात :–

(१) बोलली जाणारी भाषा समजणें,
(२) भाषा स्वतःला बोलतां येणें,
(३) लिहिलेली किंवा छापलेली भाषा समजणें;
(४) भाषा लिहितां येणें.


वरील मुद्दे थोडक्यांत असे लिहितां येतील :—श्रवणद्वारां अर्थग्रहण, कथन, वाचन आणि लेखन. यासंबंधींच आतां अधिक स्पष्टता करूं.

एकादें माणूस " बा " म्हणतें, शेजारीं असलेल्या वर्षाचें मूल " बा " म्हणतें, या नेहमींच्या अनुभवावरून सर्वसाधारण लोकांची अशी समजूत होते कीं भाषेच्या बाबतींत मूल प्रौढांचें अनुकरण करतें व भाषा शिकतें. परंतु शास्त्रीय-दृष्ट्या पाहातां हें अनुमान चुकीचें आहे असें दिसून येईल. प्रौढांच्या आवाजाचें अनुकरण ही पुढची पायरी आहे. त्याच्यापूर्वींहि कांहीं प्रक्रिया होत असते. आजूबाजूला असलेल्या अनेक गोष्टी मुलांच्या ज्ञानेंद्रियांच्या कक्षेंत येतात. कांहीं गोष्टी तें पाहातें, कांहींचा आवाज त्याच्या कानावर पडतो, हातांत मिळालेल्या कित्येक गोष्टींशीं तें खेळतें, व या सर्व क्रिया चालू असतां त्याच्या तोंडून सहजासहजीं आवाज निघतो. अमुक वस्तूच्या ज्ञानानें अमुक आवाज अशी स्थिति त्यावेळीं नसते. आवाज काढणें ही अनेक आपसुख होणाऱ्या कृतींपैकीं एक असते एवढेंच. अशाच वेळीं मुलाच्या तोंडून सहज " का " असा आवाज निघाला कीं त्या " का " ह्या आवाजाचा आघात त्याच्या कानावर होतो व त्या द्वारें मेंदूवर ठसा पडतो. मूल " का " हा आवाज परत परत करतें व अशा रीतीनें स्वतः उच्चारलेल्या " का " शब्दाचें पुनरुच्चारामुळें दृढीकरण होतें.

याचवेळीं काय मजा होते पहा. शेजारीं उभी असलेली व्यक्ति—आई, बाप, बहीण, भाऊ, आजी, चुलता—यांपैकीं कोणाचें तरी लक्ष मुलानें सहजासहजीं उच्चारलेल्या " का " या आवाजाकडे लागतें, व मुलाच्या मागून प्रौढांपैकीं कोणीतरी " का " " का " म्हणूं लागतें. मुलाला मजा वाटते व तेंहि परत परत " काका " " काका " उच्चारण्यांत कोणाला हार जात नाहीं. हळूहळू ज्या व्यक्तीचें नांव " काका " असतें, त्या व्यक्तीकडे बोट दाखवून प्रौढ माणसें " काका " शब्दाचा मुलांकडून अनेकदां अभ्यास करवितात व शेवटीं " काका " हा आवाज व एक विशिष्ट व्यक्ति यांचा संकेत ठरतो, इतका कीं, ती व्यक्ति वा तत्सदृश व्यक्ति दिसली कीं मुलाच्या

तोंडून "काळा" हा शब्द बाहेर पडतो. वरील विवेचनावरून ध्यानांत येईल कीं मूल सुरवातीला प्रौढांचें अनुकरण करीत नसून प्रौढ मुलाच्या आवाजाचें अनुकरण करतात व भाषेच्या पहिल्या पाठाला सुरवात होते. या अवस्थेंत असा एकहि शब्द मूल शिकूं शकत नाहीं कीं, ज्याचा आवाज प्रथम मुलाच्या तोंडून सहजासहजीं निघालेला नसतो. म्हणूनच या आपसुख निघालेल्या आवाजांत भाषेचा उगम असतो व नंतर अनुकरणाची पायरी येते. याच पायरीला "ऐका–म्हणा" असें म्हणतां येईल.

मुलाच्या हातांत आपण एकादी वस्तु देतों. मूल त्या वस्तूचा आकार रंग, वजन इत्यादि गोष्टींचें निरीक्षण करतें. ती वस्तु देतांना आपण तिचें नांवहि उच्चारितों (उ० खुळखुळा). त्यावेळीं पुढील मानसिक प्रक्रिया होते.




या आकृतींत दाखविल्याप्रमाणें मूल दोन्ही प्रकारांनीं शिक्षणाची क्रिया करतें. यानंतर पुढें "खुळखुळा" पाहिला म्हणजे मूल हळूच "खूळ" असा शब्द उच्चारतें. अशा रीतीनें प्रत्यक्ष वस्तु पाहून, अगर प्रसंग स्वतः अनुभवून मुलाला शब्दांचे अर्थ कळूं लागतात.

सुरवातीला प्रत्येक शब्दाचा अर्थ अगदीं स्पष्ट असतोच असें नाहीं. "काका" शब्दानें कोणताहि पुरुष संबोधिला जाईल. "माऊ" शब्दानें सर्व प्राण्यांचा बोध होईल. हळूहळू या सर्व सामान्यांतून मूल विशिष्टाकडे जातें व व्यक्तिव्यक्तीमधील वस्तूवस्तूंतील फरक त्याच्या ध्यानांत येऊं लागतो.

स्वनिवेदन आणि परनिवेदन हीं भाषेचीं मुख्य स्वरूपें यापूर्वींच सांगितलीं आहेत. मुलांच्या भाषेंतहि हे दोन्ही प्रकार पूर्णपणें दिसून येतात. त्यांतल्यात्यांत सुरवातीला मुलांची भाषा आत्मकेंद्रित (स्वतःला उद्देशून) असते. कांहींतरी दुसऱ्यांना सांगावें यापेक्षां आपण कोण हेंच दाखविण्याची उत्कंठा अधिक.

आत्माविष्कार हें खरें उद्दिष्ट म्हणून दुसरा काय म्हणतो याकडे मुलांचें यत्किंचितहि लक्ष नसतें. पुढच्या अवस्थेंत मुलें परस्थपेक्ष म्हणजे दुसऱ्याला उद्देशून बोलूं लागतात. तें प्रश्न विचारील, चौकशी करील, दुसऱ्याला अमुक करा म्हणून सांगेल. आजूबाजूच्या लोकांना हुकूम करील, मधून मधून त्यांचीं आर्जवें करील, एकंदरींत दुसऱ्यानें आपलें बोलणें ऐकावें अशी त्याची इच्छा असते.

मुलाच्या भाषाशिक्षणाच्या पुढील पायऱ्या समजल्या जातात. ( १ ) सहजासहजीं होणारा आवाज ( २ ) अर्थग्रहण ( ३ ) पहिले शब्द ( ४ ) एकशब्दी वाक्य ( ५ ) लांब लांब वाक्यें. भाषामंदिराच्या मार्गावरील हे पांच टप्पे आहेत.

( १ ) **सहज ध्वनि**---जन्माला आल्याबरोबर मुलाच्या मुखांतून निघालेले " आरटन "--रडणें हें वाङ्मयाच्या दृष्टीनें फार मोलाचें आहे. याच्या श्रवणानें अनेकांच्या भावना उचंबळून आल्या आहेत. या शब्दावर अनेक काव्यें निर्माण झालीं आहेत. असें असलें तरी शास्त्रीय चिकित्सेंत एवढेंच शिल्लक राहातें कीं, कंठांत असलेल्या आवाजाच्या इंद्रियावर हवेचा दाब बसला म्हणजे हा आवाज उद्भवतो, व आपण म्हणतों मूल रडतें. या रडण्यांत कोणतीहि सुखदु:खाची भावना नसते, किंवा त्याला कांहींहि अर्थ नसतो. ती एक स्वाभाविक क्रिया असते. हळूहळू या आरटनांत सुखदु:खादि भावना दाखविणारे बदल होत जातात. एका वर्षाच्या मुलाच्या ओरडण्यांतील एकचतुर्थांश ओरडण्याला अर्थ असतो. मूल दोन वर्षांचें म्हणजे आवाजांत कांहींना कांहीं अर्थ असतो, तीन वर्षांत १/८ आणि चार वर्षांत ९९·६ इतक्या प्रमाणांत मुलाच्या आवाजांत अर्थोत्पत्ति दिसून येते.

भाषाशिक्षणांत दुसरी महत्त्वाची पायरी म्हणजे अर्थग्रहणाची शक्ति. मुलांना स्वत: उच्चार करतां येत नसला तरी पुष्कळ शब्द समजत असतात. वडील माणसांनीं सांगितलें म्हणजे मुलें त्या त्या क्रिया अचुक करतात. यावरून त्यांना शब्दांचा अर्थ कळतो हें स्पष्ट होतें. मात्र कठिणतेमुळें अनेक शब्दांचा उच्चार त्यांना करतां येत नाहीं.

मुलानें उच्चारलेल्या पहिल्या शब्दाची फार मजा असते. मुलानें सहजासहजीं उच्चारलेल्या शब्दावर आपणच "दा" "का" "मा" इत्यादि शब्दांचा आरोप करतों व मोठ्या आनंदानें शेजाऱ्या पाजाऱ्यांना सांगतों, " बाळ 'दादा' म्हणूं लागलें, बरें का ? " आई मग मुलाला घेऊन शेजारीं जाते व मुलाला आग्रह

करते, " बाळ, दादा म्हण." मूलहि आनंदानें "दादा" "दादा" म्हणतें. घरांतील माणसें "दादा" या व्यक्तीचा मुलाच्या तोंडून निघणाऱ्या "दादा"शीं संबंध जोडतात. परंतु मूल जेव्हां सर्वांनाच "दादा" म्हणतें तेव्हां सर्वांचे चेहरे पाहण्या-लायक होतात. मुलाचा हा पहिला शब्द कोणता असतो हें निश्चित सांगतां येत नाहीं. म, ब, प हीं अक्षरें मुलांस प्रथम उच्चारतां येतात असें शास्त्रज्ञांचें मत आहे. र सारखीं अक्षरें उच्चारण्यास फार वाढ व्हावी लागेल. मुलें एकावेळीं एकेक अक्षरांचा उच्चार करतात व त्यामुळें पुनरावृत्तीनें दादा, नाना, मामा, काका इत्यादि शब्द त्यांचे बोलण्यांत बरेच येतात. वर्षदीडवर्ष वयाच्या मुलाची ही खरी शब्दसंपत्ति असते.

दिवसांमागून दिवस जातात. मुलांची शारीरिक आणि मानसिक वाढ होत जाते. अनेक वस्तु त्यांच्या हातांतून जातात. अनेक व्यक्तींची थोडी-फार ओळख होते. त्यांच्या देखत अनेक प्रसंग घडतात. अनेक साध्यासुध्या किंवा गुंतागुंतीच्या परिस्थितींतून मुलांना जावें लागतें. असे एक ना दोन हजारों अनुभव त्यांना येतात. शैशवास्थेंत, ढकलणें, ओढणें, मारणें, आस्वाद घेणें, चुरगळणें, गुंडाळणें, पाहाणें, ऐकणें, वास घेणें, उचलणें, फेकणें, फोडणें, मोडणें अशा कितीतरी क्रिया मुलाहातीं होतात आणि त्या सर्वांचे परिणाम मुलावर झाल्याविना राहात नाहींत. या सर्व गडबडीच्या व्यवहारांत मुलांना अनेक वस्तूंचीं नांवें परिचयाचीं होतात. आणि त्या त्या वस्तूंच्या उपयोगावरून मूल त्या त्या वस्तूंची व्याख्या करूं लागते. " लाडू " खायचा तो; " चहा " प्यायचा तो; "पाट" बसायचा तो, वगैरे प्रत्येक शब्दागणिक कांहींना कांहीं क्रिया मुलांना अपेक्षित असते. याशिवाय ज्यांचा अर्थ सांगतां येत नाहीं, किंवा ज्यांची सुटसुटीत व्याख्या करितां येत नाहीं, असे कितीतरी शब्द मुलें जाणतात.

पण पुढें मूल एकादां शब्द उच्चारतें व आपणाला पाहिजे असलेली गोष्ट सांगते. त्याप्रमाणें वडील माणसें त्याची इच्छा पुरी करतात. असें होऊं लागलें म्हणजे मुलाच्या बोलण्याला जणूं काय भरती येतें. या अवस्थेंत त्यानें उच्चारलेला शब्द म्हणजे वाक्यच असतें. कारण नुसता शब्द उच्चारून तें राहात नाहीं. तो शब्द उच्चारतांना आवाजांत कमीपणा, हाताची हालचाल, तोंडावरील भाव इत्यादि गोष्टी होत असतात व त्या सर्वांवरून मुलाला काय म्हणाव-

याचें तें इतरांना समजतें. “चा” “चा” या शब्दांत ‘आई, मला चहा दे’ इतकें वाक्य सामावलें असतें. सुरवातीचें हें एक शब्दात्मक वाक्य बालभाषेचें खरें द्योतक असतें.

हळूहळू मूल दोनदोन तीनतीन शब्दांचीं वाक्यें बोलूं लागतें. त्याची शब्दसंपत्तीहि वाढते. मुंबईतील मुलांची शब्दसंपत्ति पुढीलप्रमाणें आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वय पूर्ण वर्षें | ५, | ६, | ७, | ८, | ९. |
| माहीत असलेले शब्द | ५००, | ११४०, | १९९०, | २९१०, | ४१००. |

(स. रा. भट कृत “बाल विद्यार्थ्यांची मराठी शब्दसंपत्ति”)

अशा रीतीनें मुलें भाषा शिकत असतात. सर्वच मुलांचें शिक्षण सारख्या प्रमाणांत चालतें असें म्हणणें सयुक्तिक होणार नाहीं. भाषाशिक्षणांत शिकणारें मूल व त्याच्या आजूबाजूची परिस्थिति यांचा विचार लागतो. मुला-मुलांत व्यक्तिगत फरक असतात. वर दिलेलें भाषाशिक्षणाचें विवेचन सर्वसामान्य मुलांना लागूं व्हावयाचें आहे, एवढें ध्यानांत ठेवावें.

---

## प्रकरण ६ वें

# भाषाशिक्षणाचीं मूलतत्त्वें

कोणत्याहि कलेंत प्राविण्य मिळवितांना सतत प्रयत्न आणि मनःपूर्वक अभ्यास यांची आवश्यकता असते. एकच कला अपवादासारखी आहे. ही कला दिसते तितकी सोपी नाहीं. परंतु या कलेंतील स्वामित्व मनुष्य कोणताहि बुद्धिपुरस्सर प्रयत्न न करतां मिळवूं शकतो. ही कला म्हणजे बोलण्याची कला होय. ही कला अवगत करण्याचें सामर्थ्य निसर्गानें दिलेलें असल्यामुळें आपण सहजगत्या ही कला हस्तगत करतों. वास्तविक केवळ मातृभाषा शिकतांना या सहज शक्तीचा उपयोग होतो असें नव्हे. इतरहि भाषा शिकतांना ही शक्ति उपयोगितां आली पाहिजे. लहान मुलांत ही शक्ति जागृत असते म्हणून कोण-

तीहि भाषा मुलें चटकन शिकतात. आणि न अडखळतां बोलतात. मोठ्या माणसांत या शक्तीची तीव्रता कमी होते व नवीन भाषा शिकतांना त्यांना मोठे प्रयास पडतात. कांहीं प्रौढांत ही शक्ति दिसून येते व तेहि परकी भाषा अल्प प्रयासानें बोलूं शकतात.

या शक्तीची मीमांसा केल्यास त्यांतील अनेकविध पायऱ्या आपल्या ध्यानांत येतील. ( १ ) श्रवण ( ऐकण्याची शक्ति ) ( २ ) बोधन ( समजण्याची शक्ति ) ( ३ ) साहचर्य ( वस्तू आणि शब्द, क्रिया आणि शब्द यांची सांगड घालण्याची शक्ति ) ( ४ ) उच्चार वस्तू किंवा क्रिया ज्या शब्दानें ओळखली जाते तो शब्द उच्चारण्याची शक्ति ) ( ५ ) अनुकरण ( प्रौढ लोकांच्या उच्चाराप्रमाणें उच्चार करण्याची शक्ति ) ( ६ ) पुनरुच्चार ( ७ ) निवेदन ( विशिष्ट वस्तूंविषयीं अगर क्रियेविषयीं बोलतांना प्रयत्न किंवा सायास न करतां बोलण्याची शक्ति ) ( ८ ) साधर्म्यग्रहण ( सारख्या सारख्या गोष्टी एकत्र आणून निवेदन करण्याची शक्ति उ० उपमा, दृष्टांत ).

आतांपर्यंत सांगितलेल्या सर्व क्रिया लहान मूल भाषा शिकतांना उपयोगांत आणीत असतें. मात्र एक गोष्ट विसरावयाची नाहीं कीं मुलाला आपली भाषा वारंवार कानीं पडेल अशी परिस्थिति निसर्गतः उत्पन्न झाली पाहिजे. भाषा शिकण्याची सहजशक्ति असूनहि निर्जन अरण्यांत तिचा कांहीं उपयोग होत नाहीं.

मातृभाषा विनायासें शिकण्याची ही नैसर्गिक शक्ति भाषाशिक्षणांत फार महत्त्वाची आहे हें खरें असलें तरी भाषेचीं सर्व अंगें व उपांगें या शक्तीच्या जोरावर शिकूं म्हणणें अयोग्य होईल. लेखन, वाचन इत्यादि कला या शक्तीच्या कक्षेंत येत नाहींत. फक्त आपली भाषा चांगल्या तऱ्हेनें बोलतां येणें एवढेंच कार्य ही शक्ति करूं शकते.

लेखन–वाचनाप्रमाणें अलंकारिक, काव्यात्मक भाषा अवगत करणें ही गोष्ट भाषाशिक्षणांत समाविष्ट होते. हीं सर्व अंगें कृत्रिम आहेत, तीं एकाद्याला प्राप्त करून घेतां आलीं नाहींत एवढ्यानें त्याचा भाषाव्यवहार थांबेल असें नाहीं. परंतु या दोन्ही अंगांचा पूर्ण अभ्यास झाल्याविना भाषाविषय पुरा होत नाहीं. भाषेचीं हीं कृत्रिम अंगें शिकण्यासाठीं म्हणून निराळया पद्धतींचा अवलंब

करावा लागतो. याच पद्धतींना " अभ्यास-पद्धति " असें सोईसाठीं नांव देण्यांत येतें.

या पद्धतींत कोणत्या विशेष गोष्टी येतात ? भाषा शिकण्याची जी सहज पद्धति आहे त्यांत सर्व क्रिया विनायासें कोणताहि बुद्धिपुरस्सर प्रयत्न न करतां होतात. अभ्यासपद्धतींत बुद्धिपूर्वक प्रयत्न व एकाग्रता हीं आवश्यक असतात. या पद्धतींत विचार, मनन, अनुमान, निर्णय इत्यादि मानसिक क्रियांवर भर द्यावा लागतो. ही एक प्रकारची तपस्या आहे. नैसर्गिक पद्धतींतील यन्त्रवत् होणारें कार्य या पद्धतींत सुरवातीस तरी होत नाहीं.

वाक्यांचें पृथक्करण, संकलन, वाक्यांतील शब्द, त्यांचे अवयव, त्यांची व्युत्पत्ति, व साधनिका, लेखन, वाचन, व्याकरणाचे सर्व प्रकार, इत्यादि गोष्ट अभ्यास-पद्धतींत येतात.

नैसर्गिक पद्धतींत " श्रवणा " वर सर्व भर, अभ्यास-पद्धतींत "नयना' वर सर्व भिस्त असते. लेखन, वाचन, इत्यादि प्रकारांत डोळ्याशिवाय कसें' चालेल ? डोळ्याबरोबर हातालाहि या पद्धतींत महत्त्व येतें.

भाषाशिक्षणांत या दोन्ही पद्धतींचा यथायोग्य उपयोग करणें इष्ट असतें. शालेय शिक्षणांत यथावकाश नैसर्गिक पद्धति वापरावी; परंतु विद्यार्थ्यांच्या वयोमानानें अभ्यास-पद्धतीचा आश्रय करावा लागतो.

भाषाशिक्षणांत दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा ध्यानांत ठेवावयास पाहिजे. भाषा शिकणें म्हणजे मनाला एक प्रकारची संवय लावून घ्यावयाची असते. कोणतीहि संवय लागतांना त्या संवयीचा आरंभ ही फार महत्त्वाची पायरी असते. आपण मनांत आणलें, म्हणजे कोणतीहि संवय ( चांगली किंवा वाईट ) आपण सहज लावून घेतों. भाषाशिक्षणालाहि हा नियम लागू पडतो. परंतु फांदीला लावलेल्या वळणावरून झाडाची वाढ अनुमानितां येते, त्याप्रमाणें लहानपणीं जडलेल्या भाषाविषयक संवयीवरून मुलाचा भविष्यकाळ पारखतां येतो. लहानपणींच शुद्ध भाषा मुलाच्या कानावर सारखी पडत राहिली, त्याच्या निरीक्षण शक्तीला योग्य तो वाव मिळाला, तर त्या मुलाला भाषा सहज कमावतां येते. आणि एकदां कां यांत दोष राहिले म्हणजे मग सुधारणा करणें महाप्रयासाचें होतें. लहानपणीं लागलेले दोष सुधारण्यासाठीं अभ्यासक्रम आंखावा लागतो. या विवेचनावरून मुलांच्या शिक्षणाच्या बाबतींत घरच्या

मंडळीवर आणि विशेषत: बालवर्गातील शिक्षकांवर केवढी जबाबदारी आहे याची कल्पना आपणांस नीट येईल. त्यांत हिंदुस्थानची-परिस्थिति तर विलक्षण आहे. हजारों खेड्यांना अजून शिक्षणाचा स्पर्शहि झालेला नाहीं. म्हणून पालकाचीहि सर्व जबाबदारी खेड्यांतील शिक्षकांवरच येऊन पडल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

भाषाशिक्षणाचा अभ्यासक्रम सध्यां तरी अपूर्णावस्थेंत आहे. आपल्याकडे शैक्षणिक प्रयोग जवळ जवळ नाहींतच. चार सुशिक्षित एकत्र जमतात व अभ्यासक्रम तयार करतात. त्या अभ्यासक्रमाप्रमाणें शिक्षक आपलें कार्य करतात. पाश्चात्य देशांतील अभ्यासक्रमांचा आदर्श आपण आपल्या पुढें ठेवतों. इतकें असलें तरी अभ्यासक्रम तयार करतांना कांहीं गोष्टी दृष्टीआड करून चालत नाहीं. मोठमोठ्या शिक्षणतज्ज्ञांनीं ज्या गोष्टी मान्य केल्या आहेत त्या पुढील-प्रमाणें :—

( १ ) प्राथमिक तयारी.
( २ ) भाषाविषयक मानसिक वळण.
( ३ ) शुद्धता.
( ४ ) क्रम.
( ५ ) प्रमाणबद्धता.
( ६ ) प्रात्यक्षिकें.
( ७ ) आवड.
( ८ ) शास्त्रीय पद्धति.
( ९ ) अभ्यासाचे विविध मार्ग.

**( १ ) प्राथमिक तयारी :—** भाषेची कला अवगत करतांना इतर कलांप्रमाणें कलेचें तंत्र शिकावें लागतें व कलेचा प्रत्यक्ष अभ्यासहि करावा लागतो. पोहण्याचे कलेंतहि या दोन बाजू आहेत. पण पोहण्यांत तंत्रापेक्षां अभ्यास हाच जसा श्रेष्ठ तसेंच भाषा शिकतांना सुरवातीला तंत्र बाजूला ठेवावें व अभ्यासावरच अधिक भर द्यावा. पोहण्याच्या बाबतींत मनुष्यास आत्मविश्वास आला, म्हणजे मग तंत्राचा अभ्यास करून त्या कलेंत सुंदर विक्रम त्याला करतां येतात, तद्वतच भाषेची कला अवगत झाली म्हणजे तंत्राच्या अभ्यासाकडे लक्ष द्यावें. प्राथमिक अवस्थेंत दुसरा काय बोलतो तें नीट ऐकतां येण्यासाठीं श्रवणेंद्रियाला शिक्षण दिलें पाहिजे. त्याबरोबरच शुद्ध व स्पष्ट उच्चार करतां आले पाहिजेत. दुसऱ्याचें बोलणें एकदम समजलें पाहिजे व मनांतील विचार शब्दांची अडचण न आणतां सांगतां आले पाहिजेत. या तऱ्हेच्या अनेकविध उपायांनीं लहानपणीं मुलांना भाषा बोलतां आली पाहिजे.

**( २ ) भाषाविषयक मानसिक वळण :**—भाषा ऐकून व बोलून मनाला एक विशिष्ट वळण लागतें. आपला विचार सांगतांना आपण शब्द आठवत बसत नाहीं. शब्द आपोआप विचाराबरोबर बाहेर पडतात. परंतु मनाला लागलेलें भाषेचें वळण नेहमींच योग्य असतें असें नाहीं. निरनिराळ्या परिस्थितींचे आपल्या बोलण्यावर परिणाम होतात. शिष्ट भाषेंतील अनेक गोष्टी आपल्या भाषेंत दिसून येत नाहींत. उच्चारांची शुद्धाशुद्धता, लेखनांतील शुद्धाशुद्धें इत्यादि प्रश्न मनाला नवीन वळण लावल्यानेंच सुटावयाचे असतात.

**( ३ ) शुद्धता :**—देशोदेशीं व प्रान्तोप्रांतीं शिष्ट भाषा ठरलेली असते ती भाषा प्रमाण मानण्यांत येते. परंतु लहानपणीं झालेल्या संस्कारांत आपण कांहीं शब्द व उच्चार शिकतों. तें शिष्टसंमत नसतात. भाषा शिकतांना हे दोष टाळून आपणांला शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें यासंबंधीं अभ्यास करणें प्राप्त होतें.

**( ४ ) क्रम :**—भाषेच्या अभ्यासक्रमांत एक विशिष्ट क्रम ठेवावा लागतो. डोळ्यांपेक्षां कानांवर अधिक जोर देणें इष्ट असतें. मुलांनीं प्रथम पुष्कळ पुष्कळ ऐकलें पाहिजे, नंतर वाचन यावें. शब्दांचे अर्थ प्रथम मनावर ठसले पाहिजेत; मग त्या शब्दांचा उपयोग करून घ्यावा. वाचनाच्या बाबतींतहि प्रथम शिक्षकानें वाचावें नंतर मुलांनीं वाचावें. यापुढील पायरी दोघांनीं बरोबर वाचावें आणि नंतर एकेकट्या मुलास वाचावयास सांगावें. प्रथम प्रथम सांघिक कामाला पूर्ण अवसर द्यावा. सबंध वर्गानें एकदम कविता म्हणावी, मग एकेकट्याला काम सांगावें. प्रत्येक भागाची खूप उजळणी करून घ्यावी.

**( ५ ) प्रमाणबद्धता :**—प्रत्येक मुलाला शुद्ध बोलतां यावें व दुसरा बोलतो तें नीट समजावें; त्याचप्रमाणें त्याला शुद्ध लिहितां यावें व दुसऱ्याचें लिहिणें समजावें हे भाषाशिक्षणाचे अन्तिम हेतु आहेत. या हेतूंतील चारही भागांकडे योग्य तऱ्हेनें लक्ष पुरविलें गेलें पाहिजे. उच्चार, शुद्धलेखन, शब्दांचीं साधित रूपें, वाक्यरचना, व्युत्पत्ति इत्यादि अंगांचा योग्य प्रमाणांत परामर्ष घेतला जावा.

**( ६ ) प्रात्यक्षिकें :**—भाषा शिकवितांना शक्य त्या ठिकाणीं प्रत्यक्ष वस्तु दाखवाव्या; त्या त्या क्रिया कराव्या व करवून घ्याव्या. कांहीं ठिकाणीं चित्रांचा उपयोग करावा, कांहीं बाबतींत वर्णन करून ती ती गोष्ट शिकवावी.

**( ७ ) आवड** :—कोणतीही नवीन गोष्ट शिकतांना मुलांच्या ठिकाणीं आवड उत्पन्न झाली पाहिजे. आपण जी पद्धति उपयोगांत आणूं त्या पद्धतीवर विशेषतः आवड अवलंबून असते. शिकतांना मुलें गोंधळलीं, त्यांना समजेनासें झालें म्हणजे त्यांचीं मनें अभ्यासावर लागत नाहींत. त्यांना त्या विषयाची आवड उत्पन्न होत नाहीं. विषयांत आपली प्रगति होत आहे ही जाणीव मुलांना झाली तर त्या विषयाची गोडी त्यांना लागते. भाषाविषयक खेळांत हिरीरीनें भाग घेण्यानें मुलांची स्पर्धाबुद्धि जागृत होऊन तीं अभ्यासाला लागतात. या सर्व गोष्टी शिक्षक व विद्यार्थी यांच्या परस्परासंबंधीं वाटणाऱ्या आदरावर, परस्परांच्या मित्रभावावर अवलंबून असतात.

**( ८ ) शास्त्रीय पद्धति**—भाषेच्या अध्ययनासाठीं कोणती पद्धति उपयोजावी याबद्दल बराच वाद आहे. बोलणें आधीं कीं लेखन आधीं, वाक्यपद्धति चांगली कीं शब्दपद्धति चांगली, व्याकरणाची सुरवात केव्हां करावी कीं व्याकरण अजिबात शिकवूंच नयें इत्यादि अनेक प्रश्न आज चर्चिले जात आहेत. परंतु आधीं लेखन, सुटे सुटे शब्द, व्याकरणाचें अवडंबर या जुन्या पद्धति त्याज्य ठरत आहेत व नवीन नवीन शास्त्रीय पद्धति प्रयोगानें यशस्वी ठरत आहेत. त्याच पद्धतींचा अवलंब अभ्यासक्रमांत झाला पाहिजे.

**( ९ ) अभ्यासाचे विविध मार्ग** :—एकाच ठराविक चाकोरीनें विषय न शिकवितां जितक्या साधनांचा उपयोग करून घेतां येईल तेवढा अभ्यास अधिक दृढ होईल. वाचन सूक्ष्म असावें कीं स्थूल चालेल; पाठांतरांत ओळी पाठ कराव्या कीं एक गट पाठ करावा वगैरे अनेक प्रश्न उपस्थित झाले असतां एकाच मार्गाचा अवलंब न करतां यथावकाश व यथाशक्ति निरनिराळे मार्ग चोखाळावे.

वरील विवेचनावरून भाषाशिक्षणचा अभ्यासक्रम कोणत्या मूलभूत तत्त्वांवर आंखलेला आहे याची कल्पना येण्याजोगी आहे. आपली शिक्षण विषयक परिस्थिति किती हलाखीची आहे हें सांगावयास नकोच. धड घर नाहीं, धड अन्न नाहीं, धड वस्त्र नाहीं अशा दुबळ्या स्थितींत जगणारीं मुलें खेड्यांतील प्राथमिक शाळेंत आणावीं लागतात. त्यांचें मूळचें भाषावैभव तें काय असणार ? या भाषादारिद्र्यांत भाषेच्या वैभवाची बीजें पेरावयाचीं असतात. या कार्याला समर्थ असा शिक्षकवर्ग तयार करण्याचें आपल्या हातून होईल तेव्हांच आपल्या भाषेच्या वैभवमंदिराचा पाया पडेल.

---

## प्रकरण ७ वें

# तोंडीं काम ( निवेदन )

मूल भाषा कशी शिकतें आणि भाषा शिक्षणाचीं मूलतत्त्वें या प्रकरणांचा नीट अभ्यास केल्यास आपल्या सहज ध्यानांत येईल कीं, शाळेंतील भाषेच्या अध्ययनांत कान व तोंड यांना योग्य शिक्षण दिलें पाहिजे. मुलांनीं प्रथम पुष्कळ चांगल्या गोष्टी ऐकिल्या पाहिजेत आणि पुढें पुढें ऐकिलेल्या गोष्टी त्याला सांगतां आल्या पाहिजेत. यालाच तोंडी वाक्यरचना किंवा निवेदन म्हणतात. मुलांना शुद्ध बोलतां यावें, अगदीं सोप्या शब्दांत आपलें म्हणणें त्यांना स्पष्टपणें सांगतां यावें, ऐकणाऱ्यांना आपलें म्हणणें आवडावें अशी पद्धति मुलांच्या अंगवळणीं पडावी हे हेतु निवेदनाच्या मुळांशीं असतात. आपण बोलत आहोंत तें मुद्दाम शिक्षक विचारतात म्हणून अशी जाणीव निवेदनाच्या वेळीं मुलांच्या ठिकाणीं असूं नये. यदा कदाचित् असलीच तर ती काढून टाकण्याचा शिक्षकांनीं प्रयत्न करावा. मुलें आपापसांत जसें मन-मोकळेपणानें आपले अनुभव सांगतात किंवा आपल्या खेळण्याचें वर्णन करितात, तशीच रीत वर्गांतील निवेदनाची शक्यतों असावी. शक्यतों म्हणण्याचें कारण शाळेंतील अगर वर्गांतील एकंदर वातावरण थोडेसें कृत्रिम असतें. शिक्षक पुढें असल्यामुळें एक तऱ्हेचें दडपण त्यांच्या वर्तनावर पडतें. हें दडपण कमी करणें, कृत्रिमता घालवून नैसर्गिक वातावरण उत्पन्न करणें हें त्या त्या शिक्षकांच्या स्वभावावर अवलंबून असतें.

मुलांच्या निवेदनांत एक प्रकारचा जोर, स्पष्टता जिवंतपणा दिसला पाहिजे. व्याकरण शुद्धतेकडे थोडें कमी लक्ष दिलें तरी चालेल, भाषेचा नीटस-पणा दिसला नाहीं तरी हरकत नाहीं. दररोजच्या भाषेंतच मुलांनीं आपलें म्हणणें मांडावें. वाङ्मयीन गुण हा बालवर्गांतील किंवा पहिल्या इयत्तेंतील निवेदनाचा प्रमुख उद्देश नाहीं. वरच्या वर्गांत ही वाङ्मयनिर्मिति होणें शक्य आहे.

भाषा शिक्षणांतील निवेदन हें अंग फक्त बालवर्ग, पहिली, दुसरी इतक्याच वर्गापुरतें मर्यादित नसून त्याचा अभ्यास थेट सातवीपर्यंत अवश्येंकरून झाला पाहिजे. निवेदन हा लेखनाचा प्रबंधनाचा ( निबंध वगैरे ) पाया आहे. बोलतांना आपले छोटे छोटे विचार, चिमुकल्या कल्पना लहान मुलांना नीट स्पष्ट रीतीनें सांगतां आल्या, तरच त्या मुलांच्या लिखाणांत स्पष्टता, शुद्धता व आकर्षकता दिसून येईल. मानसशास्त्रवर्गांतील मुलांना निबंध, पत्रें, कल्पनातरंग, आत्मचरित्रें इत्यादि प्रबंधनाचे प्रकार चांगल्या रीतीनें लिहितां येत नाहींत याचें मुख्य कारण बालवर्गापासून सातव्या इयत्तेपर्यंत सर्व वर्गांतून निवेदनाविषयीं हलगर्जीपणा, उपेक्षा, दुर्लक्ष, शास्त्रीय पद्धतीचें अज्ञान इत्यादि गोष्टींत आढळून येईल. चांगल्या लिखाणाचें रहस्य चांगल्या निवेदनांत आहे हें शिक्षकांनीं विसरूं नये. मानसशास्त्रदृष्ट्याहि मुलांच्या व्यक्तिमत्वाच्या वाढीस निवेदनाचें बहुमोल साहाय्य होतें. आपल्या वर्गातील बालमित्रांसमोर आपलें भाषण करतांना मुलांच्या आत्माविष्काराला अवसर मिळतो. संघासमोर बोलतांना मुलांच्या संघप्रवृत्तीला चांगलें वळण लागतें. वेळप्रसंगीं काय बोलावें, कसें बोलावें ही समयसूचकता लहानपणीं अंगांत बाणली तर भावी आयुष्यांत कल्याणच होण्याचा संभव असतो.

भाषाशिक्षणांत निवेदनाला किती महत्त्व आहे हें आपल्या ध्यानांत येईल. निवेदनाच्या संवयीनें मुलगा उभा राहून चारचौघांत चार वाक्यें सुसुत्रितपणानें बोलूं लागला म्हणजे समजावें कीं त्याचें मन योग्य रीतीनें विचार करूं लागलें. सध्यां आपल्या प्राथमिक शाळांत निवेदनाला स्थान आहे का, असल्यास त्याचा उपयोग केला जातो का याचा विचार शिक्षकांनीं अवश्य करावा.

निवेदनाच्या वेळींच आणखी एक महत्वाची गोष्ट शिक्षकांनीं दृष्टीसमोर ठेवावयास पाहिजे. सध्यां आपल्या शाळांतून या मुद्यांकडे भयंकर दुर्लक्ष केलें जात आहे. किंबहुना खालीं विवेचित होणारें अंग भाषा शिक्षणाच्या प्रधान अंगांपैकीं मुलभूत घटकांपैकीं एक आहे याची जाणीवच किती शिक्षकांना आहे? मुलांच उच्चार योग्य होण्यावर मुलांची वरच्या वर्गांतील प्रगति अवलंबून असते. मुलें निरनिराळ्या शब्दांचे उच्चार करतात, त्यांत घरांतील मंडळी व आजूबाजूची परिस्थिति यांचें वळण फार उतरतें ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. मुलांचें स्वराघात, उच्चार इत्यादि गोष्टींत जी अशुद्धता असते, मुलांच्या बोलण्यांत जो एक प्रकारचा गबाळीपणा दिसतो, या सर्वांची जबाबदारी आईबापांवर आणि

घरांतील मंडळींवर पडतेच पडते. कारण शाळेंत येण्यापूर्वी मुलांनीं आपापल्या घरांत ही सर्व कमाई संग्रहित केलेली असते. त्यांत बालवर्गाच्या शिक्षकानें स्वतःच्या अशुद्धतेची भर घातली म्हणजे आटोपलाचा भाषेचा संसार !!

म्हणून उच्चारशुद्धतेंत पहिली गोष्ट म्हणजे शिक्षकाची भाषा सुसंस्कृत, उच्चार शुद्ध, स्वराघात योग्य असले पाहिजेत. मुलें शिक्षकाच्या भाषेचें अनुकरण तत्काळ करितात यासाठीं अनुकरणीय अशा भाषेचा आदर्श शिक्षकानें मुलांसमोर ठेवावा. म्हणजे अजाणतपणें मुलांचे उच्चार शुद्ध तऱ्हेचे होतील.

शिक्षकानें करावयाची दुसरी गोष्ट म्हणजे योग्य उच्चार न करणाऱ्या मुलांकडे अधिक लक्ष पुरविणें ही होय. मात्र या बाबतींत एक सावधानतेची सूचना द्यावयाची कीं, अशा मुलांना एकेकटे निवडून त्यांना उच्चारांची सारखी संथा देणें चुकीचें होईल. असें केल्यानें त्या मुलाला आपली भाषा वाईट अशी जाणीव उत्पन्न होते. निवेदनाच्या वेळीं कांहीं केल्या तें मूल बोलत नाहीं. व अभ्यासांत भाग घेत नाहीं. इतर मुलांबरोबरच या मुलांना शुद्ध उच्चार करावयास लावणें परिणामाच्या दृष्टीनें हितावह ठरेल.

या बाबतींत शिक्षकांनीं मोठ्या काळजीनें एक पूर्वयोजना आंखणें अगत्याचें आहे. निवेदनाच्या वेळीं निरानिराळीं साधनें ( पुढील प्रकरण पहा ) उपयोगावयाची असतात ! यावेळीं कोणाचे उच्चार, स्वराघात कसे आहेत याचें टिपण तयार करणें फार फायद्याचें होईल. पुष्कळशा मुलांना 'शं,' 'ष,' 'स' हे उच्चार अजिबात जमत नाहींत. कित्येकांच्या 'न' आणि 'ण' यामधील फरक ध्यानांत येत नाहीं. 'क'च्या ठिकाणीं 'ख,' 'ग'च्या ठिकाणीं 'घ' अशा रीतीनें कवर्गादि पांच वर्गांतील पहिल्या अक्षराऐवजीं दुसरें व तिसऱ्या ऐवजीं चौथें उच्चारण्याची पुष्कळ मूलांना मुळची संवय असते. उ. काठी–खाटी, गहूं घऊ, बरणी–भरणी, टांक–ठांक. वरच्या वर्गांतील मुलें सुद्धां पुढील शब्द अशुद्ध उच्चारतांना आढळतात. पश्चिम—पाश्छिम, उत्सव–उच्छव, पश्चात्ताप–पच्छाताप, तीक्ष्ण–तीक्षण, आशीर्वाद–आछिर्वाद, सूर्य–सुर्य इ. बोलतांना किंवा वाचतांना भलत्याच ठिकाणीं थांबल्यामुळें पुष्कळदां अर्थाचे अनर्थ होतात. या आणि अशाप्रकारच्या सर्व दोषांची नोंद शिक्षकानें करावी. निवेदनाच्या वेळीं शिक्षकानें मुलांना मध्येंच थांबविण्यांत मोठा रसभंग होतो. फारच मोठी चूक असली

तर सुधारावी. पण वेळापत्रकांत एकादा तास राखून ठेवावा व हे दोष निरनिराळ्या मनोरंजक साधनांनीं सुधारावेत.

उच्चार सुधारूं इच्छिणाऱ्या शिक्षकानें उच्चारशास्त्राचा यथाशक्ति अभ्यास करणें हितावह असतें. निरनिराळे वर्ण उच्चारतांना जीभ कशी वळवावी, तोंडांतील कोणत्या भागाला टेकावी, ओठ किती प्रमाणांत मिटावें इत्यादींचा अभ्यास केल्यास मुलांना शिकवितांना फार सोईचें होईल. 'श,' 'ष,' 'स' यांचे उच्चार शिकवितांना हे वर्ण असलेले पुष्कळसे शब्द शिशुगीतांत असले तर त्याचा उपयोग करणें आवश्यक असतें; किंवा हे वर्ण असणारे निरनिराळे शब्द चित्रांसह मुलांसमोर ठेविल्यास अमुक वर्ण आपण शिकत आहोंत, अशी जाणीव उत्पन्न न होतां अशुद्ध उच्चाराचीं मुलें सामुदायिक वाचनांत हळूहळू शुद्ध उच्चार करूं लागतात. उच्चार सुधारण्याचें काम एकाच दिवसांत होत नाहीं. त्याला बराच कालावधि लागतो. हें काम शिक्षकाच्या दृष्टीनें बरेंच कंटाळवाणें असतें. परंतु मुलांचें भावी कल्याण नजरेसमोर ठेऊन यांतूनहि मार्ग काढणें हें शिक्षकाच्या कर्तव्यकर्मांतील अंग आहे. सध्यां बालवर्गांत साठ, सत्तर मुलें सुद्धां असतात. खेड्यांत तर एकाच शिक्षकाला अनेक वर्ग संभाळावे लागतात हें सर्व खरें. परंतु त्यांतल्यात्यांत वेळ काढून उच्चार सुधारण्याकडे शिक्षकांनीं अवश्य लक्ष द्यावें.

मात्र कांहीं मुलांच्या ठिकाणीं जन्मतःच कांहीं शारीरिक व्यंगें असतात आणि त्यामुळें त्यांना कांहीं शब्द उच्चारतां येत नाहींत. या बाबतींत शिक्षक कांहीं करूं शकणार नाहीं. वैद्यकीय तपासणी शाळाखात्यामार्फत झाल्याशिवाय अशीं मुलें सुधारणें अशक्य आहे. मुलांचा तोतरेपणा हा एक दोष नेहमीं दृष्टीस पडणारा असतो. त्याचप्रमाणें किनऱ्या व पिचक्या आवाजाचींहि थोडीं मुलें असतात. वैद्यकीय तपासणीमुळें हे दोष निवारता येण्याजोगे असतात. परंतु तोतरेपणासारखी न्यूनता मानसिक गंडांमुळें उत्पन्न होण्याची संभाव्यता असते. अत्यंत धाकांत वाढलेलीं मुलें किंवा शिक्षकांबद्दल मनांत वाटणारी भीति यामुळें कांहीं मुलें बोलतांना अडखळतात, बोललीं तर तोंडांतल्यातोंडांत पुटपुटतात. आईबाप, पालक आणि शिक्षक यांच्या सहकार्यानेंच मुलांच्या ठिकाणीं दिसणारे हे दोष दूर करतां येतील.

उच्चार सुधारण्याला साहाय्य म्हणून पुढील सूचना शिक्षकांनीं ध्यानांत ठेवाव्या.

१ शिक्षकाचे उच्चार शुद्ध व स्पष्ट असावेत. बोलतांना शिक्षकानें घाई न करतां सगळ्यांना ऐकूं जाईल अशा आवाजांत बोलावें.

२ ज्यांचे दोष सुधारावयाचे असतील, अशा मुलांना दोषांची जाणीव मुद्दाम करून देऊं नये. त्याला नकळत सुधारणा होईल अशी योजना करावी.

३ या बाबतींत आईबाप किंवा पालक यांचें सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न करावा.

४ उच्चारांच्या दोषांमुळें शिक्षक आपल्याकडे दुर्लक्ष करितात ही गोष्ट त्या मुलास समजली तर फार अनिष्ट परिणाम होतो. हस्तव्यवसाय, लेखन, चित्रकर्म, खेळ इत्यादि विषयांत अशा मुलांना पुढें आणण्याचा शिक्षकानें प्रयत्न करावा. एकीकडची कमताई दुसरीकडे भरून निघाली म्हणजे हींच मुलें जोरानें अभ्यास करूं लागतात.

५ वाणींत दोष असलेल्या मुलांना बारिक-सारिक ठिकाणीं बोलण्याला अधिक अवकाश द्यावा. मधून मधून या मुलांना व्यक्तिशः पाठ द्यावे. लहान लहान गट करून, त्या गटांत या मुलाकडून वाचन घ्यावें किंवा कविता म्हणून घ्याव्या, एकंदरींत त्यांच्या वाणींतील दोष घालविण्याला जितकी मदत करतां येईल तेवढी अवश्य करावी. चुकून सुद्धां अशा मुलांवर त्यांच्या दोषांसाठीं रागावूं नये. अगर वर्गासमोर त्यांच्या दोषांची थट्टा किंवा उपहास करूं नये. शिक्षकाच्या सहानुभूतीनें मुलांचे दोष मूलतः नाहींसे होण्याचा फार संभव असतो. पुढील उपायांचा अवलंब शिक्षकानें करून पाहावा.

१ जिभेला वळण लागेल अशीं अनुप्रासाचीं वाक्यें मुलांना म्हणावयास सांगावीं. सशाच्या शेपटीवर शंकराची सावली पडली. अशीं अनुप्रासयुक्त वाक्यें शिक्षकाला तयार करतां येतील.

२ ज्या वर्णाचा उच्चार शिकवावयाचा असेल असे वर्ण नांवांत असलेल्या वस्तूंचीं चित्रें दाखवावीं. मुलांकडून त्या वस्तूंचीं नांवें म्हणवावीं.

३ दीर्घ श्वसनाचा व्यायाम दिवसांतून दोनदां तरी विद्यार्थ्यांकडून करून घ्यावा.

४ श्रवणेंद्रियाच्या शिक्षणासाठीं शिक्षकानें निरनिराळे आवाज करावे व मुलांना ते करावयास सांगावे. हे आवाज करतांना वर्णाचा भरपूर उपयोग करावा. शिक्षकानें अपुरीं वाक्यें द्यावीं, मुलांनीं तीं पुरीं करावीं; मात्र वाक्यें पुरीं करणारे

शब्द असे असावेत कीं त्यांत मुलें उच्चारतांना दोष करतात. लहान लहान अभिनय गीतें मुलांनीं तोंडपाठ करावीं. या गीतांत शिक्षकांना हवे असलेले शब्द यावेत.

एकंदरींत बालवर्ग, पहिली इयत्ता, दुसरी इयत्ता या वर्गांत "तोंडी काम" या सदराखालीं नवीन अभ्यासक्रमांत ज्या गोष्टी दिल्या आहेत, त्यांचें महत्व काय हें आमच्या शिक्षक बंधूंच्या लक्षांत आतां आलें असेल "तोंडीं काम" म्हणजेच निवेदन आणि चांगलें निवेदन म्हणजे उत्तम लेखन असा न्याय असल्यामुळें विद्यार्थ्यांचें परीक्षेंतील नव्हें, तर जीवितांतील यश निवेदनावर अवलंबून आहे, ही जाणीव शिक्षकांनीं ठेवावी.

---

## प्रकरण ८ वें

# निवेदनाचीं साधनें

१ **वाक्यरचना**:—चित्रांच्या साहाय्यानें मुलांकडून लहान लहान वाक्यें बनवून घेणें. या वाक्यरचनेसाठीं मुलांच्या ओळखीचे प्राणी, पदार्थ अगर मुलांना अनुभवास येणारे प्रसंग असावे. बालवर्गांत 'घरची मंडळी,' 'माझें घर,' 'माझा पोशाक,' 'गाय,' 'बैल,' 'गाडी' इत्यादि विषयांवर वाक्यें रचून घ्यावीं. आपापल्या गांवची किंवा खेड्याची परिस्थिति व समाज ध्यानांत घेऊन शिक्षकानें विषय निवडावे. बालवर्गांत तीन तीन, चार चार शब्दांचीं वाक्यें पुरे होतील. पहिल्या इयत्तेंत जरा अधिक कठिण विषय घ्यावे. चित्रांचाहि उपयोग करावा. प्रथम चित्र दाखवावें. निरनिराळे प्रश्न विचारून वाक्यात्मक उत्तरें काढून घ्यावीं. हीं उत्तरें एकेकट्या मुलाकडून म्हणून घ्यावीं. मग सामुदायिक उत्तरें घ्यावीं. दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेंत निवेदनाच्या पाठाला लेखनाचें साहाय्य द्यावें. पाठांत उपयोगांत आणलेल्या चित्रावरच आधारलेले व ज्यांची चर्चा निवेदनांत झाली आहे असे सात आठ प्रश्न एका निराळ्या फळ्यावर आधींच लिहून तयार ठेवावे. निवेदन संपल्यानंतर तो फळा मुलांसमोर ठेवावा व त्यांवरील प्रश्नांचीं उत्तरें लिहावयास सांगावीं. अशा प्रकारच्या वाक्यरचनेची संवय झाली म्हणजे निवेदनानंतर फळ्यावर प्रश्न

लिहिण्याऐवजीं मुख्य मुख्य शब्द लिहावे, व त्या शब्दांचा उपयोग करून मुलांना वाक्यें लिहिण्यास सांगावें. अशा तऱ्हेच्या पाठांत मुलें मोठ्या आनंदानें भाग घेतात व पुष्कळदां चांगलीं चांगलीं उत्तरें देतात. त्याबरोबर त्यांचें लेखनहि सुधारतें. शाळा सुरू होण्यापूर्वी वाक्यरचनेला योग्य असे विषय एका वहींत नोंदून ठेविल्यास शिक्षकाचे पुष्कळ श्रम कमी होतात, कारण दर वर्षी तेच तेच विषय घ्यावयाचे असल्यामुळें एकदां काम झालें म्हणजे त्याचा वर्षानुवर्ष उपयोग करून घेतां येतो.

( २ ) **वाक्यें व उत्तरें यांचा खेळः**—फळयाच्या एका बाजूस पुष्कळ प्रश्न लिहावे व त्या समोरच वरखालीं क्रम असलेलीं त्या प्रश्नाचीं उत्तरें लिहावीं. मुलांनीं प्रश्न व त्यांचें योग्य उत्तर मोठ्यानें म्हणावयाचें.

( ३ ) **कूटप्रश्नः**—'मी वाटोळा असून गुबगुबित आहें. माझा देह चामड्याचा आहे. मी फक्त हवा खातों, तरी सुद्धां लोक मला सारखे लाथाडतात, तर मी कोण'? असे कूटप्रश्न मुलांना सोडविण्यास सांगावे. बदल म्हणून शिक्षकानें वस्तूचीं नांवें द्यावीं व त्यांवर मुलांनीं कूटप्रश्न रचावे.

( ४ ) निवेदनाच्या वेळीं हस्तव्यवसायाचा फार उपयोग करून घेतां येईल. मुलांनीं निरनिराळ्या वस्तु बनविलेल्या असतात. अमुक वस्तु कशी बनविली हें मुलांनीं सांगावें. गटगटानें सुद्धां असे खेळ घेतां येतील. याशिवाय "आई चहा कसा तयार करते?" "तूं पतंग कसा करतोस?" "पतंग कसा उडवितोस?" "हुतुतू कसा खेळतां?" इत्यादि प्रश्न विचारून मुलांकडून सात आठ वाक्यें तयार करून घेतां येतील. अशा प्रकारचे प्रश्न वरच्या वर्गांतहि फार उपयुक्त ठरतील.

( ५ ) **कल्पना-तरंगः**—मी अमुक असतों तर इत्यादि कल्पनेला चालना देणारे विषय निवेदनांत अवश्य द्यावेत. मी शिक्षक असतों तर, मी राजा झालों तर, मी पक्षी झालों तर—या विषयांत मुलांच्या दडपलेल्या इच्छांना पुरा वाव मिळतो व मुलें मनमोकळेपणानें आपलें म्हणणें इतर मुलांसमोर मांडतात.

( ६ ) **" कशी आहे वस्तु " खेळः**—मधल्या सुट्टींत किंवा खेळण्यासाठीं मुलें वर्गाबाहेर गेलीं, म्हणजे त्यांच्या दप्तरांतील अगर खिशांतील एखादी वस्तु शिक्षकानें काढून आपल्याजवळ ठेवावी. मुलें परत आलीं व वर्ग सुरू

झाला म्हणजे आपापलीं दप्तरें व खिसे पाहाण्यास सांगावें. अनेक मुलें आपलें अमुक हरवलें म्हणून गिल्ला करतील. शिक्षकांनीं सर्वांना गप्प करावें व सांडलेल्या वस्तूचें वर्णन त्या त्या मुलाकडून करून घ्यावें.

(७) "वाट दाखव" खेळ:—ज्या रस्त्यानें मुलें शाळेंत येतात, त्या रस्त्याचें अगर वाटेचें वर्णन मुलांनीं करावें. वाटेंतील मुख्य मुख्य गोष्टी वगळूं नयेत. 'स्टेशनवर कोणत्या रस्त्यानें जाशील ?" "बाजारांत मला जावयाचें आहे. कसा जाऊं"? "देवळाचा मार्ग कोणता ?" इत्यादि प्रश्नांनीं आपापल्या मुख्य स्थलांचे रस्ते मुलांना सांगतां यावेत.

(८) तर्काचे खेळ:—"आतां आपली मोटार आली, म्हणून त्यांची किंमत कमी झाली. तसा तो दिसायला चांगला आहे. आपणाला तर किती तरी उपयोगी आहे. पूर्वी तर त्याच्या शिवाय् राजाचें चालत नसे," अशा तऱ्हेनें वर्णन करतां करतां मुलें तर्क करतात कीं, हें घोड्याबद्दल आहे. अशीं वर्णनें मुलांना करावयास सांगावें. अर्थातच हें निवेदन वरच्या वर्गाला उपयोगी आहे.

(९) चर्चा-प्रश्न:—मधून मधून मुलांना वाटेल त्या विषयावर प्रश्न करावयास सांगावेत. त्या प्रश्नांचीं उत्तरें इतर मुलांनीं द्यावीत. उत्तरें देण्यास कोणी समर्थ नसल्यास शिक्षकानें द्यावीत.

(१०) नाट्यीकरण:—क्रमिक पुस्तकांतील किंवा वर्गात सांगितलेल्या गोष्टीचें नाटक करून घेणें. यांत मुलें मोठ्या आनंदानें भाग घेतात.

(११) वादविवाद आणि व्याख्यानें:—सोप्यासोप्या विषयांवर वाद-विवाद करवावेत. या प्रसंगीं शिक्षकानें प्रत्यक्ष भाग घेऊं नयेत. मुलांपैकींच एकानें अध्यक्ष व्हावें. अध्यक्षांच्या सूचनेपासून आभार मानण्यापर्यंतचीं सर्व कामें विद्यार्थ्यांनींच करावीं. शिक्षकानें बाजूला राहून सर्व गोष्टींचें निरीक्षण करावें. चुका टिपून ठेवाव्यात. सोप्या विषयांवर मुलांचीं व्याख्यानें करावीत. ह्या गोष्टी वरच्या वर्गात अधिक प्रमाणांत असाव्यात.

(१२) गट-चढाओढी:—वर्गातील मुलांचे दोन भाग करावेत. प्रत्येक गटानें एकमेकांस प्रश्न विचारावे, म्हणी लावाव्या, शब्दाचा उपयोग वाक्यांत करावयास सांगावा वगैरे.

( १३ ) **गोष्टी:**—निवेदनाला गोष्टींसारखें मनोरंजक साधन दुसरें नाहीं. लहान लहान मुलांना सुद्धां चिमुकल्या गोष्टी सांगतां येतात. घरीं ऐकलेल्या गोष्टी लहान मुलें मोठ्या गमतीनें सांगतात. शिक्षकानें त्यांना उत्तेजन दिलें पाहिजे. मधून मधून शिक्षकानें अर्धी गोष्ट सांगावी व त्या गोष्टीचा शेवट कसा करावा हें मुलांना विचारावें. एकाद्या गोष्टीची सुरवात व शेवट फळयावर लिहावा व ती गोष्ट मुलांनीं पुरी करावी. गोष्टींतील प्रसंगांचीं चित्रें मुलांना दाखवावीं व चित्रां-वरून गोष्ट रचून घ्यावी. गोष्टींतील मुख्य मुख्य शब्द फळयावर लिहावे व त्यांच्या साहाय्यानें गोष्ट बनवून घ्यावी. एकाद्या गोष्टीच्या सुरवातीचें वाक्य एका मुलानें सांगावें व मग प्रत्येक मुलानें एक एक वाक्य सांगून गोष्ट पुरी करावी. मुलांच्या बुद्धीला चालना देईल अशी पद्धति अवलंबून कितीतरी प्रकारांनीं मुलांकडून गोष्टी सांगून घेतां येतील.

( १४ ) **पुस्तक-परीक्षण:**—स्थूल वाचनासाठीं वाचनालयांतील पुस्तकें मुलें वाचतात. अशा पुस्तकांपैकीं मुलांला कोणतें पुस्तक आवडलें व तें कां आवडलें हें सांगावयास सांगावें. त्यावर चर्चा करवावी.

( १५ ) **क्रमांक १:**—या सदरांत वाक्यरचनेसाठीं चित्रांचा उपयोग करावा असें सुचविलें आहे या चित्रांसंबंधीं जरा अधिक विवेचन होणें युक्त आहे चित्रांमुळें मुलांच्या ठिकाणीं अभ्यासाची आवड उत्पन्न होते व चित्रें पाहिल्या-बरोबर मुलें चित्रांबद्दल बोलूं लागतात. एकाद्या विषयाची कल्पना स्पष्ट होण्यास चित्रांचें फार साहाय्य होतें.

पाठांत चित्रांचा उपयोग करितांना कांहीं गोष्टींकडे शिक्षकांनीं लक्ष द्यावें. चित्राची निवड विषयानुरूप असावी. चित्राचा आकार मोठा असावा. सर्व मुलांना चित्रें चांगल्या रीतीनें दिसलीं पाहिजेत. ज्या भागांबद्दल कांहीं विचारावयाचें असेल अगर कांहीं सांगावयाचें असेल ते भाग चित्रांत प्रामुख्यानें दिसावेत. मानवी आकृतींत जिवंतपणा असावा. पाठांत उपयोगावयाचें चित्र भिंतीवर योग्य स्थळीं टांगावें व विशेष प्रस्तावना न करतां मुलांना चित्र पाहण्यास सांगावें. नंतर प्रश्नोत्तर पद्धतीनें चर्चा सुरू करावी. चर्चा संपल्यावर चित्रासंबंधीं सर्व माहिती संगतवार रीतीनें मुलांकडून काढून घ्यावी. मधून मधून महत्त्वाचे शब्द अगर वाक्यें शिक्षकानें फळयावर लिहिण्यास लेखनाच्या वेळीं मुलांना सोयीचें होतें. निवेदनाच्या वेळीं लेखनावर भर देऊं नये. परंतु पुढच्या एका तासाला त्या चित्रासंबंधीं लेखन करून घ्यावयास हरकत नाहीं.

प्राथमिक शाळांत चित्रांचा उपयोग करून शिकवावयाच्या पाठाचे कांहीं विषय पुढें दिले आहेत. शिक्षकांनीं विषयानुरूप व शिकविण्याच्या सोईप्रमाणें चित्रें तयार करून द्यावीं अगर आयतीं विकत मिळत असल्यास तीं खरेदी करावींत.

( १ ) बालवर्गः—माझें शरीर ( हात-पाय वगैरे ); माझा पोषाख, माझें पुस्तक, माझें घर, आई, बाप, मुलें, जेवण, खेळणीं, गाय, बैल, शेळी, घोडी, म्हैस वगैरे प्राणी, आंबा फणस वगैरे झाडें, नदी, तळें, विहीर वगैरे शेजारचीं दर्शनीय स्थळें.

( २ ) इयत्ता १ लीः—रस्ता, घरांतील व्यवस्था; शाळा आणि वर्ग; शाळेची बाग; बाजार; गावांतील देऊळ वगैरे प्रसिद्ध ठिकाणें, साधे सावे खेळ.

( ३ ) इयत्ता २ रीः—रेल्वे-स्टेशन, डोंगरावरील दृश्य; नदीचें दृश्य; बाजाराचें दृश्य, पोस्टमन, नागपंचमीसारखे सण.

( ४ ) इयत्ता ३ रीः—लोहार, सुतार इत्यादि कारागीर, पोलिस, तलाठी वगैरे कामगार, निरनिराळे खेळ, गावांतील जत्रा, लहान लहान प्रवास, सणाचे दिवस, वरील यादी पूर्ण स्वरूपाची नाहीं. शिक्षकांना ध्यानांत यावें एवढ्यासाठीं कांहीं विषय सुचविले आहेत. कांहीं कांहीं विषय सगळ्याच वर्गांतून घेण्याजोगे आहेत. मात्र प्रश्न व उत्तरें अधिकाधिक कठीण असावींत.

एकंदरींत मुलांना आनंद वाटेल, तीं चांगल्या रीतीनें बोलतील, त्यांची भाषा शुद्ध व स्पष्ट होईल हाच प्रमुख हेतु मनांत बाळगून निवेदनाचे पाठ योजावेत. या बाबतींत शिक्षकाच्या योजनाचातुर्यावर पुष्कळसें यश अवलंबून आहे. एकदां योजना यशस्वी झाली म्हणजे शिक्षकाचें श्रम कमी कमी होत जातील. विद्यार्थी बदलणारे व शिक्षक कायम अशी स्थिति असल्यावर शिक्षकाला सर्व गोष्टी अंगवळणीं पडून काडीमात्रहि त्रास घ्यावा लागणार नाहीं.

## प्रकरण ९ वें

# गोष्ट कशी सांगावी ?

कीर्तनकार, पुराणिक, प्रचारक इत्यादि लोक श्रोत्यांचीं मनें आकर्षून घेण्यासाठीं जीं साधनें वापरतात त्यांतील प्रमुख म्हणजे गोष्टी किंवा कथा होय. कथाकथन —गोष्ट सांगणें— ही एक कला आहे आणि इतर कलांप्रमाणें अभ्यासानें ही कला हस्तगत करून घेणें शक्य आहे. निवेदनाच्या अनेक अंगांपैकीं गोष्ट हें अंग असून तें फार महत्त्वाचें व परिणामकारी असल्यामुळें त्याचें विवेचन या स्वतंत्र भागांत केलें आहे.

प्रत्येक देशाच्या वाङ्मयांत कथावाङ्मय मोठ्या प्रमाणांत दिसून येतें. या कथांतून नीतिबोध प्रत्यक्ष स्वरूपांत नसतो; परंतु अप्रत्यक्ष रीतीनें कांहींना कांहीं बोध मिळूं शकतो. संस्कृतांतील पंचतंत्र, हितोपदेश वगैरे पुस्तकांतून असणाऱ्या पशुपक्ष्यांच्या, माणसांच्या, यक्षसिद्धांच्या कथा, पुराणांतील देवदानवांच्या, ऋषितपस्व्यांच्या, अप्सरागंधर्वांच्या, शूर व त्यागी स्त्रीपुरुषांच्या कथा आज हजारों वर्षे हजारों मानवांचीं मनें रंजवीत आहेत व अद्यापीहि त्यांतील गोडी अवीट आहे. मुलांना तर गोष्टीसारखें तनमन हरण करणारें दुसरें खाद्यच नाहीं. गोष्ट म्हटली कीं त्याचे कान टवकारले, चेहरे उत्सुक झाले, आसनें स्थिर झालीं. जेवण नको खाण नको असें देहभान हरविण्याचें सामर्थ्य गोष्टींत आहे. शिक्षणांत या गोष्टींचा शक्य तितका उपयोग करून घेणें व आपला पाठ मनोरंजक करणें हें शिक्षकांचें कर्तव्यच ठरतें.

अभ्यासक्रमांत असा एकहि विषय नाहीं कीं ज्यांत गोष्टींचा आधार घेतां येणार नाहीं. इतिहास म्हणजे तर गोष्टीच गोष्टी. त्या घनघोर लढाया, ते दिग्विजयाचे पराक्रम, वीरपुरुषांचे धाडसी प्रयत्न, गुप्तकट एक ना दोन हजारों गोष्टीरूप प्रसंगांनीं इतिहासाचें क्षेत्र अथांग भरून गेलें आहे. भूगोलांतहि गोष्टींना कांहीं कमी वाव नाहीं. भूगोलावरील अनेक प्रदेश, नद्या, पर्वत शोधून काढणाऱ्या धाडसी प्रवाश्यांचीं जीवनचरित्रें अत्यंत मनोवेधक, रम्य, अद्भुत प्रसंगांनीं भरलेलीं असतात. शास्त्रीय विषयांतील मोठमोठे शोध व अलौ-

किक शोधक गोष्टीरूपानें मुलांसमोर येणें सोयीचें व फायदेशीर असतें. एकंदरीत अध्यापनांत गोष्टींना फार महत्त्व आहे व त्यांचा मोठ्या प्रमाणांत उपयोग केला पाहिजे ही गोष्ट निःसंशय खरी आहे.

गोष्टी ऐकण्यांत लोकांस–विशेषत: मुलांस–कां आनंद होतो याची थोडीशी मीमांसा केल्यास तें अनाठायीं होणार नाहीं वाङ्‌मयाच्या अनेक प्रकारांप्रमाणें गोष्टींत कलेचा भाग मोठा असतो. कलेचा अंतिम उद्देश आनंद–सात्विक आनंद देणें हा होय. गोष्टींमुळें मुलांना आनंद होतो व त्यांत तीं रमतात. मानसशास्त्राप्रमाणें बाल्यावस्थेंतील मुलें कल्पनातरंगांत दंग असतात. आपल्या भोंवतीं कल्पना साम्राज्य निर्माण करून त्यांत आवडतें काम आपण करावें हें लहान मुलांचें करमणुकीचें एक मोठें साधन असतें. दररोजच्या व्यवहारांत ज्या गोष्टी त्यांना करणें अशक्य होतें. गोष्टी कल्पना साम्राज्यांत मुलें करून घेतात व एक तऱ्हेनें आपली इच्छा तृप्त करतात. गोष्टी ऐकतांना अगर वाचतांना मुलें त्या गोष्टींतील प्रमुख पात्राशीं तादात्म पावून एक प्रकारचें समाधान उपभोगीत असतात. ऐकलेल्या गोष्टीचें नाटक करतां येतें आणि या नाटकाला तर मुलांची एका पायावर तयारी असते. गोष्टींतील आनंद आणि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आत्मा विकासाला मिळणारा अवसर यामुळें लहान मुलांच्या मनावर गोष्टींची मोठी पकड असते.

गोष्टींतील या गुणांचा फायदा शिक्षकानें अवश्य करून घ्यावयास पाहिजे. मुलांच्या सहज प्रकृतीला कोणत्याही तऱ्हेनें बंधारा न घालतां गोष्टींच्या साहाय्यानें कितीतरी अभ्यास मुलांकरवीं आनंदानें करून घेतां येतो. गोष्टीचा अवलंब केला म्हणजे मुलांचें अवधान पाठाकडे लागतेंच. शिवाय चांगल्या चांगल्या गोष्टी सांगणारे गुरुजी मुलांना फार आवडतात. मुलांच्या ठिकाणीं गुरुजींबद्दल आदर उत्पन्न होतो. आदरानें वर्गांत शिस्त राहते व शिस्त असली म्हणजे मुलांचीं मनें पाठांत रंगतात, एकाग्र होतात.

मुलांसाठींच म्हणून गोष्टी रचावयास लेखक बसला म्हणजे एका विशिष्ट तंत्राचा त्यानें आश्रय केला पाहिजे. अशा गोष्टींतील प्रसंग साधे व मनाची पकड घेणारे असावेत. त्यांत फार गुंतागुंत असली तर मुलांना ऐकतांना कंटाळा येतो. एकेक प्रसंग एकामागून एक येत गेला म्हणजे मुलांना त्यांत मजा वाटते. गोष्टीची सुरवात सावकाश व्हावी. कथानक हळूहळू वाढत जावें व शेवटहि

मजेदार असावा. असल्या गोष्टींतील कलाटणी गंभीर स्वरूपाची मुलांच्या आकलनशक्तीच्या बाहेर अशी नसावी. गोष्टींतील नीतिबोध प्रत्यक्ष नसावा; सूचक असावा. गोष्ट सांगतांना नीतीचें व्याख्यान कंटाळवाणें होतें व रसभंग झाल्यामुळें मुलांचें लक्ष गोष्टीवर लागत नाहीं. गोष्टींतील प्रसंग कृतियुक्त असावेत. त्यांत हालचाली व हावभाव यांना पुरा अवसर पाहिजे. कारण अशाच गोष्टींचें नाट्यांत रूपांतर करणें सोईचें होतें. ज्या गोष्टीचें नाटक करतां येणार नाहीं ती कथा वाङ्मयदृष्ट्या कितीहि सुंदर असली तरी मुलांच्या बाबतींत तिची किंमत कमीच. मुलांसाठीं तयार करावयाच्या गोष्टींत विशेषतः बालवर्गांतील मुलांच्या गोष्टींत अनुप्रास, विशिष्ट वाक्यांची पुनरावृत्ति आवश्यें करून असावी. मुलांना पुनरावृत्ति फार आवडते व अनुप्रासाच्या मदतीनें मुलें ती गोष्ट लवकर ध्यानांत ठेवतात. वरील मुद्दे ध्यानांत ठेऊन मुलांसाठीं गोष्टी रचल्यास शिक्षणांत त्यांचा फार उपयोग होतो.

**कथाकथनः**—गोष्ट सांगणें-ही सुद्धां एक कला आहे; सगळेच हरिदास किंवा सगळेच पुराणिक कांहीं यशस्वी नसतात. त्याप्रमाणें सगळयाच शिक्षकांना गोष्टी चांगल्या प्रकारें सांगतां येतील असें म्हणतां येत नाहीं. म्हणून चांगली गोष्ट कलावान कथेकऱ्याच्या तोंडून बाहेर पडली तर परिणामकारी होते. तासचे तास लोक मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणें कथा ऐकत बसतात. यांतील रहस्य उत्तम कथा नसून उत्तम वक्ता हें होय. असें असलें तरी अभ्यास व मनःपूर्वक प्रयत्न केला असतां प्रत्येक शिक्षकास एकादी गोष्ट उत्तम प्रकारें नसली तरी चांगल्या प्रकारें सांगतां येण्याजोगी आहे. गोष्ट सांगूं इच्छिणाऱ्या शिक्षकानें पुढील मुद्दे दुर्लक्षित करूं नये.

( १ ) **पूर्वतयारीः**—सांगावयाची गोष्ट मनांत पक्की बिंबली पाहिजे. प्रसंगामागून प्रसंग आठवणींत आले पाहिजेत. यांत घोटाळा झाल्यास फजिती होण्याचा संभव फार म्हणून गोष्ट नीट स्मरणांत ठेवावी.

( २ ) **हावभाव आणि आवाजः**—गोष्ट सांगतांना प्रसंगानुरूप हावभाव झाले पाहिजेत. आवाजांतहि कमीअधिकपणा सहज क्रमानें यावा. चेहेऱ्यावर भावदर्शन झाले पाहिजे. गोष्टींतील पात्राशीं तादात्म्य पावल्याशिवाय या गोष्टी सुकर होतं नसतात. गोष्टीची सुरवात झाली कीं, संथपणें वाक्प्रवाह चालू रहावा त्यांत अडथळे नसावेत. कठिण शब्दाचें विवेचन करण्यासाठीं किंवा नीतिबोधावर प्रवचन करण्यासाठीं गोष्ट अर्धी ठेऊं नये.

वाक्यरचना आणि निवेदन यांसंबंधीं आतांपर्यंत बराच ऊहापोह झाला. बालवर्गांत मुलें आल्याबरोबर त्यांना शाळेविषयीं आवड उत्पन्न झाली पाहिजे, शिक्षकासंबंधीं आपलेपणा वाटला पाहिजे. शिक्षणशास्त्रांतील सिद्धांताप्रमाणें बोलावयाचें म्हणजे शाळा हें घर वाटलें पाहिजे, किंबहुना सध्यांच्या परिस्थितींत घरापेक्षांहि शाळेचें आकर्षण अधिक जोराचें हवें. हें तडीस जावयास शिक्षकाची मनोभूमिका उच्च स्वरूपाची, वात्सल्यपूर्ण, ध्येयवादी तर पाहिजेच पण त्याबरोबर अध्यापनपद्धतीहि मनाला वेधणारी असावी. बालवर्गांत आल्याबरोबर मायेनें बोलणाऱ्या शिक्षकाचा प्रेमळ हात पाठीवर फिरला म्हणजे भुकेलेल्या मुलांचे चेहेरे हास्यानें विकासित होतील व त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम होतील. याच्याच जोडीला सुंदर सुंदर गोष्टी, गमतीचीं गाणीं, पोटभर खेळ असले म्हणजे मूल घरीं कां बरें थांबेल ? घंटा होण्याच्या पूर्वीं आणि घंटा झाल्यानंतरहि तासचतास मुलें शाळेच्या परिसरांत घोटाळत राहतील.

सुरवातीस दोन तीन महिने नुसता कथानिवेदनावर अधिक भर दिला म्हणजे पुढें वाचन-लेखन इत्यादि भाग सहजरीतीनें शिकविणें सुलभ होईल.

सध्यां बालवाङ्मयाची निर्मिति मोठ्या प्रमाणांत होत आहे. हीं पुस्तकें शिक्षकांना उपलब्ध करून देणें हें अधिकारीसंस्थेचें कार्य आहे. एखादा उत्साही शिक्षक आपल्या पैशानें कांहीं पुस्तकें विकत घेऊं शकेल. परंतु ही स्थिति सर्वांची नाहीं. लहान मुलांसाठीं चिमुकल्या पुस्तकांचें वाचनालयच पाहिजे. परंतु पुस्तकें मिळत नाहीं म्हणून शिक्षकानेंहि दिरंगाई करून चालावयाचें नाहीं. परिश्रमपूर्वक गोष्टी मिळविल्या पाहिजेत, शक्य झाल्यास रचिल्या पाहिजेत. बालमनाचा विकास व्हावा म्हणून शिक्षकानें घेतलेले श्रम सार्थकीं लागतील. पैशाची ऊब नसली तरी मुलांच्या भवतीची ऊब कांहीं कमी समाधानकारक नाहीं.

---

## प्रकरण १० वें

# वाचनाचा आरंभ

निवेदनाच्या मदतीनें पुष्कळसें ज्ञान मुलांच्या मनांत उतरलें; आणि शिक्षण म्हणजे एक प्रकारचा खेळ आहे, त्यांत कांहीं कठीण नाहीं, भय नाहीं धाक नाहीं, मार नाहीं, शिक्षा नाहीं, अशा आनंदांत पहिले दोनतीन महिने

गेले, म्हणजे शिक्षकानें वाचनाच्या पाठाला सहज रीतीनें, विशेष त्याबद्दल गाजावाजा न करितां, प्रारंभ करावा.

बालवर्गात वाचन शिकविण्याच्या तीन पद्धति आहेत. (१) वाक्यपद्धति (२) मूळाक्षरपद्धति (३) मिश्रपद्धति. मानसशास्त्रदृष्ट्या वाक्यपद्धति अधिक उपयुक्त ठरते. मागें 'मूल भाषा कशी शिकतें' या प्रकरणांत आपण पाहिलेंच आहे कीं मुलाचें बोलणें-ऐकणें इत्यादि भाषेच्या अध्ययनाचे प्रकार वाक्यात्मक असतात. सुरवातीस हें वाक्य एकाच शब्दाचें असतें, परंतु तो अलग शब्द नसून, त्यांत एक कल्पना किंवा विचार पूर्णपणें भरलेला असतो. बालवर्गात येण्यापूर्वी घरींदारीं, शेजारीपाजारी मुलानें कितीतरी अनुभव जमविलेले असतात, व ते अनुभव व्यक्त करणारे कित्येक शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडत असतात. म्हणून भाषेच्या अगदीं सुरवातीच्या स्थितीचा आणि मूल बालवर्गात येतें त्या परिस्थितीचा विचार केला, तर भाषणाचे वेळीं पूर्ण विचार प्रगट होतो यांत शंका नाहीं व पूर्ण विचार प्रकट करण्याचें साधन म्हणजे वाक्य होय. यासाठीं वाचनाची सुरवात अक्षरांनीं अगर सुट्या सुट्या शब्दांनीं न करितां सोप्या सोप्या शब्दांनीं बनलेल्या लहान लहान वाक्यांनीं करणें शास्त्रशुद्ध ठरतें.

निवेदन प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें चित्रांचें साहाय्य घेऊन वर्गात संभाषणास सुरवात करावी. यावेळीं सोप्या काल्पनिक गोष्टी व सोपीं सोपीं गाणीं यांचा विशेष उपयोग करावा. विषय मुलांच्या दररोजच्या व्यवहारांतील असावा. शब्द नेहमींचे असावेत. जीं वाक्यें वाचनासाठीं म्हणून निवडावयाचीं त्या वाक्यांच्या जाड कागदाच्या पट्ट्या कराव्यात. त्या वाक्यांतील शब्दहि सुटे सुटे लिहिलेले असे कागदाचे तुकडे तयार ठेवावेत. पाठाला पुढीलप्रमाणें आरंभ करावा.

(१) गोष्ट सांगावी (चित्राच्या साहाय्यानें)

(२) गोष्टीचें नाटक करून घ्यावें.

(३) वाक्यांच्या पट्ट्या चित्राखालीं ठेवाव्या.

(४) वाक्यांचा व चित्राचा संबंध जोडावा.

(५) वाक्यांचा व चित्रांचा संबंध पुन्हा पुन्हा दृष्टीसमोरून गेल्यावर चित्र काढून ठेवावें व वाक्यें वाचून घ्यावीत. यावेळीं फ्लॅश कार्डांचा उपयोग फायदेशीर होतो.

( ६ ) वाक्यें भराभर वाचतां येईपर्यंत पुनरावृत्ति करावी.

( ७ ) वाक्याचे खंड करावे व सुटे सुटे शब्द वाचून घ्यावेत.

( ८ ) अक्षरांचा व मात्रांचा परिचय प्रामुख्यानें मुलांना करून द्यावा.

या पायऱ्या मार्गदर्शक म्हणून दिल्या आहेत. शिक्षकाला योग्य तो बदल करतां येईल. मुख्य मुद्दा हा आहे कीं वाचन हा एक प्रकारचा खेळ आहे अशी समजूत झाली पाहिजे. म्हणून विषयापेक्षां मनोरंजक पद्धतीवर अधिक भर द्यावा. वाक्यपद्धतीनें शिकविण्याचे पाठ शेवटीं दिले आहेत. वाचनपद्धतींचा थोडक्यांत गोषवारा द्यावयाचा तर पुढीलप्रमाणें देतां येईल.

**पायरी १ लीः**—चित्राच्या साहाय्यानें गोष्ट तयार करून घेणें.

**पायरी २ रीः**—चित्राच्या खालीं असलेलीं वाक्यें वाचणें. शिक्षक काठीच्या अगर आंखणपट्टीच्या टोंकानें वाक्य दाखवितो व उच्चारतो. मागाहून तेंच वाक्य सर्व मुलें उच्चारतात. असें चार पांचदां झाल्यावर हुषार हुषार मुलांकडून व्यक्तिशः तीं वाक्यें शिक्षक वाचवून घेतो. नंतर साधारण बुद्धीच्या मुलांना वाचावयास सांगतो. हीं वाक्यें सर्व दिवस वर्गांत राहतात. मुलें येतां जातां तीं वाक्यें उच्चारतात.

**पायरी ३ रीः**—वाक्यांची पूर्ण ओळख. चित्रें काढून टाकावीत. नुसतीं वाक्यें मुलांकडून संघशः व व्यक्तिशः वाचून घ्यावींत. याचवेळीं शब्दांचे खेळ घेतां येतील. ( खेळ शेवटीं दिले आहेत ). वाक्यांश, सुटे शब्द, शिकलेल्या शब्दांतून निरनिराळीं वाक्यें बनविणें इत्यादि खेळ यावेळीं घ्यावेत.

**पायरी ४ थीः**—चित्रांची व तक्त्यांची ओळख पूर्ण झाली, मुलांना वाक्यें चांगलीं वाचतां येऊं लागलीं म्हणजे क्रमिक पुस्तकाकडे वळावें. या पुस्तकांतील सुरवातीच्या धड्यांत मुलांना वाचतां येणार नाहीं असा एकहि शब्द असूं नये. पुस्तक सहजासहजीं वाचतां येतें हें पाहून मुलांना आनंद होतो.

## मूळाक्षरपद्धति

या पद्धतींत शब्दांतील अक्षरांवर अधिक भर दिला जातो. शब्दाचें रूप डोळयांसमोर ठेऊन त्याचा ठसा मेंदूवर पाडण्याचा प्रयत्न होतो. शब्द मुलांच्या समोर ठेविल्यावर शिक्षक त्यांतील प्रत्येक अक्षरावर पट्टी ठेऊन त्याचा उच्चार स्पष्टपणें व सावकाश करीत राहतो व शिक्षकाच्या मागून मुलें तीं अक्षरें उच्चारतात.

सारख्या आकाराचीं अक्षरें एकत्र आणून त्यांचे गट बनवितात. उ० गम, मन, इ० या गटांतील अक्षरांचीं कार्डे तयार करून वर्गांत ती भिंतीवर टांगून ठेवतात. या कार्डांतील अक्षरांना निरनिराळे रंग देतात, हेतु हा कीं प्रत्येक सुटें अक्षर नीट रीतीनें मुलांना ओळखतां यावें. 'ग' या अक्षरावरून गवत, ख यावरून खण अशीं शब्दकार्डें करून त्यांवर त्या त्या वस्तूंचें चित्र काढलेलें असतें. लांकडाचीं अगर पॉलिश पेपरचीं अक्षरें असलेल्या पेट्या, पाट्या, पेन्सिलं वगैरे साहित्य तयार ठेवितात.

**वाचनाचा पहिला पाठः—**

( १ ) शिक्षक फळ्यावर 'गवत' शब्द लिहितो. यांतील 'ग' हा शब्द रंगित खडूनें लिहिलेला असतो. शिक्षक 'गवत' हा शब्द काठीनें दाखवितो व उच्चारतो. मुलें त्याप्रमाणें उच्चार करावयास लागतात.

( २ ) याप्रमाणें अनेकदां उच्चार करून घेतल्यावर मुलें लांकडी अगर पॉलिश पेपरच्या 'ग' या अक्षरावर बोटें फिरवितात. कांहीं वेळानें डोळे मिटून बोटें फिरविण्याचें काम चालतें. खेडेगांवांत लांकडाचीं अक्षरें शिक्षकाजवळ नसतात. अशा स्थितींत मुलांसमोर थोडथोडी वाळू ठेवावी व त्या वाळूंत मुलांना अक्षर गिरविण्यास शिकवावें. किंवा शिक्षकानें मुलांसमोर खडूनें तें अक्षर लिहावें व त्यावरून मुलांनीं हळूच हात फिरवावा. अशारीतीनें वाचनाचे वेळीं लेखनाची तयारी करण्याचा हेतु असतो.

( ३ ) नंतर शिक्षक ज्यांत 'ग' हें अक्षर कुठें तरी असतें असे अनेक शब्द फळ्यावर लिहितो. उ० गणपती, अंगण, गरुड, मगन वगैरे. मुलें त्यांतील 'ग' हें अक्षर शोधून काढतात.

( ४ ) याप्रमाणें अनेक खेळांच्या द्वारें सर्व मूळाक्षरें व बाराखड्या शिकविल्या जातात. ( 'आ' शिकविण्याचा पाठ पुढें दिला आहे )

( ५ ) फळ्यावरील कार्य संपलें म्हणजे शिक्षक क्रमिक पुस्तकाला आरंभ करितो.

## मिश्र-पद्धति

या पद्धतींत वरील दोन्ही पद्धतींचा संयोग करण्याचा प्रयत्न केला आहे.

( १ ) प्रथम मूळाक्षरेंच असलेले पाठ शिक्षक तयार करतो व वाक्य-पद्धतीनें त्यांचें वाचन घेतो. यानंतर मात्रा इत्यादींचे पाठ होतात, व क्रमिक

पुस्तकाची सुरवात होते. ही पद्धति नीट ध्यानांत यावी म्हणून पुनरुक्तीचा दोष पत्करूनहि पुढें विवेचन केलें आहे.

पद्धतिः—( १ ) शिक्षक वाक्य दाखवितो. प्रत्येक शब्दावर काठी ठेऊन त्यांचा उच्चार करतो. मुलें मागाहून म्हणतात.

( २ ) तेंच वाक्य कांहीं मुलांकडून व्यक्तिशः म्हणवून घेतो.

( ३ ) दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं वरील वाक्यांतील शब्द लिहिल्यावर ते शब्द मुलें ओळखतात.

( ४ ) वाक्यपट्ट्या व कार्डें यांचा भरपूर उपयोग करून वाचनांची उजळणी होते. वाक्यें व चित्रें जोडणें, वाक्यांश व शब्द ओळखणें वगैरे खेळ मुलें खेळतात.

( ५ ) नंतर वाक्यांतील शब्द फळयावर लिहिले जातात. त्यांतील अक्षरांची मुलांना ओळख करून दिली जाते आणि प्रत्येक अक्षर वेगवेगळें शिकवितात. अक्षरांचा उच्चार मुलें करतात.

( ६ ) मूळाक्षरांची चित्रयुक्त कार्डें व तक्ते भिंतीवर लावलेले असतात.

( ७ ) याबरोबर लेखनालाहि सुरवात करावयाची असते. लांकडाच्या अगर रेतीच्या कागदांच्या अक्षरांवरून बोटें फिरविणें.

डोळे बंद करून अक्षरांचे आकार हवेंत काढणें.
पाटीवर पेन्सिलीनें अक्षरें गिरविणें.
पाटीवर शब्द लिहिणें.
पाटीवर वाक्यें लिहिणें.

अशा रीतीनें वाचन व लेखन यांचें कार्य एकाच वेळीं चाललेलें असतें. यांत मुलांची बरीच प्रगति झाली म्हणजे क्रमिक पुस्तकांनी आरंभ करावयाचा.

आतांपर्यंत बालवर्गात वाचन शिकविण्याच्या तिनही पद्धतींचें—वाक्य-पद्धति, मूळाक्षरपद्धति व मिश्रपद्धति यांचें विवेचन झालें. या प्रत्येक पद्धतींत गुणहि आहेत आणि दोषहि आहेत. शिक्षकानें या सर्व पद्धतींचा योग्य प्रकारें अभ्यास करावा आणि आपणांला योग्य वाटेल त्या पद्धतींचा अवलंब करावा. आमच्या मतें तर प्रत्येक पद्धतींतील चांगले चांगले गुण घेऊन शिक्षकानें परिस्थितीप्रमाणें आपली स्वतःची पद्धति, स्वतःचें साहित्य आणि स्वतःचें

तंत्र तयार करावें आणि त्याप्रमाणें वाचन शिकवावें. मुद्दा एवढाच कीं, मुलांना वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे.

## वाचनपद्धतींतील गुणदोष

**गुणः**—ही पद्धति मानसशास्त्रदृष्ट्या योग्य तऱ्हेची असल्यामुळें मुलांना वाचनाची आवड उत्पन्न होते; पाठांत मुलांची उत्सुकता दिसून येते. या पद्धतींत खेळांचा उपयोग भरपूर करावयाचा असतो; त्यामुळें मुलांना आत्माविष्काराला पूर्ण संधि मिळते. खेळांतील स्पर्धा व चढाओढ हे गुण अंतीं अभ्यासाचे दृष्टीनें उपयुक्त ठरतात. या पद्धतीमुळें मुलें पुष्कळ शब्द शिकतात व त्यांची वाचनाची गति वाखाणण्याजोगी असते. अर्थग्रहणांतहि मुलांची बरीच प्रगति दिसते.

**दोषः**—आरंभीं आरंभीं या पद्धतींत मुलांचा उत्साह फार मोठ्या प्रमाणांत दिसून येतो व पाठांत मनोरंजकता आणली नाहीं तर मुलें कंटाळतात. या पद्धतींत स्वतःच्या बुद्धीनें नवीन शब्द मुलें शिकत नाहींत; या बाबतींत शिक्षकांवर अवलंबून राहावें लागतें. अनोळखी शब्द आले तर हुशार मुलांखेरीज इतरांना ते वाचतां येत नाहीं व त्यांचें योग्य रीतीनें अर्थग्रहण होत नाहीं. शिक्षकानें योग्य खबरदारी न घेतल्यास आळशी मुलें पाठांत भाग घेण्याचें टाळतात व त्यांचा अभ्यास कच्चा राहतो. या पद्धतींतिल दोष हे मूलतः पद्धतीचे नसून शिक्षकाच्या मनोभूमिकेचे आहेत हें ध्यानांत ठेवावें. उत्साही, कुशल व सहनशील शिक्षक ही पद्धति यशस्वी करून दाखविल्याशिवाय राहात नाहीं.

## मूळाक्षरपद्धतींतील गुणदोष

**गुणः**—आपल्या भाषेंतील वर्ण उच्चारानुसार लिहावयाचे असल्यामुळें अक्षरांच्या उच्चाराबरोबर शब्दांचा उच्चार सहजगत्या होतो. अक्षरओळख झाल्याबरोबर मुलें साधीं साधीं वाक्यें स्वतः वाचूं शकतात व त्यामुळें त्यांना वाचनाची गोडी लागत जाते. या बाबतींत तीं शिक्षणावर तितकीशीं अवलंबून नसतात. वाचन व लेखन एकाच वेळीं सुरू होतें व लेखनांत शुद्धता येते.

**दोषः**—मूल ज्या नैसर्गिक रीतीनें भाषा शिकतें त्याच्या अगदीं विरुद्ध अशी ही पद्धति असल्यामुळें ती शास्त्रसंमत नाहीं. वाचतांना वाक्यांतील अर्थाकडे मुलांचें लक्ष नसतें, ते शब्द ओळखण्याचा प्रयत्न करतात त्यामुळें शब्द

वाटेल तसे तोडणें, वाटेल त्या ठिकाणीं थांबणें इत्यादि दोष या पद्धतींत अटळ आहेत. मुलांच्या वाचनाची गति फारच कमी असते आणि अर्थग्रहणाच्या बाबतींत मुलें फार कच्चीं राहतात. मुलांच्या ठिकाणीं वाचनाची आवड महत्प्रयासानें उत्पन्न करावी लागते.

### मिश्रपद्धतींतील गुणदोष

**गुण:**—वरील दोन्ही पद्धतींतील गुण या पद्धतींत उचलले असल्यामुळें या पद्धतीला बरेंच महत्त्व आलें आहे. वाक्यपद्धति हा या पद्धतीचा पाया असतो व त्याबरोबरच मूळाक्षरें व मात्रा यांचीहि ओळख होत जाते. या पद्धतींत वाचन व लेखन एकदम शिकविलें जातें. त्यामुळें भाषेची शुद्धता शुद्धलेखनांत दिसून येते. मुलांना वाचनाची गोडी लागते व अर्थग्रहण व वाचनाची गति या बाबतींतहि मुलें मागें राहत नाहींत.

**दोष:**—या पद्धतींतील सुरवातीचीं वाक्यें मूळाक्षरें शिकविण्याच्या हेतूनें रचिलीं जातात म्हणून त्या वाक्यांत पुष्कळच कृत्रिमपणा येतो. वाक्यपद्धतीचा उपयोग केव्हां करावा, मूळाक्षरें केव्हां शिकवावींत इत्यादि गोष्टी शिक्षकास नीट समजल्या नाहींत तर बराच गोंधळ उत्पन्न होतो.

या तीनहि पद्धतींचा तुलनात्मक विचार केल्यास असें दिसून येईल कीं, वाक्यपद्धतींत अर्थग्रहणावर अधिक भर आहे. मूळाक्षरपद्धतींत नांवाप्रमाणें अर्थग्रहण व अक्षर मात्र यांवर जोर देतात. शेवटीं योजना करणाऱ्या शिक्षकावर यशाचें माप अवलंबून राहातें. कोणतीहि पद्धति स्वीकारली तरी शिक्षक ज्या रीतीनें पाठाची आंखणी करील, त्यावर मुलांची प्रगति अधिष्ठित होते. वाचन म्हणजे मारून मुटकून लादलेलें काम नसून तो खेळ आहे ही भावना विद्यार्थ्यांत निर्माण व्हावी हा खरा हेतु, मग शिक्षक कोणतीहि पद्धति वापरो.

---

## प्रकरण ११ वें

# लेखनाचा आरंभ

मिश्रपद्धति किंवा मूळाक्षरपद्धति यांपैकीं कोणत्याहि पद्धतीनें वाचन शिकवितांना वाचनाबरोबर लेखनाला आरंभ होतो. मुलांना लेखन शिकवितांना

अनेक गोष्टींकडे फार बारकाईनें लक्ष द्यावें लागतें. त्यांत पहिली गोष्ट मनगट व बोटें यांना द्यावयाचें योग्य वळण ही होय. कोणत्याहि प्रकारचीं रेषाकृति काढतांना आपला हात फक्त मनगटांत सफाईनें वळला पाहिजे व पेन्सिल किंवा लेखणी धरणारीं बोटें योग्य रीतीनें हाललीं पाहिजेत. खरी वस्तुस्थिति ही आहे कीं, प्राथमिक शाळेंत येण्यापूर्वींच घरीं बोटांमनगटांचें वळण थोड्याअधिक प्रमाणांत लागलेलें असतें. पुष्कळदां हें वळण चुकीचें असतें. म्हणून वाचन शिकविण्याच्या आरंभकाळीं या हाताच्या वळणाला फार महत्त्व दिलें पाहिजे.

याबरोबरच लेखनाचा वेग किती असावा याकडेहि दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. अक्षरांतील वळणदारपणा व वेग यांवरून हस्ताक्षराचें मोल ठरविलें जातें. चांगलें पण सावकाश लिहिणें याचा जसा व्यवहारांत उपयोग कमी त्याप्रमाणें जलद पण वाईट लिहिणें यासारखी व्यवहारांत घातक गोष्ट नाहीं. हस्ताक्षराचा वयाशीं, शारीरिक वाढीशीं बराच संबंध असतो. म्हणून लेखनाच्या वेगावर एकदम भर देण्यांत विशेष फायदा नाहीं. अवेळीं वेग वाढविण्याचा प्रयत्न केल्यास बोटांमनगटाच्या वळणांत दोष उत्पन्न होतो व हस्ताक्षर वाईट निघतें.

लेखनाचा आरंभ करतांना बोटांमनगटाच्या योग्य हालचाली व्हाव्यात यासाठीं सुरवातीस मुलांना चित्रलेखनाची मुभा द्यावी. मुलांना खडूचे तुकडे द्यावेत व फळ्यावर अगर पाटीवर वाटेल तशा रेघोट्या काढण्यास परवानगी द्यावी. हळूच शिक्षकानें रेषाचित्र फळ्यावर काढावें, मुलांस तें पाटीवर अगर फळ्यावर काढण्यास सांगावें. मुलांना असलें काम फार आवडतें व एकादें अपवादात्मक मूल वगळल्यास सर्व मुलें त्या लेखनांत आनंदानें भाग घेतात. शिकलेल्या कुटुंबांतील मुलांना या चित्रलेखनाचा सराव घरींच होतो. परंतु खेड्यांतील मुलांना शाळेंत आल्यावरच ही संधि मिळते. बालवर्गांतील चारी भिंतींना मुलांना लिहितां येईल एवढ्या उंचीवर फळे असणें आवश्यक आहे. आपल्या सध्यांच्या परिस्थितींत ही गोष्ट अशक्य आहे. पण फळे नाहीं म्हणून अडून न बसतां शिक्षकांनीं चित्रलेखनांचा अभ्यास पाटीवर घ्यावा. चित्रलेखनानें मुलांच्या हाताला योग्य तें वळण लागलें म्हणजे लेखनांतील पहिली अडचण दूर झाली.

पेन्सिल, लेखणी, किंवा पेन कसें धरावें या गोष्टीकडे शिक्षकानें आतां अधिक लक्ष द्यावें, सरळ रेषा, वर्तुळाचे लहान भाग, अर्धवर्तुळ, वर्तुळ वगैरे आकृति

काढतांना लेखणी वगैरे साधनें कशीं धरावींत हें हळूहळू मुलांना शिकवावें. हें साध्य झाल्यावर अक्षरें शिकविण्याला आरंभ करावा.

वाचनपद्धतीच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें प्रथम लांकडी अगर वाळूच्या कागदांच्या अक्षरांवर मुलांना बोटें फिरविण्याचा अभ्यास द्यावा- यामुळें अक्षरांचा आकार मुलांच्या ध्यानांत येतो व हाताला योग्य वळण लागतें. यानंतर शिक्षकानें शिकवावयाचीं अक्षरें सुंदर हस्ताक्षरांत फळ्यावर आणि मुलांच्या पाट्यांवर लिहावींत. मुलांनीं हलक्या हातानें तीं गिरवावींत. जवळ जवळ सारख्या आकाराचीं सुटीं अक्षरें गिरविण्याचा व स्वतंत्र रीतीनें काढण्याचा सराव बरेच दिवस झाल्यावर याच अक्षरांचे गट लिहिण्यास सांगावेत. उ० नाना, मामा, काका, दादा इ. आपणांला लिहितां येतें याची जाणीव मुलांना झाली म्हणजे त्यांना लिहिण्याचें जणूं वेडच लागतें. स्वतःच्या घरांच्या भिंती, दरवाजे, खिडक्यांचीं दारें—जिथें जिथें म्हणून लिहितां येईल, तिथें तिथें खडू, कोळसा घेऊन मुलें लिहीत सुटतात. मुलांच्या या वेडानें मोठ्यांना राग येतो, पण याच वेडाला थोडीशी योग्य मुरड दिली तर मुलांच्या लेखनांत आपोआप सुधारणा होत जाते.

लेखनाची ही सर्व पूर्वतयारी म्हणावयाची. यानंतर लेखनाच्या प्रगतीची काळजी घ्यावयास पाहिजे. अक्षरांचें सौंदर्य हें वय आणि संवय यावर बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. शिक्षकाचें हस्ताक्षर सुंदर असावें म्हणजे मुलेंहि सुंदर अक्षर काढतात. आपल्याकडे कित्ते गिरविण्याची प्रथा सर्रास सुरू आहे. कित्त्यांतील अक्षरांचा आदर्श मुलांपुढें ठेवण्यांत येतो व त्यावरून मुलें अक्षरें काढतात. कित्येक कित्त्यांत वर ओळ दिलेली असते व त्यानुसार खालील ओळींत मुलें अक्षर काढतात. पहिली रिकामी ओळ काढतांना मुलांचें लक्ष कित्त्यांतील ओळीकडे असतें हें खरें; पण दुसरी रिकामी जागा भरतांना मूल पहिल्या जागेंत आपणच काढलेल्या अक्षरांकडे पाहतें व त्यांतील सर्व दोष पुढच्या ओळींत उतरण्याचा बराच संभव असतो. कित्ते गिरविण्यांत असे अनेक दोष असतात. ते शिक्षकाच्या लक्षांत आले तर ठीक, नाहीं तर हस्ताक्षरांवर वाईट परिणाम होतो. कित्त्याऐवजीं शिक्षकानेंच फळ्यावर सुंदर हस्ताक्षर काढावें व मुलांनीं त्याचें अनुकरण करावें हें अधिक फायदेशीर समजण्यांत येतें.

हस्ताक्षर सुधारण्याला या ना त्या तऱ्हेनें चालना देणें इष्ट असतें, हस्ताक्षर कोणीतरी तपासणार आहे ही जाणीव असल्यास मुलें नीट अक्षरें काढतात.

निमंत्रणपत्रिका, पत्रव्यवहार, प्रदर्शनांतील हस्ताक्षरांचा नमुना, हस्तलिखित मासिक इत्यादि हेतूंनीं प्रेरित होऊन मुलें हस्ताक्षरांत सुधारणा करण्याची खटपट करतात. इतके करूनहि कांहीं मुलांची प्रगति समाधानकारक होत नाहीं. अशा मुलांकडे व्यक्तिशः मधूनं मधून लक्ष देणें परिणामीं हितावह ठरेल.

वेळापत्रकांत हस्ताक्षराचा म्हणून निराळा तास ठेवतात; त्या वेळीं मुलें कशीं बसतात याकडे शिक्षकानें लक्ष द्यावें. आदर्श बैठक म्हणजे प्रत्येक मुलासाठीं योग्य उंचीचें लहान टेबल असावें. परंतु ही गोष्ट पुष्कळ अंशीं असाध्य आहे. आपली मांडीवर मांडी मोडून मुलें बसतात व त्यावर कागद घेऊन लिहितात. या आसनानें मुलें फार वेळ लिहूं शकत नाहींत; पण सध्यांच्या काळांत तरी या आसनाचा उपयोग करणें एवढेंच आपल्या हातांत आहे. शाई-लेखणीचा उपयोगहि खालच्या वर्गांत करूं नये. मुलें मोठीं झालीं, शाई कशी वापरावी हें त्यांस समजूं लागलें म्हणजे शाई वापरण्यास परवानगी द्यावी. लेखणी कशी करावी हें सुद्धां शिक्षकानें शिकवावयाचें असतें.

या सर्व विवेचनावरून पुढील मुद्दे लेखनाच्या आरंभीं शिक्षकानें ध्यानांत ठेवावयाचे आहेत.

( १ ) **अक्षरांचा तिरपेपणा:**—अक्षराची उंची व अक्षराचा आकार योग्य असावा.

( २ ) लेखनसामग्री—पेन्सिल, पेन, लेखणी, नीफा चांगलीं असावींत.

( ३ ) हस्ताक्षर सुधारण्यास योग्य चालना द्यावी, मुलांमध्यें स्पर्धा-अहमहमिका—उत्पन्न व्हावी.

( ४ ) वाईट हस्ताक्षर असलेल्या मुलांकडे विशेष लक्ष द्यावें.

( ५ ) फळ्यावर सुंदर अक्षर स्वतः शिक्षकानें काढावें. त्याचें अनुकरण विद्यार्थी करतात. शिक्षकानें मुलांसमोर फळ्यावर काढलेल्या अक्षरांत जीवंतपणा असतो. किस्त्यांतील अक्षराप्रमाणें निर्जीव नीरस नसतें.

( ६ ) मुलांनीं काढलेल्या अक्षरांचा गुणाप्रमाणें क्रम लावावा. पहिला क्रमांक असलेल्या अक्षराप्रमाणें हस्ताक्षर काढण्याची मुलांना चालना द्यावी.

( ७ ) हस्ताक्षरांच्या वेगाकडे दुर्लक्ष करूं नये. वयाप्रमाणें वेगहि वाढला पाहिजे.

( ८ ) सुरवातीस मुलांनीं मोठ्या आकारांत अक्षरें काढावींत. हळूहळू आकार कमी करावा.

## प्रकरण १२ वें

# वाङ्मय, वाङ्मय-प्रकार व क्रमिक पुस्तकें

वाचन आणि लेखन यांचें शिक्षण कसें द्यावें याचा आतांपर्यंत ऊहापोह झाला. रघुवंशांत कालिदासानें एक सुंदर उपमा या बाबतींत योजिली आहे. दिलीप राजाला रघु नांवाचा मुलगा होता. रघूचें लहानपणीं लीपिग्रहण म्हणजे अक्षरओळख झाली. कालिदास म्हणतो, नदीच्या मुखांतून ज्याप्रमाणें समुद्रांत प्रवेश व्हावा त्याप्रमाणें लीपिग्रहणानें अक्षरओळखीनें मुलांचा वाङ्मयांत प्रवेश होतो. खरोखरच वाङ्मय हें सागरासारखें अफाट विस्तारलें आहे. या वाङ्मयसागरांत आपल्या मुलांना सुखानें पोहतां आलें पाहिजे. आपल्या बुद्धिमान पूर्वजांनीं आपल्या प्रतिभाबलानें ही वाङ्मयसृष्टि निर्माण केली आहे आणि विद्यमान लेखक या सृष्टीच्या शोभेंत भर घालीत आहेत. मानवी समाजाच्या जन्मापासूनचे बरेबुरे अनुभव या वाङ्मयांत सांठविलेले दिसतात. हे मानवी अनुभव अल्पकाळांत आणि अल्पायासांत आपल्या मुलांनीं ग्रहण करावे, त्यापासून आपलें कल्याण करून घ्यावें, हा शालेय अभ्यास प्रयोजनांतील मुख्य भाग आहे. "वाङ्मयाच्या अभ्यासानें मानवी जीवित दिवसेंदिवस अधिकाधिक रम्य होत आहे, संसार अधिकाधिक विवेकयुक्त होत आहे व शुद्धतेचें व औदार्याचें राज्य चढतें-वाढतें आहे." वाङ्मयाचें शास्त्रीय वाङ्मय आणि ललित वाङ्मय असे मुख्य प्रकार करण्यांत येतात. गणित, पदार्थविज्ञान, रसायन, यंत्र इत्यादि विषयांची माहिती शास्त्रीय वाङ्मयांत दिलेली असते. प्रतिभेच्या साहाय्यानें आणि कल्पनेच्या बळानें मोठमोठे लेखक कथाकादंबरीसारखें वाङ्मय निर्माण करतात त्याला ललित वाङ्मय असें नांव देतात. ललित वाङ्मय ही एक कला आहे आणि इतर कलांप्रमाणेंच ललित वाङ्मय हें नुसतें ज्ञानवृद्धीकरितां नव्हे किंवा उपदेशाकरितां नव्हे, तर तें आनंदाकरितां-रसास्वादाकरितां आहे. विद्येचा खरा हेतु ब्रह्मानंदासारखा आनंद देणें हा आहे, पण या आनंदाच्या अनुषंगानें दुसरें एक मोठें कार्य होतें. वाङ्मयाच्या अभ्यासानें आपलें मन शुद्ध आणि उन्नत होतें. ज्ञानेश्वरीसारखा अध्यात्मावरचा सरस ग्रंथ अभ्यासतांना आनंद तर होतोच पण त्याबरोबरच आपल्या सहजप्रवृत्तींचें

शोधन-शुद्धीकरण होतें. " काव्य-नाटकादि कृतीपासून सन्मनोवृत्तीचें परिपोषण होतें, सद्गुण अधिक प्रिय होतात, मनाचें औदार्य वृद्धिंगत होतें, थोर लोकांच्या थोर मनाचें आकलन अधिक सुलभ होतें, सौजन्यामुळें उत्पन्न झालेल्या आपत्ति पुरविल्या, पण दौर्जन्यामुळें प्राप्त होणारी हरतऱ्हेची संपत्ति नको अशी मनोभूमिका तयार होते, जगांतील विविध प्रसंगांतील मर्म ओळखण्याची अधिक पात्रता येते; अशा रीतीनें प्रसंगभेदानें व अभिरुचिभेदानें सर्व ग्रंथ आस्वाद्य व उपयुक्त, किंबहुना आवश्यक होऊं शकतात." ( वा. म. जोशी )

निर्मळ आनंद, मनोवृत्तीचें शोधन यांबरोबरच वाङ्मयाच्या अभ्यासानें ईश्वर, सृष्टि, आत्मा इत्यादि विषयाचें ज्ञान आपणांस प्राप्त होतें. वाङ्मयकृतीचा अभ्यास चालू असतांना आपल्या छात्रगणाच्या चेहेऱ्यांवर आनंदाची छटा आहे काय ? त्यांना त्या कृतींतील विषय समजतो आहे काय ? हे प्रश्न शिक्षकापुढें प्रामुख्यानें हवेत. वास्तविक आनंद आणि अर्थग्रहण या गोष्टी एकमेकांवर अवलंबून असतात.

वाङ्मयाच्या अभ्यासानें स्वतःची निर्मिति करण्याचें सामर्थ्य विद्यार्थ्यांत आलें पाहिजे. लहान प्रमाणावर कां होईना पण प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या कल्पनेच्या जोरावर स्वतःचें म्हणून स्वतंत्र लिखाण करतां आलें पाहिजे. छोटे छोटे निबंध, लहान लहान कविता,लहान लहान नाटकें, इत्यादि ललितवाङ्मयाचे प्रकार मुलाला हाताळतां यावे या दृष्टीनें वाङ्मयाचा अभ्यास झाला पाहिजे.

याखेरीज मुलांचे अनुभव क्षेत्र विस्तृत करणें हाहि वाङ्मयाच्या अभ्यासाचा हेतु असतो. वाङ्मय वाचतांना नानाविध लोक, त्यांचे नानाविध प्रकार, नानाविध स्वभाव आपणांस दिसतात महात्मे लोक कसे वागतात. त्यांचा त्याग, त्यांचे उच्च विचार, त्यांच्या सद्भावना, जागतिक कल्याण कसें साधतात याचें सुंदर शिक्षण मुलांना मिळतें.

अशा रीतीनें सात्विक आनंद, सहजप्रवृत्तीचें शोधन, अर्थग्रहण, प्रतिभानिर्मिति, अनुभवक्षेत्राची वाढ इत्यादि अनेक दृष्टींनीं प्रेरित होऊन शालेय शिक्षणांत वाङ्मयाचा अभ्यास झाला पाहिजे. प्राथमिक शाळेंतील अभ्यासक्रमाचा विचार करतांना खालच्या वर्गांत (बालवर्ग, इ० १, २, ३ ) कदाचित् वरील मुद्दे प्रत्यक्षपणें आपणांपुढें नसतील पण वरच्या वर्गांत मात्र वाङ्मयाचा अभ्यास विशेष हेतूनें झाला पाहिजे. खालच्या वर्गांत वाङ्मयसागरांत प्रवेश करण्याची

नुसती पूर्वतयारी होते. वरच्या वर्गांत आल्यावर मुलगा वाङ्मयसागराच्या तीरावरच झेपेल इतक्या खोलींत पोहण्याचा प्रयत्न करितो व कॉलेजशिक्षणांत वाङ्मयसागराच्या अथांग पात्रावर स्वेच्छेनें विहार करतो.

शास्त्रीय वाङ्मय हें ज्ञानाच्या वृद्धीला साहाय्य करितें, त्याचा अभ्यास करतांना सर्वस्वी बुद्धीवर ताण पडतो. ललितवाङ्मय हें बुद्धीप्रमाणें अन्तःकरणालाहि हालवून सोडतें. याच्या वाचनानें आपल्या भावना उचंबळून येतात. आपण सुखदुःखाच्या चक्रावर बसून वरखालीं हेलकावे खातों. ललितवाङ्मयाचे मुख्य प्रकार दोन-गद्य आणि पद्य. "प्रत्येक राष्ट्राच्या भाषेच्या इतिहासांत एक काळ असा होतासें दिसतें कीं, तेव्हां लेखकवर्गच नव्हता कारण लेखनकलाच जन्मली नव्हती. तेव्हां, आणि पुढें लेखनकला जन्माला आल्यावरहि कांहीं काळपावेतों वाङ्मयाच्या सदरांत पडणारें सर्व कांहीं पद्यात्मकच असे. पण पुढें गद्य जन्माला आलें, तरी पद्य मागें पडलें नाहीं. दोन्हीहि बरोबरीनें नांदूं लागलीं." ( नं. चिं. केळकर ) गद्यलेखनांत विवेचनावर मुख्यतः भर असतो व त्यामुळें त्याला तर्कशास्त्राचें सहाय्य घ्यावें लागलें. उलट पद्यांत काव्यांत प्रतिभेची कल्पनेची भरारी दृष्टीस पडते. हा गद्यपद्यांतील बाहेरबाहेरचा फरक आहे. कारण पद्यांत वृत्त असतें, गद्यांत वृत्त नसतें; एवढाच गद्य-पद्यांत फरक करून भागत नाहीं. कारण "कित्येक लेखक गद्यच इतकें सरस लिहितात व कित्येक लेखक पद्यच इतकें नीरस लिहितात कीं संसारांत अनेक वेळां अनुभवाला येतें त्याप्रमाणें दादाला अक्का व अक्काला दादा म्हटलें तर तें शोभेलहि. बाणभट्टानें संस्कृतांत 'कादंबरी' नांवाचा गद्य-ग्रंथ लिहिला आहे. तो गद्यांत असूनहि इतका सरस आहे कीं त्या ग्रंथाला विद्वान लोक काव्याच्या सदरांत घालतात. याचसारखा संस्कृतांत 'राजतरंगिणी' नांवाचा पद्य-ग्रंथ आहे. पण त्यांतील नीरसतेमुळें त्याचा समावेश गद्यांत होतो. म्हणून मराठींतील साहित्याचार्य प्रा. वा. म. जोशी हे बोधप्रधान व रसप्रधान असे वाङ्मयाचे प्रकार पाडतात.

आपण सोईसाठीं ललितवाङ्मयाचे गद्य आणि पद्य असे दोन प्रकार पाडूं.

गद्य-प्रकारांत निबंध, गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें, लघुकथा, लघुनिबंध, नाट्यछटा, चरित्रें, आत्मचरित्रें इत्यादि पोटप्रकार पाडतां येतात. पद्याचे महाकाव्यें, खंडकाव्यें, भावगीतें, सुनीतें, ग्रामीण गीतें, विडम्बन, पोवाडे, शिशुगीतें, अभिनयगीतें इत्यादि उपप्रकार प्रचलित आहेत.

आपण मुलांना शिकवितांना वाङ्मयाचा कोणता प्रकार शिकवीत आहोंत याची जाणीव शिक्षकाला पाहिजे. कारण आपल्या अध्यापनाची पद्धति या प्रकारावर बरीचशी अवलंबून असतें. एकच पद्धति सर्व प्रकारांना सरसहा वापरणें नुसतें हास्यास्पद ठरतें एवढेंच नव्हे तर त्यामुळें वाङ्मय शिकविण्याचा हेतु फारसा सिद्ध होत नाहीं.

गद्य–पद्य वाङ्मयाचे जे अनेक प्रकार वर सांगितले त्यांचीं लक्षणें कोणतीं याचा अभ्यास शिक्षकानें केला पाहिजे. कोणत्याहि चांगल्या साहित्य-शास्त्राच्या ग्रंथांत याचा ऊहापोह सांपडेल.

## क्रमिक–पुस्तकें

वाङ्मयाच्या अभ्यासाचे हेतु कोणते याचें विवेचन ध्यानांत घेतलें म्हणजे आपला भाषाविषयक अभ्यासक्रम किती सर्वांगीण व विस्तृत पाहिजे याची कल्पना सहज येण्याजोगी आहे. वाङ्मयाभ्यासासाठीं दोन प्रकारचीं पुस्तकें उपयोगिलीं जावींत; कांहीं सूक्ष्माभ्यासासाठीं व कांहीं स्थूलाभ्यासासाठीं. पहिल्या प्रकारच्या पुस्तकांत निरनिराळ्या लेखकांचे उतारे असावेत. हीं क्रमिक पुस्तकें तयार करतांना “ भाषाशिक्षणाचीं मूलतत्त्वें ” या प्रकरणांतील मुद्दे दृष्टीसमोर ठेवावयास पाहिजेत. आदर्श क्रमिक पुस्तकांत पुढील गोष्टी आवश्यक आहेत. ( १ ) भाषा जीवंत पाहिजे; त्यांत समाजस्थिति व संस्कृति यांचें योग्य प्रतिबिंब दिसलें पाहिजे. आपल्या देशांत घडलेल्या गोष्टी व खऱ्याखुऱ्या मराठी वातावरणांतील प्रसंग यांचीच निवड होणें इष्ट असतें. ( २ ) मुलांना त्या पुस्तकांत आवड उत्पन्न झाली पाहिजे. मानसशास्त्राप्रमाणें निरनिराळ्या वयांच्या मुलांना निरनिराळ्या गोष्टी आवडतात. सातवें आठवें वर्ष असें असतें कीं त्यावेळीं मुलांना मुलांच्या गोष्टी काल्पित गोष्टीच फार आवडतात. नऊ दहा वर्षांच्या मुलांना आजूबाजूच्या गोष्टींचीं वर्णनें आवडतात. त्यांत साहस, पराक्रम यांच्यावर अधिक भर असतो. अकरा बाराव्या वर्षी प्राण्यांच्या गोष्टी, प्रवासवर्णनें, निरनिराळे शोध यांत बालमनें रममाण होतात. क्रमिक पुस्तकें तयार करतांना या मानसशास्त्रीय तत्त्वाकडे लक्ष दिलें पाहिजे. ( ३ ) शब्दसंपत्तिः–प्रत्येक इयत्तेंत मुलांची शब्दसंपत्ति वाढत गेली पाहिजे. नवीन नवीन शब्द, वाक्प्रचार मुलांच्या पाठांत यावे. ( ४ ) शब्दांची पुनरावृत्तिः–एका धड्यांत आलेले नवीन शब्द पुढील धड्यांत आले पाहिजेत व या धड्यांतील नवीन शब्द त्या पुढील धड्यांत यावे. यामुळें शब्दांचा अर्थ व उपयोग मुलांच्या ध्यानांत पक्का ठसतो.

(५) काव्याचे पाठ पुष्कळसे असावेत, खालच्या वर्गांच्या क्रमिक पुस्तकांत शिशुगीतें, अभिनयगीतें, लोकगीतें यांचा प्रामुख्यानें समावेश व्हावा. वरच्या वर्गांसाठीं वर्णनात्मक, कथात्मक कविता असाव्यात (६) उताऱ्यांचीं भाषा सुंदर आणि सरस असावी (७) वाङ्मयाच्या सर्व प्रकारांना क्रमिक पुस्तकांत स्थान असावें. कथा, लघुकथा, संवाद, वर्णनें, इत्यादि मूळ स्वरूपांत घ्यावींत. (८) या पुस्तकांत एकच एक प्रकार संपूर्णत्वानें नसावा. एकच पुस्तक अभ्यासाऐवजीं निरनिराळे उतारे या वयांत मुलांना आवडणें स्वाभाविक असतें. (९) क्रमिक पुस्तकांत विशेषतः खालच्या वर्गांसाठीं असणाऱ्या खूप चित्रें असावींत, तीं रंगित व कलात्मक असणें इष्ट आहे. पुस्तकांसाठीं वापरावयाचा टाईप जाड व मोठा असावा. शब्दाशब्दामध्यें व ओळीओळीमध्यें योग्य अंतर ठेवावें. कागद जाड असावा. कागद चकाकणारा घेतल्यास वाचतांना मुलांच्या डोळ्यांस फार ताण पडतो. पुस्तकाचें मलपृष्ठहि जाड, आकर्षक चित्रयुक्त असावें असें कीं पुस्तक पाहिल्याबरोबर मुलांनीं तें आवडीनें उचलावें.

सध्यां कितीतरी क्रमिक पुस्तकांच्या 'माला' बाहेर पडत आहेत. त्यांतील योग्य कोणत्या, अयोग्य कोणत्या हें शिक्षकांनीं वरील मुद्दे ध्यानांत ठेऊन ठरवावें. सूक्ष्माभ्यासासाठीं क्रमिक-पुस्तकें कशीं असावींत हें आपण पाहिलें. आतां स्थूलाभ्यासांसाठीं कोणतीं पुस्तकें वापरावीं याचा विचार करूं या. (१) शब्दः—क्रमिक पुस्तकांत शिकलेलें शब्द या पुस्तकांत प्रामुख्यानें यावे, कठीण शब्द सहसा नसावेत म्हणजे हीं पुस्तकें वाचतांना मुलांना आनंद होतो. (२) नवीन नवीन कल्पना, नवीन नवीन विचार या पुस्तकांतून असावेत (३) वाचनाची गोडी उत्पन्न व्हावी, शालेय शिक्षण, संपल्यावरही मुलांची वाचनाची संवय राहिली पाहिजे; याला हीं पुस्तकें कारणीभूत झालीं पाहिजेत. (४) सुंदर व सरस भाषा कोणती, हें या पुस्तकांनीं मुलांना पटवून दिलें पाहिजे. त्यांची रसास्वादाची भूक या पुस्तकांनीं शमविणें आवश्यक असतें. (५) मुलांच्या ठिकाणीं वाङ्मयाची गोडी उत्पन्न व्हावी या हेतूनें पुष्कळशीं पुस्तकें वाचून घ्यावींत. हीं पुस्तकें संपूर्ण असावींत, उताऱ्यांचीं नकोत. (६) यासाठीं शाळेचें व वर्गांचें उत्कृष्ट वाचनालय असावें. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांनीं योग्य रीतीनें करावा.

# प्रकरण १३ वें

# गद्याचें अध्यापन

क्रमिक पुस्तकांतील गद्याचे उतारे मुलांना शिकवितांना शिक्षकानें एक मुख्य मुद्दा डोळ्यासमोर ठेवावयाचा आहे, तो हा कीं प्रत्येक उतारा हा सूक्ष्म अभ्यासासाठीं असतो. त्या उताऱ्यांतील शब्द, भाषाविशेष, मध्यवर्ती कल्पना मुलांच्या संपूर्णतः पदरांत पडल्या पाहिजेत. तो उतारा शिकून झाल्यावर आपणांला कांहीं नवीन मिळालें, आपल्या ज्ञानांत भर पडली, आपलें भाषेवरील प्रभुत्व वाढलें ही जाणीव विद्यार्थ्यास झाली पाहिजे. गद्याच्या अध्यापनानें व अध्ययनानें हा हेतु प्राप्त झाला नाहीं तर क्रमिक पुस्तक लावण्यांत कांहीं अर्थ राहात नाहीं.

गद्याचे पाठ शिकविण्याची पद्धत त्या त्या इयत्तेच्या मानावर अवलंबून राहते. बालवर्गांतील पद्धति आणि वरच्या वर्गांतील पद्धति यांत तत्त्वतः फरक राहतो. तरी साधारणतः पुढीलप्रमाणें तीन पायऱ्या सोईसाठीं पाडावयास हरकत नाहीं. (१) पूर्वतयारी (२) विवेचन (३) स्वाध्याय—मुलांनीं स्वतः करावयाचा अभ्यास.

**(१) पूर्व तयारीः**—मुलांच्या मनांत योग्यरीतीनें उत्सुकता निर्माण करण्यासाठीं व नवीन ज्ञानाचें चांगलें ग्रहण व्हावें म्हणून त्यांच्या पूर्वानुभवाला चालना देणें इष्ट असतें. नवीन पाठ सुरू करण्यापूर्वी पाठाला अनुरूप अशी प्रास्ताविक चर्चा करावी. पाठांतील उरलेला भाग घ्यावयाचा असल्यास झालेल्या भागावर सामान्य प्रश्न विचारावेत; या रीतीनें मुलांच्या ठिकाणीं असलेलें त्या विषयाचें मूळचें ज्ञान व पाठांत मिळणारें ज्ञान यांचा पूर्णत्वानें मिलाफ करावयाचा असतो. या प्रास्ताविक भागांत आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवावयाची असते. नवीन पाठाचें अध्ययन करतांना मुलांना भासमान होणाऱ्या अडचणी कोणत्या असतील हें शिक्षकानें आधीं ठरवावें व प्रत्यक्ष अभ्यास होण्यापूर्वी या अडचणींचा निरास करावा. कठीण शब्द पौराणिक संदर्भ वगैरेचा उहापोह आधींच होऊन गेला म्हणजे पाठ वाचतांना मुलें थबकत नाहींत. उलट मोठ्या गोडीनें व आवडीनें पाठांत रंगतात.

(२) विवेचनः—प्रथम उताऱ्यांतील सामान्य कल्पना, मध्यवर्ती विचार मुलांच्या ध्यानांत आणून द्यावा आणि नंतर सूक्ष्म अभ्यास, कठीण कल्पना, कठीण विचार विवेचित करावा.

(३) स्वाध्यायः—पाठांतील ज्ञान मुलें उपयोगांत आणूं शकतात कीं नाहीं याचा पडताळा या भागांत घ्यावा. शिकलेल्या नवीन शब्दांचा उपयोग, नवीन कल्पना अगर विचार यांचा त्यांच्या जीवनांशीं असलेला संबंध, उताऱ्यांतून निघणारा नीतिबोध वगैरे गोष्टी मुलांच्या पचनीं पडल्या आहेत कीं नाहीं याची परीक्षा शिक्षकानें मनोरंजक रीतीनें घ्यावयाची असते व या परीक्षेंत मुलें उत्तीर्ण झालीं तर आपला पाठ यशस्वी झाला हें समाधान शिक्षकांस मिळावयाचें.

कोणत्याहि पाठाच्या वर दिल्याप्रमाणें सामान्यरीत्या तीन पायऱ्या आहेत. आतां पाठासंबंधीं आपण जरा अधिक खोल, अधिक विस्तृत विचार करूं.

खालच्या वर्गांतील (बालवर्ग, इ. १, २, ३) पाठांत सोपीं वर्णनें व गोष्टी यांचा प्रामुख्यानें समावेश केला जातो.

(१) प्रस्तावना व हेतुकथनः—प्रसंगचित्र, कांहीं प्रसंगीं प्रत्यक्ष वस्तुदर्शन कित्येकदां धड्यांतील विषयाला धरून चर्चा इत्यादींपैकीं योग्य गोष्टींच्या अवलंबनानें पाठाला सुरवात करावी. पाठांतील कांहीं भाग झालेला असून उरलेला घ्यावयाचा असल्यास झालेल्या भागावर सामान्य प्रश्न विचारून पाठाला आरंभ करावा. धड्याचा सारांश प्रस्तावनेंत शक्य तों आणूं नये, कारण मग मुलांची उत्सुकता तितकीशी तीव्र राहात नाहीं. पाठाची सुरवात प्रश्नवाक्यानें न करतां एक दोन वाक्यें शिक्षकानें बोलावीं. मुलांचें लक्ष आपल्याकडे खेंचावें मग प्रश्नांना सुरवात करावी. प्रस्तावनेंतहि सर्वच्या सर्व कथन असूं नये.

शक्य झाल्यास पाठांतील कठीण शब्द प्रस्तावनेंत योग्य तऱ्हेनें आणून त्यांचा अर्थ समजून द्यावा. मात्र असे शब्द सुटे सुटे आधीं घेऊं नये. प्रस्तावनेंत योग्य संदर्भानें आणावेत. अशा तऱ्हेनें कठीण शब्द आधींच अवगत झाल्यानें मुलांना वाचनाच्या वेळीं आडकाठी उत्पन्न होत नाहीं. प्रस्तावनेचा शेवट हेतुकथनानें करावा. हेतुकथनाचें वाक्य ठराविक साच्याचें नसावें. त्यांत वैचित्र्य असावें.

(२) वाचनः—बालवर्ग ते इ. २ री पर्यंत शिक्षकानें पाठ वाचावा. तिसऱ्या इयत्तेंत मुलांना मनांत वाचावयास सांगावें. शिक्षकाचें वाचन आदर्श-

वत् व्हावें. न अडखळतां, योग्य ठिकाणीं थांबत, आवाजांत प्रसंगानुरुप कमी-अधिकपणा आणून मुलांना समजेल, त्यांच्या मनावर परिणाम होईल अशा तऱ्हेचें शिक्षकाचें वाचन असावें. वाचनाला सुरुवात करण्यापूर्वीच मुलांना हेतु-प्रश्न द्यावा. हेतुप्रश्न म्हणजे गोषवाऱ्याचे प्रश्न नव्हेत. पाठांतील मूलभूत कल्पना मध्यवर्ती विचार हा हेतुप्रश्नाचा मुख्य आधार असतो. हेतुप्रश्न शक्य तों एकच केव्हां केव्हां दोन पण त्याहून अधिक नसावेत. हेतुप्रश्न फळ्यावर न लिहितां मुलांना तोंडी सांगणें अधिक बरें. वाचन झाल्यावर हेतुप्रश्नाचें उत्तर काढून घ्यावें. त्या उत्तराचा थोडासा विस्तार शिक्षकानें निराळ्या शब्दांत करावा आणि विवेचनाकडे वळावें.

( ३ ) **विवेचनः**—शिकावयाच्या भागांतील मुख्य कल्पना प्रश्नोत्तर पद्धतीनें मुलांना समजावून द्याव्यात. या वेळीं मुलांनीं आपलीं पुस्तकें समोर उघडीं ठेवावींत व पुस्तकांत बघून योग्य तीं उत्तरें द्यावींत. शिक्षकानें एक एक वाक्य वाचून त्यावर प्रश्न विचारणें हास्यास्पद आहे. वाचनाच्या वेळीं मुलांनीं तो भाग ध्यानांत घेतलेला असल्यामुळें परत वाचणें आणि तेंहि सुटीं सुटीं वाक्यें वाचणें अनाठायीं असेल. ज्या वाक्यांतील कल्पना अगर विचार मुलाच्या मनावर बिंबवावयाचा असतो त्या वाक्यावर आधीं प्रश्न विचारून मुलांकडून उत्तर काढून घ्यावें व नंतर तें वाक्य शिक्षकानें वाचावें अगर मुलांकडून वाचून घ्यावें. कठीण शब्दांच्या बाबतींतहि प्रथम विवेचन करून त्या अर्थीं कोणता शब्द पुस्तकांत योजिला आहे असा प्रश्न करावा व मग तो कठीण शब्द फळ्यावर लिहावा. अशा रीतीनें प्रश्नोत्तरांच्या साहाय्यानें एकेक कल्पना किंवा मुद्दा स्पष्ट करीत जावें. प्रश्न विचारणें ही एक कला आहे. कां, कसें, केव्हां, कुठें या प्रश्नांना अधिक महत्त्व आहे.

एक परिच्छेद संपला व दुसरा सुरू व्हावयाचा अशावेळीं संपलेल्या परिच्छेदाचा दोन तीन वाक्यांत सारांशरूपानें समारोप करून नवीन परि-च्छेदाच्या चर्चेला सुरवात करावी.

( ४ ) **आदर्श वाचनः**—झालेल्या भागांपैकीं सुरवातीचा कांहीं भाग शिक्षकानें वाचून दाखवावा, मग हुषार मुलांना वाचण्यास सांगावें. केव्हां केव्हां शिक्षकानें वाक्य वाचावें व सर्व मुलांनीं मागाहून वाचावें. या सामुदायिक वाच-नांचा बराच फायदा होतो. सामुदायिक वाचनानंतर एक दोन हुषार मुलांकडून तो भाग परत वाचून घ्यावा. या हुषार मुलांना वाचनाच्या वेळीं टेबलाजवळ

उभें राहण्यास सांगावें; जागेवरून वाचण्यापेक्षां टेबलाजवळ येऊन वाचण्यांत अधिक फायदा असतो. आत्मविष्काराच्या आमिषानें सुंदर स्पर्धा निर्माण होते. वाचतांना शब्दागणिक शिक्षकानें अडथळा करूं नये. उच्चार दोष सुधारावेत.

( ५ ) **स्वाध्यायः**—झालेल्या भागावर सामान्य प्रश्न विचारून आवृत्ति घ्यावी. गोष्टी असल्यास त्यांचें नाट्यीकरण करून घेतल्यानें आवृत्तींत फार रंग भरतो. याचवेळीं वेळ राहिल्यास कठीण शब्दांचा वाक्यांत उपयोग करून घ्यावा. त्यासाठीं अनेक योजना परिशिष्टांत "शब्द–खेळ" या सदराखालीं दिल्या आहेत त्यांचा उपयोग शिक्षकानें करावा. शेवटीं गृहपाठ म्हणून शिकविलेल्या भागाची उजळणी होईल असा एकादा व्यवसाय द्यावा. सध्यांची पालकांची गृहस्थिति ध्यानांत घेतां, पहिल्या तीन इयत्तांपर्यंत गृहपाठ शक्य तों कमी सोपा असा असणें संयुक्तिक ठरेल. धड्याचें वाचन हाहि एक गृहपाठ होऊं शकतो.

## वरच्या वर्गांतील ( इ. ४, ५, ६, ७ ) पाठ

( १ ) **प्रस्तावनाः**—पाठांतील विषयानुरूप चर्चा करावी. मात्र पाठांत यावयाचा सर्व विषय प्रस्तावनेंत सांगूं नये. सिनेमाच्या जाहिरातीप्रमाणें प्रस्तावना असावी. या जाहिरातींत बोलपटाचे विशेष मोजक्या शब्दांत सांगून कुतूहल निर्माण करतात व या पुढील साद्यंत भाग रूपेरी पडद्यावर पाहा असें आग्रहानें सांगण्यांत येतें. तीच गोष्ट पाठाच्या प्रस्तावनेस लागू पडते. याचवेळीं धड्यांत असलेल्या पौराणिक, ऐतिहासिक संदर्भाचें विवेचन करतां आलें तर चांगलें. कठीण शब्दांचे अर्थ या इयत्तांतील मुलांना संदर्भानें ताडतां येणें आवश्यक असतें. म्हणून असे शब्द फळ्यावर अर्थासह लिहून तो फळा वाचनाचे वेळीं मुलांपुढें ठेवणें ही गोष्ट तितकीशी फायदेशीर होत नाहीं. एक तर वाचतांना मधून मधून मुलें फळ्याकडे सारखी पाहातात, त्यामुळें वाचनांत अडथळा उत्पन्न होतो व दुसरें म्हणजे संदर्भानें शब्दाचा अर्थ लावण्यासाठीं आवश्यक असलेली अनुमानशक्ति उपयोगांत येत नाहीं. हेच कठीण शब्द विवेचनाच्या वेळीं चर्चिले जावे. यानंतर हेतुकथन वर सांगितल्याप्रमाणें करावें.

( २ ) **मनांतील वाचनः**—आवश्यक हेतुप्रश्न द्यावा व मुलांनीं अभ्यासावयाचा भाग मनांत वाचावा. मुलांचें वाचन चाललेलें असतांना शिक्षकानें वर्गांत हिंडावें व वैयक्तिक लक्ष देऊन कोणाला कठीण शब्द अडला तर त्याचा अर्थ सांगावा. हेतुप्रश्नाविना वाचन केव्हांहि देऊं नये. हेतुप्रश्नाचें

उत्तर मिळावें या हेतूनें मुलें वाचीत असतात. म्हणून हेतुप्रश्न मोठ्या विचारानें तयार करावा.

कांहीं धड्यांच्या बाबतींत मुलांना मनांत वाचा असें न सांगतां शिक्षकानें तो धडा सुंदर रीतीनें वाचून दाखवावयाचा असतो. नाटकांतील उतारा नाटयछटा, वक्तृत्वाचा आवेश असणारा उतारा, विनोदपूर्ण उतारा, हे मनांत वाचून मजा येत नाहीं. शिक्षकानें मोठ्यानें वाचून त्यांतील मख्खी विद्यार्थ्यांच्या ध्यानांत आणाव-यास पाहिजे. हेतुप्रश्नपूर्वक शिक्षकानें तो पाठ वाचावा. मुलांनीं पुस्तकांत पाहावें.

( ३ ) **विवेचन** :—प्रत्येक परिच्छेदांतील मध्यवर्ती कल्पना चर्चेला घ्यावी. कां, कसें, कुठें, केव्हां इत्यादि प्रश्नांनीं ती कल्पना मुलांना पूर्णत्वानें समजून द्यावी. या चर्चेंत शिक्षकापेक्षां मुलांनींच अधिक भाग घ्यावयाचा असतो. एखादी कठीण कल्पना किंवा विचार नुसत्या शाब्दिक विवेचनानें मुलांच्या नीट ध्यानांत येत नाहीं, त्यावेळीं शिक्षकानें पुष्कळशीं उदाहरणें घ्यावींत, उपमा रूपक दृष्टान्त याचा आश्रय करावा. हीं उदाहरणें मुलांच्या परिचयाचीं पाहिजेत. शब्दाला शब्द देणें म्हणजे विवेचन नव्हे. वाक्यांतील सूचित अर्थ, गर्भित अर्थ, लक्षणा, व्यंजना या मुलांच्या ध्यानांत आणून द्यावयाचें काम यशस्वी शिक्षकाला करावयाचें असतें. प्रत्येक परिच्छेदाचें विवेचन संपलें म्हणजे थोडक्यांत समारोप करून पुढच्या परिच्छेदाकडे वळावें.

( ४ ) **आदर्श वाचन**:—शिक्षकानें वाचनाला सुरवात करावी व नंतर हुषार मुलांना वाचावयास सांगावें.

( ५ ) **स्वाध्याय**:—आवृत्तीचे सामान्य प्रश्न विचारावेत व पाठांतील विषयानुरूप घरीं तयार करण्यासाठीं गृहपाठ द्यावा. हा गृहपाठ लेखनाच्या स्वरूपाचा असावा.

**उजळणीचा पाठ**:–गद्याचा एक धडा वर सांगितल्याप्रमाणें खालच्या वर्गांत किंवा वरच्या वर्गांत संपविला म्हणजे शिक्षकाचें काम पुरें होत नाहीं. धडा एकदां पूर्ण झाला, म्हणजे त्याच धड्याचा साकल्यानें विचार करण्या-साठीं उजळणी पाठ घेणें अत्यंत आवश्यक असतें. उजळणी पाठाचें तंत्र सामान्यतः पुढीलप्रमाणें असावें.

( १ ) अल्प प्रस्तावना शिक्षकानें करावी. धड्यांतील महत्त्वाची कल्पना मुलांसमोर मोजक्या शब्दांत मांडावी.

( २ ) **मनांतील वाचनः**--इयत्ता तीन ते सात पर्यंतच्या मुलांनीं सर्व धडा मनांत वाचावा. खालच्या वर्गांत शिक्षकानें मोठ्यानें वाचावा. या वाचनाचे वेळीं ' तुम्हांस अतिशय आवडणारा प्रसंग, विचार, कल्पना किंवा शब्दसमुच्चय इत्यादिपैकीं कांहीं हेतुप्रश्न म्हणून मुलांसमोर ठेवावेत.

( ३ ) **विवेचनः**—मुख्य मुख्य मुद्दे प्रश्नोत्तरानें चर्चावेत. परिच्छेदाचा सारांश विचारावा. कठीण शब्द, वाक्प्रचार इत्यादींचा उपयोग निराळ्या वाक्यांत करून घ्यावा.

( ४ ) मुलांकडून धडा वाचून घ्यावा.

( ५ ) **आवृत्तिः**-मुलांनीं एकमेकांना त्या धड्यासंबंधीं प्रश्न विचारावेत; किंवा योग्य असेल तर नाट्यीकरण करावें. गोष्टीची बोलपट कथा तयार करून घ्यावी. धड्यांतील विषयासंबंधीं मुलांना काय वाटतें तें विचारावें. वादविवादाला योग्य असल्यास वर्गांतील मुलांचे दोन गट करून वादविवाद करवावा. एवंच मुलांना आनंदानें व उत्साहानें भाग घ्यावयास लावून त्या धड्याचा अभ्यास मुलांकडून करून घ्यावा. तोच पाठ सोईचा असल्यास निबंधासाठीं उपयोगांत आणावा. व्याकरणाच्या पाठाला पुष्कळदां क्रमिक पुस्तकांतील झालेल्या पाठाचा आधार घ्यावयाचा असतो. वाचनासाठीं व आवेशयुक्त असल्यास पाठांतरासाठीं कांहीं धडे उपयोगी पडतात. अशा रीतीनें अनेक दृष्टींनीं एकाच धड्याकडे शिक्षकानें पाहावें व त्या त्या पाठाचा यथावकाश व यथाप्रमाण उपयोग करून घेण्यांत आपलें कौशल्यसर्वस्व खर्च करावें.

**स्थूल वाचनासाठीं लावलेल्या पुस्तकांतील पाठः**—मुलांना वाचनाची गोडी लागावी; त्यांच्या ज्ञानाची वृद्धि व्हावी, क्रमिक पुस्तकांत शिकलेल्या कठिण शब्दांचा आणि वाक्प्रचारांचा अभ्यास व्हावा म्हणून पुरवणी वाचन ठेवण्यांत येतें. यासाठीं उपयोगांत आणावयाचीं पुस्तकें मनोरंजक, सचित्र असावीं. त्या पुस्तकांतील भाषा क्रमिक पुस्तकांतील भाषेपेक्षां सोपी असावी या पुस्तकांत दीर्घ गोष्टी, अगर वर्णनें शक्य तों असलीं पाहिजेत, उतारे नसावेत. या पुस्तकांचें अध्यापन पुढील पद्धतीनें व्हावें.

( १ ) **प्रस्तावनाः**—विषयाला अनुसरून थोडी चर्चा झाल्यावर दोन तीन प्रश्न मुलांपुढें ठेवावेत व त्यांचीं उत्तरें शोधण्यास सांगावें.

( २ ) **वाचनः**—मुलांनीं मनांत वाचावयाचें.

( ३ ) चर्चा:—हेतु प्रश्न काढून घेतल्यावर पाठांतील विषयांसंबंधीं सामान्य चर्चा; शब्दांचा अभ्यास नको.

( ४ ) आवृत्ति:—मुलांचें वाचन; शक्य असल्यास नाटचीकरण.

( ५ ) गृहपाठ:—पाठांतील विषयांवर आधारलेलें लेखन—निबंध, पत्र, वगैरे.

---

## प्रकरण १४ वें

# काव्याचें अध्यापन

वाङ्मयाच्या अभ्यासांत काव्याला फार महत्त्वाचें स्थान आहे. एकादी कविता एकाद्याला आवडतें पण तुला ती कां आवडली असा प्रश्न आपण त्याला केला, तर अचुक उत्तर देणें त्याला कठीण जाईल. एकच कविता सर्वांना सारख्याच प्रमाणांत आवडेल असें म्हणतां येत नाहीं. म्हणून काव्याची सुटसुटीत सर्वमान्य अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न सफल होत नाहीं. असें असलें तरी कवितेच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान शिक्षकाला अवगत झालें पाहिजे. काव्य म्हणजे काय, काव्याचे मुख्य घटक कोणते इत्यादींचें विवेचन आरंभीं करणें अगत्याचें आहे.

आपल्या प्रतिभाशक्तीच्या जोरावर कवि काव्यनिर्मिति करतो व त्या निर्मितीनें कवीला एक प्रकारच्या अलौकिक आनंदाचा लाभ होतो. सहृदय वाचक रसिकतेनें तें काव्य वाचतो आणि कवीनें काव्यांत उत्पन्न केलेल्या वातावरणांत तल्लीन होतो. या रसिकालाहि त्या काव्यानें निर्माण होणारा आनंद उपभोगतां येतो. अशा रीतीनें काव्याचा आनंद लुटण्याचें सामर्थ्य कवि आणि रसिक या दोघांतहि दिसतें. कवि आणि रसिक यांमधील फरक एवढाच कीं कवी आपल्या दिव्य स्फूर्तीनें–प्रतिभेनें एखादा विषय किंवा प्रसंग शब्दांच्या रूपांत चित्रित करतो. रसिक असें शब्दचित्र निर्माण करूं शकत नाहीं, मात्र कवीच्या निर्मितीनें त्याचें मन उचंबळून येतें. रसिकाच्या ठिकाणीं काव्याचा आस्वाद घेण्याची जी ही शक्ति असते तिला थोडीशी अभ्यासाची जोड दिली

म्हणजे त्या शक्तींचा अधिक विकास होतो. शिक्षक स्वतः कवि नसला तरी ही काव्यांतील आस्वाद घेण्याची शक्ति त्यानें प्रयत्नपूर्वक वाढविली पाहिजे.

काव्य ही एक कला आहे आणि कलेमध्यें अंतिम प्रयोजन सात्विक—निर्भेळ—निष्पाप आनंद देणें हें असल्यामुळें काव्याच्या अभ्यासानें आपणांस आनंद झाला पाहिजे हें क्रमप्राप्त होतें. हा आनंद विद्यार्थी अनुभवतील असें काव्याचें अध्यापन झालें पाहिजे. यासाठीं आतां आपण काव्याच्या स्वरुपाबद्दल थोडासा विचार करूं. काव्याचा आनंद हा पंच ज्ञानेंद्रियांनीं अनुभवावयाचा नसतो. त्या आनंदाची अनुभूति मनाला होते आणि प्रत्येकाची मनाची ठेवण निसर्गतः वेगवेगळी असल्यामुळें काव्याची आवडहि साहजिकच विविध तऱ्हेची असते. कित्येकांना कवितेंतील शब्दांची रचना आवडते तर कित्येकांना कवितेंतील सूचित अर्थ आवडतो. मात्र एका बाबतींत सर्वांचें ऐक्यमत्य दिसून येतें. काव्य हें अंतःकरणानें समजावयाचें असतें. शास्त्रीय विषयांप्रमाणें काव्यांत बुद्धीला कमी अवसर असतो. गद्य आणि पद्य यांमधील हा भेद पूर्वींच्या प्रकरणांत चर्चिलेला आहे. काव्य हें अंतःकरणाचा ठाव घेणारें असल्यामुळें प्रत्येक चांगल्या कवितेंत वाचकाच्या भावनांना ऊत आला पाहिजे. हृदय उचंबळलें पाहिजें. रसिकांचीं मनें उचंबळून सोडणाऱ्या कवितेंतील भावनेच्या परिपोषाला रस म्हणतां येईल. या रसांचे भिन्न भिन्न भावनांप्रमाणें प्रकार पाडण्यांत आले आहेत. श्रृंगार, वीर, करुण, रौद्र, हास्य, भयानक, बीभत्स, अद्भुत, शांत, भक्ति हे रसांचे प्रकार सर्वमान्य आहेत. मुलांना ज्या कविता शिकवावयाच्या, त्यांत कोणत्या रसाचा परिपोष उत्कटत्वानें झाला आहे हें शिक्षकानें प्रथम अभ्यासिलें पाहिजे.

काव्यांत रसाची उत्पत्ति होण्याला अलंकाराची आवश्यकता असते. शब्दालंकारांनीं नादमाधुर्य निर्माण होण्याला मदत होते. अर्थालंकारांनीं काव्यांतील व्यंगार्थ—सूचित झालेला अर्थ—गर्भितार्थ साधिला जातो. काव्यांतील नादमाधुर्यानें काव्यांत रसिकाची एकतानता होते व हें माधुर्य यमक, अनुप्रास, श्लेष इत्यादींनी अधिक प्रमाणांत निर्माण होतें. थोडक्यांत कोणत्याहि चांगल्या कवितेंत पुढील गुण ठळकपणें दिसतात.

( १ ) काव्य ही एक कला आहे.
( २ ) काव्याचा उगम मानवी जीवनांतील अनुभवांत असतो.
( ३ ) या अनुभवाच्या प्रतीतीनें वाचकांच्या भावना जागृत होतात.

( ४ ) या भावनाजागृतीमुळें कवीनें निर्माण केलेलें शब्दचित्र रसिक आस्वादतात.

( ५ ) काव्यांतील भाषेंत नादमाधुर्य असतें.

काव्यांत एक प्रकारचें अद्भुत सामर्थ्य असतें हें आतां ध्यानांत येईल. या सामर्थ्याचा योग्य आविष्कार मुलांसमोर झाला पाहिजे. काव्यांतील रस अनुभविण्याची शक्ति लहान मुलांच्या ठिकाणीं असते कीं नसते असा प्रश्न उत्पन्न करतांच येत नाहीं. कारण कवि आणि बाल यांमध्यें पुष्कळ साम्य असतें. दोघेहि भावनेच्या ओघानें वाहणारे असतात. कल्पनासाम्राज्यांत दंग होणें हा तर दोघांचा नित्य क्रम. बालांप्रमाणें कवीहि सदा तंद्रींत असायचा. चित्र आणि रंग हे उभयतांचे आवडते विषय. काव्यांतील संगीतानें दोघांचेंहि देहभान हरपतें. कवि आणि बाल दोघेहि निर्माते आहेत. नवनिर्मितीची प्रवृत्ति दोघांच्याहि ठिकाणीं बलवत्तर दिसून येते. याच प्रवृत्तीच्या जोरावर कवीप्रमाणें बालक ठायीं ठायीं आत्माविष्कार करीत राहतो.

प्रौढापेक्षां बालकें कवितेचा रसास्वाद घेण्याला अधिक समर्थ असतात. याला दुसरेंहि एक कारण आहे. जीवितांतील सुखदुःखांच्या, द्वेषमत्सरांच्या, हेव्यादाव्याच्या अनुभवानें प्रौढांच्या मनावर चांगली वाईट पुटें चढलेलीं असतात. त्यामुळें काव्याचा परिणाम प्रौढ मनावर तितक्याशा सुकरतेनें होत नाहीं. याउलट बालमनाचें स्वरूप अविकृत असतें; त्यांत बिघाड झालेला नसतो. जगाशीं कमी संबंध आल्यामुळें बालमनावर प्रसन्नतेची छाया असते. कवि सुद्धां आपलें मन बालमनाप्रमाणें ठेवण्याचा प्रयत्न करितो. “ प्रौढत्वीं, निजशैशवास जपणें बाणा कवीचा असे, ” ही केशवसुताची उक्ति या दृष्टीनें सार्थ ठरतें. स्वच्छन्दी, मुग्ध, बालमनावर काव्याचा परिणाम उत्कटत्वानें होत असल्यामुळें शाळेंतील मुलें काव्याचा अभ्यास करण्यास, काव्यांतील रसाचा आस्वाद घेण्यास पात्र असतात. प्रौढांनींहि बाल होऊन काव्याच्या अंगणांत प्रवेश केला पाहिजे. दुःखमय संसारांत क्षणभर विरंगुळा काव्यापासून प्रौढांना मिळतो, मन समाधान पावतें, एका प्रकारच्या उच्च वातावरणांत वावरण्याची संधि मिळत, अधूनमधून उच्च तत्त्वांचा साक्षात्कारहि होण्याचा संभव असतो. याप्रमाणें काव्य बालकापासून वृद्धांपर्यंत सर्वांना सेव्य ठरतें.

आपल्या विद्यार्थ्यांच्या मनांत काव्याबद्दल अवीट गोडी निर्माण करूं इच्छिणाऱ्या शिक्षकानें आपण स्वतः काव्यमय बनलें पाहिजे. कवीनें ज्या मनः-

स्थितींत काव्यरचना केली असेल ती मनःस्थिति शिक्षकानें ओळखून काव्याचें पठण आणि पाठन करावयाचें असतें. कवीच्या भावना मुलांच्या मनांत उत्पन्न झाल्या म्हणजे मुलें त्या काव्यांत रंगतात. शिक्षकानें हें कार्य मोठ्या कौशल्यानें करावें. काव्यांत निर्माण केलेली सृष्टि शिक्षकानें मुलांसमोर पुनः निर्मित करण्याचा प्रयत्न करावा. काव्यांतील सूचना, व्यंजना, लक्षणा इत्यादि गूढार्थ मुलांना समजतील अशा पद्धतीनें विशद करावे. एखाद्या विशिष्ट ठिकाणीं रसोत्पत्तीसाठीं विशिष्ट शब्द कसा योजिला गेला, समानार्थी दुसरा शब्द त्या ठिकाणीं चालेल कीं नाहीं इत्यादि चर्चा करून काव्याच्या सौंदर्याची प्रचीति मुलांना करून द्यावी. काव्यांतील गेयत्व, नाद-माधुर्य कसें आणलें आहे, मोजक्या शब्दांत प्रचंड अर्थ उत्पन्न करण्याची कवीची शक्ति कशी वाखाणण्यासारखी आहे वगैरे प्रश्नांची चर्चा करून मुलांना काव्यांतील रसाचा आस्वाद घेण्यास उद्युक्त करावें.

## खालच्या वर्गांतील काव्याचे पाठ

या वर्गांत शिशुगीतें, अभिनयगीतें, लोकगीतें यांना प्राधान्य असावें. दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेंत लहान लहान वर्णनात्मक कविता घेतल्यास चाल-तील. या ओळीचा अर्थ काय, त्या शब्दाचा अर्थ काय असे प्रश्न विचारून बालकांचा उत्साह कमी करूं नये. या वर्गांतील मुलांकडून बौद्धिक करामतीची आपण अपेक्षा करणें अनाठायीं आहे. त्यांना शब्दांतील जादू मोहिनी घालते. कविता मोठमोठ्यानें सुरावर म्हणाव्यात ही त्यांची तीव्र इच्छा. कविता गाणें त्यांतच त्यांना खरा आनंद. शब्दांच्या, ओळींच्या पुनरावृत्तींत त्यांना खरी गंमत वाटते. रसास्वाद, व्यंजना इत्यादि प्रकार वरच्या वर्गासाठीं राखून ठेवावेत. खालच्या वर्गांतील पाठ सामान्यतः पुढीलप्रमाणें योजावा.

(१) **प्रस्तावनाः**—योग्य अनुसंधानानें पद्यांतील विषयाला अनुरूप अशा गोष्टीनें किंवा चित्राच्या साहाय्यानें थोडीशी चर्चा करावी. पद्यांत येणारे कठीण शब्द या चर्चेत येऊन जावेत. कवितेचा सारांश मात्र सांगूं नये. सगळ्यांत उत्तम प्रस्तावना म्हणजे विशेष प्रस्ताव न करितां एकदम कवितेला सुरवात करणें.

(२) **शिक्षकाचें कविता वाचनः**—शिक्षकानें कविता एकदां, आव-श्यक वाटल्यास दोनदां तीनदांहि योग्य रीतीनें म्हणावी. कविता लांब अस-

ल्यास अर्धी तोडूं नये. सर्वच्या सर्व एकदा म्हणावी; विवेचनाला पाहिजे तर योग्य तो खंड घ्यावा.

( २ ) **हेतु प्रश्नः**—कविता म्हणावयाच्या आधीं कवितेंतील मध्यवर्ती कल्पनेवर आधारलेला हेतुप्रश्न द्यावा; त्याचें उत्तर आतां विचारावें. पहिल्या व दुसऱ्या इयत्तेंत शिक्षक कविता म्हणत असतांना मुलें पुस्तकांत पाहात असतात व कविता गुणगुणत असतात. तिसऱ्या इयत्तेंतहि असेंच करावें. वाटल्यास शिक्षकानें कविता वाचल्यावर मुलांना ती कविता परत मनांत वाचावयास सांगावी, हें झाल्यावर हेतु प्रश्न विचारावा. कवितेचें गद्य वाचन शक्य तो टाळावें.

( ३ ) **विवेचनः**—सर्वसाधारण प्रश्न विचारल्यावर, कां, कसें, केव्हां, कुठें, कोणी इत्यादि प्रश्नांनीं चर्चा करावी. काव्यांतील वातावरण निर्माण करावें, विशिष्ट शब्दयोजनेकडे मुलांचें लक्ष खेंचावें. कांहीं शब्दांत असलेलें नादमाधुर्य त्यांच्या कानांवर घालावें. अशा रीतीनें चर्चा पुरी करावी. थोडक्या वाक्यांत समारोप करावा.

( ४ ) **शिक्षकानें परत कविता म्हणावीः**—मुलांनीं शिक्षकाच्या मागाहून म्हणावी. नंतर मुलें सामुदायिक रीत्या म्हणूं शकतात. हें सामुदायिक गायन झाल्यावर व्यक्तिशः एकदोन मुलांना म्हणावयास सांगावें.

( ५ ) **आवृत्तिः**—शिक्षकानें परत विवेचनांतीलच प्रश्न विचारूं नयेत. एखादा सर्वसाधारण प्रश्न विचारावा. कवितेंतील विषय चित्राच्या स्वरूपांत काढण्याजोगा असल्यास फळ्यावर मुलांकडून चित्र काढून घ्यावें. तुम्हांला कोणती कल्पना आवडली, ही कविता तुम्हांला कां आवडली असले हास्यास्पद प्रश्न विचारूं नये.

( ६ ) **गृहपाठः**—कविता पाठ करून यावयास सांगावें.

बालवर्गांत व पहिल्या इयत्तेंत मुलांना कविता म्हणावयास शिकवाव्यात. शिक्षकानें हावभावयुक्त कविता म्हणाव्या व मुलांनींहि तसेंच करावें.

## वरच्या वर्गांतील कवितांचे पाठ

**प्रस्तावना**— ही गोष्ट कवितेच्या स्वरूपावर राहील. कांहीं कवितांतून कवीच्या जीवनाशीं संबंध असलेल्या गोष्टींचें वर्णन असतें. अशा वेळीं कवीचें जीवनचरित्र थोडक्यांत सांगून प्रस्तावना करावी लागते. उ० केशवसुताची

" पश्चिमेकडून वाहणारा वारा." ऐतिहासिक कविता शिकवितांना कवितेंत येणाऱ्या ऐतिहासिक प्रसंगाची पार्श्वभूमि आधी सांगणें भाग पडतें. विनायक कवीच्या " हतभागिनी " या कवितेंत महाराष्ट्राचीं दोन दृश्यें दाखविलीं आहेत. पहिल्या दृश्याचा इतिहास प्रस्तावनेंत यावा म्हणजे दुसरें दृश्य अधिक तीव्रतेनें जाणवतें. कवितेंत कांहीं पौराणिक दाखले असले, किंवा कीर्तीचा रंग पांढरा, तरुण सुंदर स्त्रीनें बुंध्यावर लाथ मारली तर अशोक वृक्ष फुलतो इत्यादि कविसंकेत असले तर त्यांचें विवेचन प्रस्तावनेंत झालेलें बरें. कांहीं शिक्षक कवितेचा सारांश प्रस्तावनेंत सांगतात. ही पद्धति सर्वथैव त्याज्य आहे. गद्य-पाठाचे वेळीं विवेचन केल्याप्रमाणें कवितेंतील विषयाचा थोडासा भाग उकलून सांगितला तर हरकत नाहीं. पण सर्वच्या सर्व विषय आधींच सांगून मुलांच्या उत्सुकतेवर विरजण घालूं नये. पुष्कळशा कविता अशा असतात कीं, कांहीं प्रस्तावना न करितां त्या शिकवाव्यात.

( २ ) शिक्षकानें कविता म्हणून दाखवावी. खंडकाव्य असल्यास योग्य भाग पाडावेत व एकेक भाग घ्यावा. थोडीशी दीर्घ कविता असली तर मात्र संपूर्ण वाचावी. कविता गद्यरूपांत केव्हांहि वाचूं नये. कारण काव्याच्या गायनानें भावना सुचविली जाते.

( ३ ) आधींच सांगितलेला हेतुप्रश्न विचारावा व मुलांकडून कवितेंतील मध्यवर्ती कल्पना काढून घ्यावी.

( ४ ) **विवेचनः**—एकेक कल्पना स्पष्ट करावी. कवितेचा वरवरचा अर्थ समजून घ्यावा. उपमा, रूपक, दृष्टान्त इत्यादि अलंकारांचें विवेचन करावें. मुलांना कवितेचा सर्वसामान्य अर्थ नीट कळला म्हणजे मग कुशलतेनें प्रश्न करून कवितेंतील सूचित अर्थाकडे वळावें. कवितेंतील रम्य स्थळें, काव्यगुण इत्यादिकांची माहिती द्यावी; कवितेंतील एखाद्या तत्त्वज्ञानात्मक भागांवर व्याख्यान देत राहूं नये. मुलांना समजेल एवढें विवेचन करून पुढें व्हावें. अशा रीतीनें काव्यांतील वातावरणाशीं मुलें तादात्म्य पावतील अशी चर्चा करावी.

( ५ ) शिक्षकानें सर्व कविता म्हणावी. मुलांकडून संघशः व व्यक्तिशः म्हणवून घ्यावी.

( ६ ) **आवृत्तिः**—पूर्वी झालेल्या कवितेशीं तुलना करावी. एकाच विषयावरील दोन कवितांची तुलना करणें पुष्कळदां मनोरंजक ठरतें.

(७) **गृहपाठ:**—कविता पाठ करून यावयास सांगावें. कवितेच्या पाठांत अन्वयार्थास आतां स्थान राहिलेलें नाहीं. या वाक्यांत कर्ता कोणता, कर्म कोणतें असले प्रश्न नवीन पद्धतींत हास्यास्पद ठरतील.

एखादी कविता शिक्षकाला सुरात्रर म्हणतां न आल्यास काय करावें हा प्रश्न शिल्लक राहातो. प्रथम वर्गांतील एखादा चांगल्या आवाजाचा मुलगा असल्यास व त्याला कविता चांगली म्हणतां येत असल्यास शिक्षकानें त्या मुलाला कविता म्हणावयास सांगितलें तर कांहीं विशेष बिघडत नाहीं. शिक्षकाला म्हणतां आली नाहीं आणि कोणी विद्यार्थीहि म्हणूं शकत नाहीं, अशीं स्थिति असल्यास शिक्षकानें यथासामर्थ्य ती कविता सुरात्तर म्हणावी. पण कवितेचें गद्यवाचन केव्हांहि करूं नये. पुष्कळदां बाहेरील पद्य असल्यास या कवितेस नांव काय द्यावें असा प्रश्न शिक्षक विचारतात. मुलें नांवें सुचवितात व या नांवापैकीं एक नांव शिक्षक मुक्रर करितो. या प्रश्नाचा अवलंब अधूनमधून करावा.

---

## प्रकरण १५ वें

# वाचन व त्याचे प्रकार

भाषाशिक्षणांत वाचनाचें महत्त्व फार मोठें आहे. नवीन नवीन शब्द शिकण्याचें मोठें साधन म्हणजे वाचन शिकलेल्या शब्दांची उजळणीहि वाचनानेंच होते. भाषेचा अभ्यास करतांना वाचनाकडे शिक्षकानें दुर्लक्ष करून चालत नाहीं.

ज्ञानाच्या वृद्धीलाहि वाचनानेंच मदत होते. निरनिराळ्या विषयांची माहिती वाचनानें प्राप्त झाली म्हणजे आपला ज्ञानसंग्रह विस्तृत होतो आणि ज्ञानवृद्धीबरोबर मनाचा विकास होत जातो. प्राचीन आणि अर्वाचीन विद्वान् आपले अनुभव पुस्तकरूपानें मानवांच्या कल्याणासाठीं आपल्यापुढें ठेवतात. हीं पुस्तकें म्हणजे ज्ञानमंदिराचे राजरस्ते आहेत. यांच्या वाचनानें मनुष्य भाषादेवीची आराधना करतो व तिला प्रसन्न करून घेतो.

मानवी संसारांत अनेक काळज्या, नानाविध चिन्ता, अगणित दुःखें भरलेलीं असतात. यामुळें दैनंदिन कार्यक्रमांत चूर झालेल्या मनाला कंटाळा,

उद्वेग येणें साहजिक आहे. हा कंटाळा घालवून कांहीं क्षण का होईना संसारांतून आपली सुटका करून ते क्षण आनंदांत घालविण्याचें एक प्रमुख साधन म्हणजे वाचन होय.

अशा रीतीनें शब्दसंपत्तीची वाढ, ज्ञानार्जन, आनंद इत्यादि हेतू साध्य होण्यासाठीं अभ्यासक्रमांत वाचनाचा आवश्यक समावेश केला जातो.

वाचनाचे दोन प्रकार कल्पितात. ( १ ) मोठ्यानें वाचणें. ( २ ) मनांत वाचणें. शाळेंतील खालच्या वर्गांत—बालवर्ग, पहिली व दुसरी इयत्ता—यांत मोठ्यानें वाचणें सोईचें व उपयुक्त ठरतें. वरच्या वर्गांतील पुष्कळसें वाचन मनांतीलच असावें. मोठ्यानें वाचणें हा मनांतील वाचनाच्या संवयींचा पाया आहे. वाचन कसें शिकवावें याबद्दलचा ऊहापोह पूर्वी झालेला आहे. सुरवातीस मुलांच्या कानाला—श्रवणेंद्रियाला—पुष्कळसा अभ्यास द्यावा लागतो, नंतर वर्णांचा—उच्चाराचा उपक्रम होतो. शुद्ध भाषा बोलूं लागलीं म्हणजे वर्णांसाठीं मुखावाटे होणारा आवाज त्या त्या अक्षरांनीं फळ्यावर लिहावयाचा असतो. यावेळीं आवाज आणि फळ्यावरचें अक्षर या दोहोंचें साहचर्य कान व डोळे या इंद्रियांच्या द्वारां मुलांच्या मेंदूवर ठसतें. प्रत्येक वर्णाचा आवाज व तद्वर्णवाचक अक्षर मुलें ओळखूं लागलीं म्हणजे वाचनाचा आरंभ झाला म्हणावयाचा. प्रथम प्रथम अक्षरओळख होऊन तोंडानें उच्चार होण्यास बराच वेळ लागतो. पुढें संवयीनें मुलें अक्षरें, शब्द, वाक्यें भराभर वाचतात. हा वेग शेवटीं इतका वाढतो कीं, तोंडानें शब्दाचा उच्चार करून डोळे पुढच्या कितीतरी शब्दांवरून जातात. उच्चाराचा वेग कमी पडतो. अक्षरओळखीचा वेग जास्त होतो. याच सुमारास मुलाचें मोठ्यानें वाचणें बंद होतें व मनांतील वाचनाला हळूहळू सुरुवात होते.

बालवर्ग, पहिली व दुसरी इयत्तेंत मुलांनीं मोठ्यानें वाचावें. यामुळें मुलांचे उच्चार सुधारतात. कांहीं मुलांत आढळणारे उच्चार दोष काढून टाकतां येतात. वाक्यांत कुठें थांबावें, आवाज कमिअधिक कुठें करावा, कोणत्या शब्दावर जोर द्यावा इत्यादि गोष्टी मुलगा मोठ्यानें वाचतो तेव्हांच शिकवितां येतात. मुलाला पाठ नीठ समजला आहे कीं नाहीं याची परीक्षा वाचनानें होते. वाचतांना मुलगा घडोघडीं अडखळूं लागला कीं पाठाचें अर्थग्रहण व्हावें तसें झालेलें नाहीं.

सगळेंच लिखाण वाचनाला सोईचें असतें असें मात्र समजूं नये. जें लिखाण वाचण्यांत मुलांना मजा वाटत नाहीं, ज्यांत मुलांचें मन रमत नाहीं,

असें लिखाण मुलांकडून मोठ्यानें वाचून घेणें इष्ट नसतें. लांब लांब वाक्यें, केवळ माहितीनें खच्चून भरलेलें परिच्छेद, शास्त्रीय विचारांची चर्चा करणारे लिखाण–अशा प्रकारांचें वाचन तरी मुळींच करून घेऊं नये. कारण सुरवातीसच वाचनाचा कंटाळा उत्पन्न झाला म्हणजे वाचनाची उपयुक्त संवय मागाहून लावणें प्रयत्न साध्य होतें. प्रसिद्ध वक्त्यांच्या भाषणांतील उतारे, नाट्यसंवाद, रसभरित वर्णनें, कविता, मुलें आवेशानें व अहमहमिकेनें वाचतात. त्यांचा शिक्षकानें भरपूर उपयोग करून घ्यावा. वाचनाच्या चढाओढी लावाव्यात. त्यांत बाक्षिसें ठेवावींत, हेतू कीं, ह्या मुलांच्या ठिकाणीं वाचनाची गोडी निर्माण व्हावी. वाचनाच्या वेळीं शिक्षकानें एकदोन गोष्टींची काळजी घ्यावी. स्वतःचें वाचन शिक्षकानें आदर्शवत् ठेवावें, वर्गांतील सर्व मुलांना ऐकूं जाइल, एवढ्या मोठ्यानें मुलें वाचतात कीं, नाहीं तें पहावें. वाचणाऱ्या मुलास वर्गाच्या मधें टेबलाजवळ उभा करावा. नीट उभें राहणें व पुस्तक डोळ्यांपासून योग्य अंतरावर नीट ह्यातांत धरणें याहि गोष्टी शिक्षकाच्या नजरेंतून चुकतां कामा नये. पुस्तकाचें डोळ्या-पासूनचें अंतर साधारण अठरा इंच असावें. सुंदर सुंदर उतारे मुलांकडून पाठ करून घेतल्यास व ते वर्गांत म्हणून घेतल्यास मुलांच्या वाचनावर आणि भाषा-सरणीवर फारच चांगला परिणाम होतो. वाचतांना एकाद्या मुलाच्या ठिकाणच्या तोतरेपणासारखे दोष कसे सुधारावेत याचें विवेचन मागें झालें आहे.

मुलें मोठ्यानें वाचण्यांत प्रवीण झाली, त्यांचा शब्दओळखीचा वेग उच्चारवेगापेक्षां अधिक झाला म्हणजे मुलांनीं मनांतल्या मनांत वाचावें हें इष्ट ठरतें. तिसऱ्या इयत्तेपासून–विशेषतः चवथ्या इयत्तेपासून वरच्या वर्गांत पाठाचे वेळीं मुलांचें वाचन मनांतील असावें. तिसऱ्या व चवथ्या इयत्तेंतहि मधून मधून शिक्षकानें योग्य असा पाठ–लघुकथा, नाट्यछटा, नाट्यप्रसंग–मोठ्यानें वाचून दाखवावा. मात्र एकदा पाठ मोठ्यानें वाचून दाखविल्यावर मुलांना तो मनांत परत वाचावयास सांगूं नये, कारण शिक्षणाच्या वाचनानें अर्थग्रहण झालेलें असते. मनांतील परत वाचनानें मुलांना कंटाळा येतो व त्याचा परिणाम विवेचनाच्या वेळीं दिसून येतो. याशिवाय पाठाचा वेळहि फुकट जातो.

आतांपर्यंतच्या विवेचनावरून खालच्या वर्गांत मनांतील वाचन हा भाग अजिबात नसतो असा ग्रह कोणीहि करून घेऊं नये. बालवर्गांतहि थोड-

थोडें मनांतील वाचन असतें. शब्दांच्या खेळांत शिक्षक शब्दकार्डें देतो व त्यांची वाक्यांत मुलें जुळवणी करतात. त्यावेळीं त्या कार्डावरील शब्द तें मूल मनांतच वाचत नाहीं का? एकादवेळीं शिक्षक एकादा शब्द फळ्यावर लिहितो, त्यावेळीं मूल तो शब्द आधींच वाचतें, तेंहि मनांतील वाचन ठरेल. एका खेळांत शिक्षक मुलांच्या हातांत कागद देतो. प्रत्येक कागदावर ' अमुक, अमुक करा " असें लिहिलेलें असतें, मुलांनीं ते कागद मुकाट्यानें वाचावयाचे असतात व त्यांना लिहिल्याप्रमाणें कृति करून करावयाच्या असतात. यावेळीं सुद्धां मुलें दिलेले कागद मनांतच वाचतात. अशारीतीनें अगदीं अल्पप्रमाणांत मनोगत वाचनाची संवय लहानपणींच लागत असते.

मनांतील वाचनापासून अनेक फायदे होतात. एक तर थोडक्या वेळांत पुष्कळ वाचून होतें. वाचनाचा वेग वाढतो, त्याबरोबरच अर्थग्रहणाचा वेग वाढतो. दुसरा फायदा मानसशास्त्रदृष्ट्या आहे. मुलांमुलांमध्यें व्यक्तिगत फरक असतात. बुद्धीनेंहि मुलें कमीअधिक हुषार असतात. मनांत वाचावयाचें असलें म्हणजे, प्रत्येक मूल आपल्या कुवतीप्रमाणें वाचनाला वेग देऊं शकतें. मोठ्यानें वाचतांना कांहीं कांहीं मुलांना ओळीच्या ओळी मधेंच सोडाव्या लागतात, तरच तें शिक्षकाबरोबर वाचूं शकतें, यामुळें अर्थग्रहण अशक्य होतें.

मुलांनीं मनांतच वाचन करावें अशी अपेक्षा खालीं दिलेल्या प्रसंगीं करणें अयोग्य ठरत नाहीं. (१) फळ्यावर लिहिलेले शब्द वाक्यें. ( २ ) पाठाच्या वेळीं हेतु प्रश्नपूर्वक दिलेलें वाचन वरच्या वर्गांत तरी मनांतच झालें पाहिजे ( ३ ) वाचनालयांत बसून करावयाचें वाचन मोठ्यानें करणें शक्यहि नाहीं व इष्टहि नाहीं. ( ४ ) गमतीसाठीं वेळ घालविण्यासाठीं आपण वर्तमानपत्रें, साप्ता-हिकें, मासिकें, कादंबऱ्या, लघुकथा, माला इ. वाचतों. तीं, सर्व मनांतच वाचतों. ( ५ ) एखाद्या विषयाचा सर्वांगीण अभ्यास करतांना अनेकविध पुस्तकें वाचावीं लागतात, तीं मोठ्यानें वाचण्याला अवसर नसतो. ( ६ ) शब्दकोश, ज्ञानकोश इत्यादि संदर्भ ग्रंथाचें वाचन मनोगत असतें. ( ७ ) प्रौढांचें बहुतेक सर्व वाचन मनांत होतें.

मुलांनीं मनांत वाचावें अशा अपेक्षेनें जेव्हां शिक्षक पुस्तक वाचावयास सांगतो त्यावेळीं मुलें खरोखरच मनांत वाचतात कीं नाहीं तें पाहावें. मनांतील

वाचन चाललें असतां ओठांची सुद्धां हालचाल होतां कामा नये. गुणगुणणें म्हणजे मनांतील वाचन नव्हे.

अभ्यासक्रमांत मोठ्यानें वाचणें व मनांतील वाचणें या दोन्ही प्रकारांना महत्त्व आहे. कोणता प्रकार केव्हां उपयोगांत आणावा हें शिक्षकानें ठरवावें. या बाबतींत वरील विवेचन बरेंच उपयुक्त होईल असें आम्हांस वाटतें.

## प्रकरण १६ वें

# व्याकरणाचें अध्यापन

भाषाशिक्षणांत व्याकरणाचें काय महत्त्व आहे याबद्दल शिक्षणतज्ज्ञांत बराच वादविवाद सुरू आहे. व्याकरणाशिवाय भाषेचा अभ्यास होणेंच शक्य नाहीं असें कांहींचें म्हणणें तर भाषेच्या अभ्यासाला व्याकरणाची मुळींच आवश्यकता नाहीं असें कांहींचें प्रतिपादन आहे. ह्या दोन एकान्तिक बाजू आहेत. इंग्रजी अंमलाखालीं मराठी शाळा सुरू झाल्या, त्यावेळीं व्याकरण पाहिजे म्हणणाऱ्यांचा पक्ष प्रबल होता. त्यामुळें त्यावेळच्या अभ्यासक्रमांत खालच्या वर्गांतून सुद्धां व्याकरणाचे नियम, व्याख्या वगैरे नीरस भाग पाठ करावे लागत. व्याकरणावर फार जोर दिल्यामुळें विद्यार्थ्यांच्या मनांत भाषेविषयीं व वाङ्मयाविषयीं तितकेसें प्रेम उत्पन्न होत नसे.

व्याकरणाचा अभ्यास भाषाशिक्षणांत फायदेशीर आहे यांत शंका नाहीं. व्याकरणाच्या अभ्यासानें भाषेला शुद्धता येते, दुसऱ्याचें बोलणें व लिहिणें शुद्ध किंवा अशुद्ध हें समजतें, विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला एक प्रकारची कुशाग्रता येते. व्याकरणाच्या अभ्यासाचे हे फायदे कोणीहि अमान्य करीत नाहीं. परंतु प्राथमिक शाळेंतील मुलांचें वयोमान ध्यानांत घेतां व्याकरण अभ्यासाचे हे फायदे कोंवळ्या बुद्धीच्या मुलांना मिळणें शक्य आहे काय याचाहि विचार करावा लागतो. मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र या बाबतींत नकारात्मक उत्तर देतात. व्याकरणांतील एक भाग व्युत्पत्ति. व्युत्पत्तीच्या अभ्यासानें शब्दसंपत्तीची वाढ होते. भाषणांत व लेखनांत तर्कशुद्धता व सव्यसाचित्व येतें, शब्दाशब्दांमागें लपलेला सामाजिक इतिहास समजतो व त्यामुळें आनंद होतो.

व्याकरणवादी लोकांनीं पुढें केलेले हे मुद्दे खरे आहेत. पण प्राथमिक शाळांतील मुलांना त्याचा काय उपयोग? त्या लहान अर्भकांची विकसित होणारी बुद्धि शास्त्रीय तत्त्वांचें आकलन करण्यास असमर्थ असते, त्यांना वाणीनें आणि कृतीनें होणाऱ्या आविष्कारांत मजा वाटते, आनंद उपभोगतां येतो. तो वाणीचा आविष्कार ( भाषण ) आणि कृतीचा आविष्कार ( लेखन ) व्याकरण-शुद्ध असो अगर नसो. उत्तम बोलणें अगर उत्तम लिहिणें ही एक प्रकारची कला आहे. कलेला शास्त्राची जरूरी असते. पण केव्हां? कलेचा अभ्यास पुरेसा झाल्यावर हें विवेचन ध्यानांत ठेविलें म्हणजे व्याकरणाच्या अध्यायनाची मर्यादा ठरते.

प्राथमिक शाळांतील खालच्या वर्गांत व्याकरणाचें अध्यापन अत्यंत मर्यादित स्वरूपाचें असावें. शब्द आणि शब्दांचा योग्य उपयोग, वाक्याचे भाग, शब्दांच्या जाति या गोष्टी मुलांना समजल्या म्हणजे पुरे. वरच्या वर्गांत व्याकरणाचें निराळें पुस्तक लावून व्याकरणांतील कठीण कठीण भाग पाहिजे तर घ्यावेत.

व्याकरण हें भाषेचें शास्त्र आहे. शास्त्रीय विषय शिकविण्याच्या दोन पद्धति आहेतः—( १ ) उद्गामी ( २ ) अवगामी. पुष्कळशीं उदाहरणें देऊन त्यांचा अभ्यास करवावयाचा व त्यांवरून नियम शोधून काढावयाचा ही उद्गामी पद्धति. अवगामी पद्धतींत आधीं नियम सांगून टाकतात आणि मग उदाहरणें गोळा करतात. शास्त्रीय विषयांत कांहीं तत्त्वें शोधून काढलेलीं असतात. तीं तत्त्वें मूळच्या शोधकानें ज्या पद्धतीनें शोधकानें शोधून काढलीं ती पद्धती मुलांनीं अवलंबिली जावी असें नवीन शिक्षणशास्त्र सांगतें. व्याकरणाच्या पाठांतहि उद्गामी पद्धतीचा आश्रय करणें योग्य दिसतें. याचा अर्थ अवगामी पद्धति त्याज्य असा होत नाहीं. किंबहुना पाठाच्या वेळीं आवृत्ति घेतांना अवगामी पद्धतीविना चालावयाचें नाहीं. अशा रीतीनें व्याकरणाच्या—कोणत्याहि शास्त्रीय विषयाच्या—पाठाचा आरंभ उद्गामी पद्धतीचा व शेवट अवगामी पद्धतीचा झाला तरच अध्यापन यशस्वी होतें.

सुरुवातीस नियम अगर सिद्धान्त शोधून काढण्यासाठीं जीं उदाहरणें घ्यावयाचीं त्यांबद्दल थोडेंसें विवेचन करणें अनाठायीं होणार नाहीं. व्याकरण शिकविण्याची जुनी प्रथा गेली, त्याबरोबर नियम आणि व्याख्या यांनीं भरलेलीं व्याकरणाचीं क्रमिक पुस्तकें दिसेनाशीं झालीं. नव्या पद्धतीचीं म्हणून समजलीं जाणारीं अनेक पुस्तकें सध्यां दृष्टीस पडतात. परंतु याहि पुस्तकांतून उदाहरणें,

परिभाषा इत्यादींच्या अनेक चुका राहिल्या आहेत. पहिली चूक म्हणजे नियम शोधून काढण्यासाठीं घेतलेलीं वाक्यें इतकीं विसंगत म्हणूनच अर्थदृष्ट्याहि हास्यास्पद असतात कीं, वाचतांना व्याकरणाचा अभ्यास होण्याऐवजीं मुलांची करमणूक मात्र होते. हें टाळण्यासाठीं उदाहरणांकरितां द्यावयाचीं वाक्यें अर्थदृष्ट्या सुसंगत असावींत, किंबहुना एक परिच्छेद असावा. शक्य तितकें करून हा परिच्छेद क्रमिक पुस्तकांतील झालेल्या पाठांतील असावा, निदान झालेल्या पाठावर आधारलेला असावा. वाक्य हें भाषेचें आदि घटक आहे. व्याकरणांत सुद्धां वाक्याला प्राधान्य द्यावें, शब्दाला देणें गौण ठरेल. अभ्यासाला द्यावयाचीं वाक्यें सुटीं सुटीं असलीं तर चालण्याजोगें आहे. कारण त्यावेळीं शोधून काढलेला नियम लागू पडतो कीं नाहीं एवढेंच पाहावयाचें असतें.

व्याकरणाच्या पाठाची रूपरेषा सामान्यतः पुढीलप्रमाणें राहावीः——

( १ ) **पूर्वतयारीः**—पुष्कळशीं उदाहरणें असलेला परिच्छेद फळ्यावर लिहावा. मुलांनीं तो वाचावा. वाचनानंतर परिच्छेद समजला कीं नाहीं हें जाणण्यासाठीं एकादुसरा सामान्य प्रश्न विचारावा.

( २ ) **विवेचनः**—जो नियम काढावयाचा असेल त्यासंबंधींच्या उदाहरणाकडे प्रश्नोत्तर पद्धतीनें मुलांचें लक्ष खेचावें. उदाहरणाचे प्रमुख भाग फळ्यावर लिहावेत आणि त्यावरून मुलांना निष्कर्ष काढावयास सांगावा. तो निष्कर्ष म्हणजे नियम. शिक्षकानें तो नियम फळ्यावर लिहावा अगर मुलांना लिहावयास सांगावें. मुलांकडून तो म्हणून घ्यावा.

( ३ ) **आवृत्तिः**—तो नियम लागू पडणारीं उदाहरणें द्यावींत व मुलांकडून तीं अभ्यासावींत. मुलांना उदाहरणें तयार करावयास सांगावींत. लेखनासाठीं कांहीं व्यवसाय द्यावेत.

( ४ ) **गृहपाठः**—त्या नियमाचीं उदाहरणें क्रमिक पुस्तकांतून शोधून काढण्यांत व तीं लिहून आणण्यास सांगावें.

शक्य तों व्याकरणाचा अभ्यास क्रमिक पुस्तकांच्या अभ्यासाबरोबरच व्हावा. इ. '४ थीपर्यंत व्याकरणासाठीं निराळीं पुस्तकें नेमूं नये. पांचवी, सहावी, सातवी या इयत्तांत व्याकरणाचे पाठ, क्रमिक पुस्तकांवरूनच वर

दिलेल्या पद्धतीनें घ्यावेत व गृहपाठ म्हणून नेमलेल्या व्याकरण पुस्तकांचा अभ्यास करावा. नवीन अभ्यासक्रमांत व्याकरणविषयाची विभागणी शास्त्रीय पद्धतीनुसार केली आहे. त्याप्रमाणें शिक्षकानें व्याकरण शिकवावें.

---

## प्रकरण १७ वें

# लेखी काम (प्रबंधन)

मुलांना नीट वाचतां येतें, त्यांना कविता चांगल्या म्हणतां येतात, वाक्यरचनेच्या पाठाला मुलें चांगलीं चांगलीं उत्तरें देतात, एवढ्यावरून त्याचें भाषाशिक्षण संपलें असें म्हणतां येत नाहीं. किंबहुना वरील सर्व गोष्टी म्हणजे भाषेवर प्रभुत्व मिळविण्याची पूर्वतयारी असें म्हणतां येईल. भाषेवरील, मुलांचें प्रभुत्व अधिकांत अधिक कुठें दिसून येत असेल तर तें मुलांच्या लेखी कामांत. याच लेखी कामाला ‘ प्रबंधन ’ हा पारिभाषिक शब्द वापरावा. नुसते शब्द शिकल्यानें कांहीं विशेष साधत नाहीं, त्या शब्दांचा योग्य प्रसंगीं आणि योग्य ठिकाणीं उपयोग करतां आला पाहिजे. या गोष्टींची परीक्षा प्रबन्धनांत होते. एकाद्या विषयासंबंधीं मुलांना दहाबारा वाक्यें सुसूत्रित स्वरूपांत बोलण्याची किंवा लिहिण्याची क्षमता विद्यार्थ्यांत दिसून आली म्हणजे भाषाशिक्षकाचें अध्यापन सफल झालें म्हणावयाचें.

प्रकरण ७ आणि ८ यांमध्यें निवेदन हा जो तोंडी भाग त्याबद्दलचे बरेंच विवेचन झालें आहे. निवेदनाचा हेतु आणि प्रबंधनाचा हेतु सामान्यतः एकच. मात्र प्रबंधनाची मीमांसा करतांना मानसशास्त्रांतील कांहीं मुद्दे डोळ्यांसमोर ठेवावयास पाहिजेत. निवेदन काय किंवा प्रबंधन काय या दोन्हीं गोष्टींत मुलांची आत्माविष्काराची वृत्ति बलवत्तर असते. प्रबंधनांत मूल आपले विचार प्रकट करीत असतें या वाक्यांत “ आपले ” हा शब्द महत्त्वाचा आहे. शिक्षकाचे विचार ऐकून नंतर ते उच्चारून दाखविणें हें लेखनाचें उद्दिष्ट नाहीं. मुलांचे विचार, मुलांचे अनुभव, मुलांच्या इच्छा, आकांक्षा या लेखी कामांत स्पष्ट दिसाव्यात.

मुलांचा आत्माविष्कार निर्जन अरण्यांत होत नसतो; समाजांत होत असतो. ही संघप्रवृत्ति मुलांच्या ठिकाणीं जोरदार असते. आपण लिहितों तें दुसऱ्यांनीं वाचावें, आपणांस शाबासकी मिळावी असा मनांतल्या मनांत मुलें विचार करीत असतात. म्हणून संघप्रवृत्तीचा विचार प्रबंधनाच्यावेळीं आवश्यक झाला पाहिजे. या दृष्टीनें प्रबंधनाच्या वेळीं योग्य अशी परिस्थिति निर्माण करणें हें शिक्षकाचें प्रधान कर्तव्य ठरतें. या परिस्थितीशिवाय आणि आपलें लिखाण कोणीतरी वाचणार आहे हें आमिष असल्याशिवाय मुलें चांगल्या तऱ्हेनें लिहूं शकत नाहीं. लेखनाच्यासाठीं निवडावयाचा विषयसुद्धां मुलांच्या अनुभवांतील असावा, तरच मुलें त्याबद्दल आपले विचार लिहूं शकतील.

प्रबंधनाच्या बाबतींत मुलांच्या अनुकरण वृत्तीचा फायदा शिक्षकाला घेतां येईल, पण ही गोष्ट पांच, सहा, सात या इयत्तांत करतां येईल. मधून मधून नामवंत लेखकांचे लेख मुलांना वाचून दाखवावेत व त्यावर चर्चा करावी व या लेखकांप्रमाणें लिहिण्याविषयीं मुलांना सांगावें. मुलें या लेखकांचें अनुकरण करतात व त्यामुळें त्यांची भाषा पुष्कळच सुधारते.

( १ ) बालवर्ग, पहिली व दुसरी या वर्गांत लेखी कामावर विशेषतः भर देऊं नये. या इयत्तांत तोंडी काम किंवा निवेदन असावें. तिसऱ्या इयत्तेंत तोंडी कामाच्या वेळीं झालेल्या विषयावर पांच सहा प्रश्न फळ्यावर लिहावेत व त्यांचीं उत्तरें मुलांकडून लिहून घ्यावींत. क्रमिक पुस्तकाच्या शेवटीं अभ्यासासाठीं दिलेले प्रश्न लिहून घ्यावेत. लेखी कामाला पांच तऱ्हेनें सुरवात करतां येईल. ( १ ) व्याकरणावरून ( २ ) निबंधावरून ( ३ ) वाङ्मयद्वारां ( ४ ) स्वयंप्रेरित लेखनावरून ( ५ ) चालनात्मक चर्चेवरून. हा प्रकार जुन्या काळीं रूढ होता. किंबहुना प्रबंधन म्हणजे व्याकरण असें समीकरण मानण्यांत येई. परंतु नवीन पद्धतीप्रमाणें व्याकरण हें स्वतंत्र राहूं शकत नाहीं. यामुळें लेखनाची सुरवात व्याकरण पुस्तकावरून करणें आज बाजूला पडलें आहे.

( २ ) दुसऱ्या प्रकारांत तर्कशुद्ध विचारसरणीवरच फार भर देण्यांत येतो. म्हणून निबंधासाठीं निवडलेल्या विषयावर प्रथम मुद्देसूद आराखडा तयार करितात. मुद्दे गोळा करावयाचे, महत्त्वाच्या दृष्टीनें त्यांचा क्रम लावावयाचा, त्याला प्रस्तावना—उपसंहार यांची जोड द्यावयाची व मग मुलांनीं लेखनाला सुरवात करावयाची. ही पद्धत आजहि मोठ्या प्रमाणांत सुरू आहे. ही पद्धत

चांगली आहे; पण यांत मुख्य दोष असा कीं शिक्षकानें यांत प्रमुख भाग घ्यावयाचा असतो व सर्व मुलें शिक्षक पसंत करतील तेच मुद्दे, तेच विचार, तीच भाषा स्वीकारतात. वैयक्तिक भूमिका ठेवणें विद्यार्थ्यांना अशक्य होतें. आणि खऱ्या लेखनांत प्रत्येक विद्यार्थ्याचें व्यक्तिमत्त्व दिसावें असा मूलभूत हेतु असतो. हा हेतु या पद्धतींत सफल होत नाहीं. विषयाची प्रास्ताविक चर्चा आवश्यक असते पण सर्वांगीण चर्चेंत विषयासंबंधीं लिहिण्याची उत्सुकता कमी होते.

( ३ ) सुंदर वाङ्मयाच्या आधारें प्रबंधनाला सुरवात करावयाची म्हणजे नामवंत लेखकांचें उत्कृष्ट लिखाण मुलांकडून अभ्यासावयाचें. त्याची चर्चा करतांना लेखनाची भाषासरणी, तर्कशुद्धता, विचार, कल्पना यांकडे मुलांचें लक्ष खेचावयाचें व मुलांना तशा प्रकारचें लेखन करावयास सांगावयाचें. यावेळीं एक गोष्ट ध्यानांत ठेवावयाची कीं, चर्चेला घेतलेला विषय मुलांच्या आवाक्याबाहेरचा नसावा, भाषा दुर्बोध नसावी, विचारसरणी क्लिष्ट नसावी, असे आदर्श मुलांसमोर ठेविल्यास मुलांचें लेखन सुधारतें. पण या पाठांची योजना करण्याचें कौशल्य सर्व शिक्षकांच्या ठायीं असतें असें नाहीं, ज्यांना हे पाठ कौशल्यानें घेतां येतील त्यांनीं मधून मधून अवश्य घ्यावेत.

( ४ ) या पद्धतींत मुलांना पूर्ण स्वातंत्र्य दिलेलें असतें. मुलांनीं विषय निवडावयाचे व आपण निवडलेल्या विषयावर आपणांस सुचेल तें लिहावयाचें ही पद्धति म्हणजे दुसऱ्या प्रकारांत सांगितलेल्या पद्धतीच्या अगदीं उलट. दोन्हीहि पद्धति एकांतिक आहेत. एकींत शिक्षकालाच फक्त मुभा तर या पद्धतींत मुलांना मुक्तद्वार. मुलांचा एकंदर स्वभाव ध्यानांत घेतां शिक्षकाचें सहाय्य बिलकूल न घेतां तीं चांगल्या प्रकारें लिहूं शकतील असें गृहित धरणें धोक्याचें आहे. कदाचित् हुषार मुलें कांहीं लिहितील पण सामान्य बुद्धीच्या मुलांना शिक्षकाचें मार्गदर्शन अवश्य पाहिजे. केवळ गंमत म्हणून अशी पद्धति अधून मधून अंगीकारली तर मुलांच्या लेखनाची परीक्षा होईल एवढेंच.

( ५ ) वरील पद्धतींचें सार अशी पांचवी पद्धति आहे. या पद्धतीला "मीमांसापद्धति" म्हणावें. या पद्धतींत शिक्षकाचा भाग अल्प व मुलांचा भाग फार मोठा असतो. विद्यार्थ्यांच्या अनुमतीनें लेखनाचा विषय निवडावयाचा. त्या विषयाभोंवतीं वर्तुळ काढावयाचें. वर्तुळासभोंवतीं कसें, केव्हां, कां, कुठें, काय, कोण, कोणाचा इत्यादि प्रश्न-शब्द लिहावयाचे. या प्रश्नाच्या उत्तरांची नोंद मुलांनीं करावयाची, या उत्तरांत महत्त्वाच्या दृष्टीनें

क्रमवारी लावावयाची. प्रस्तावनेदाखल एकादुसरें सर्वसाधारण अर्थाचें वाक्य लिहून वरील उत्तरांत आलेल्या मुद्यांवर लेखन लिहावयाचें. या पद्धतीचा विस्तारानें उहापोह "भाषान्तर आणि निबंधलेखन" ( लेखकः वा. दा. गोखले व रा. म. मराठे, स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस, गिरगांव मुंबई ) या पुस्तकांत केलें आहे. शिक्षकांनीं तें अवश्य पहावें.

प्रबंधनाच्या सामान्य पद्धतींची आतांपर्यंत चर्चा झाली. आतां निरनिराळ्या प्रकारांकडे वळूं.

( १ ) **क्रमिकः**–पुस्तकांतील पाठावर आधारलेलें असें पुष्कळ लेखन करतां येईल. गोष्ट असली तर गोष्टींतील निरनिराळ्या व्यक्ति ती कशी सांगतील; पाठाचा सारांश लिहितां येईल.

( २ ) व्याकरणाच्या पाठांतून निर्माण होणारे निरनिराळे स्वाध्यायः– समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, केवळ संयुक्त, मिश्र वाक्यांचे आपापसांत बदल वगैरे.

( ३ ) **स्वतंत्र लिखाणः** —वर्णनात्मक, कथानकात्मक, पत्रलेखन, संवाद, सारांश वगैरे.

( ४ ) **अनुलेखनः**—( शुद्धलेखन ) सारखे, यांत्रिक व्यवसाय, स्वतंत्र लेखनांत निबंधाला फार महत्त्व आहे. या निबंधाचे विविध प्रकार होऊं शकतात.

( १ ) **साधीं वर्णनेंः**—आजूबाजूला वावरणाऱ्या व्यक्तिं, प्राणी, वस्तू, दृश्यें यांचीं वर्णनें. उ० घोडा, कुत्रा, गाय, शाळा, बाग, जत्रा, पोस्टमन, लोहार, सुतार, खेळ, बाजार वगैरे.

( २ ) **वर्णनात्मक निबंधः**—एकाद्या ऐतिहासिक अगर धार्मिक स्थळाचें वर्णन, प्रवास, सहली, पावसाळा, हिंवाळा इ. ऋतूंचीं वर्णनें; चांदणी रात्र, सकाळचें दृश्य इत्यादींचीं माहिती, आग, अपघात, इत्यादि प्रसंग; मजूर, गाडीवाला, भिकारी इत्यादींची शब्दचित्रें; घोडा, कुत्रा, खुर्ची, रुपया इत्यादींचीं आत्मचरित्रें, मोठ्या विभूतींचीं चरित्रें; 'मी राजा झालों तर' अशासारखे कल्पनामय विषय, वाचन, चालीरीती, संवयी, व मासिकें, शारीरिक शिक्षण इत्यादि विचारप्रवर्तक लेखन, निबंध शिकविण्याच्या पद्धतींचा विचार यापूर्वी झाला आहे. शिक्षकानें मीमांसा-पद्धतीचा अवलंब करावा व मुलांना लेखनाला प्रवृत्त करावें.

प्रबंधनामध्यें पत्रलेखनाला फार महत्त्वाचें स्थान आहे. पत्रलेखन हें व्यवहारांत अत्यंत उपयुक्त असल्यामुळें मुलांना त्यांत गोडी उत्पन्न होते. अल्प प्रमाणावर पत्रलेखन खालच्या वर्गांतहि घेतां येईल. पत्रव्यवहाराचे खासगी व सरकार दरबारी, व्यापारी असे प्रमुख भाग पडतात. खासगी पत्रांत घरच्या मंडळींना, नातेवाईकांना, मित्रांना, ओळखीच्या लोकांना लिहिलेल्या पत्रांचा समावेश होतो. सरकारी अधिकारी, मुख्याध्यापक, वर्गशिक्षक, दुकानदार इत्यादिकांना लिहिलेलीं पत्रें हीं दुसऱ्या प्रकारचीं पत्रें कशीं लिहावीं, पत्रांचे प्रकार, नमुने इत्यादि विस्तृत माहिती "लेखन-प्रवेश" भाग १, २, ३, ४ ( लेखकः–साळकी-गोखले, कर्नाटक प्रेस मुंबई ) या पुस्तकांत सांपडेल.

वरच्या वर्गांत पत्रव्यवहाराचा पाठ घेतांना एक नमुना मुलांपुढें ठेवावा. नमुनेवजा समोर असलेलें पत्र मुलांनीं नीट वाचावें. प्रश्नोत्तर पद्धतीनें पत्रांतील मुख्य विषय, विषयाची मांडणी, पत्राच्या आरंभींचा मायना, शेवट, पत्ता, तारीख इत्यादि पत्रलेखनांतील विशेष मुलांकडून काढून घ्यावे. तशा तऱ्हेचें पत्र मुलांकडून लिहून घ्यावें.

**संवादः**—संवाद करतां येईल असा एकादा गद्याचा पाठ आधीं घ्यावा. आणि मग त्यावर मुलांना संवाद लिहिण्यास सांगावें. सुंदर सुंदर संवादाचे धडे मुलांकडून अभ्यासून घ्यावेत. मग विवाद्य विषयांच्या दोन बाजू सांगून मुलांकडून संवाद लिहून घ्यावेत. एकाद्या इतिहासांतील प्रसंग निवडावा व त्याचें नाटकांत रूपांतर करावें. यांतील संवाद मुलांनीं रचावेत.

**सारांशः**—व्यवहारांत सारांशाला फार महत्त्व असतें. व्यापारी, अधिकारी, कारकून, शिक्षक इत्यादिकांचा सारांशाशीं हरघडी संबंध येतो. पत्रांची आवक–जावक नोंद, जमाखर्च, तार, टेलिफोन, संदेश हीं सर्व सारांशाचीं उत्तम उदाहरणें होत.

उत्तम सारांश लिहितां येणें हें अनेक दृष्टींनीं उपयुक्त ठरतें. त्यांत बुद्धीला शिक्षण मिळतें; चांगला मसुदा तयार करतां येतो; मनाची एकाग्रता, विचाराची कुशाग्रता, भाषेचा आटोपशीरपणा इत्यादि गुण सारांश काढतां आल्यानें संपादन करतां येतात. एकंदरींत सारांश काढतां येणें हा भाषाशिक्षणांतील एक प्रमुख भाग ठरतो.

**सारांश काढण्याचा पाठः**—( १ ) उतारा मुलांपुढें ठेवावा. ( २ ) मुलांनीं तो नीट वाचावा. ( ३ ) शिक्षकानें वर्गांत हिंडून कठीण शब्द व्यक्तिशः

मुलांस सांगावेत. (४) सुरवातीस सारांश तोंडी घ्यावा. हा उतारा कशाबद्दल हा प्रश्न या उताऱ्यांतील मुख्य मुद्यांचीं वाक्यें कोणतीं? मुद्यांचें विवेचन करणारीं दृष्टान्त उदाहरणादाखल दिलेलीं वाक्यें कोणतीं? याचीं उत्तरें टिपल्यावर, विवेचनाचीं वाक्यें बाजूला ठेवा व मुख्य वाक्यें आपल्या शब्दांत लिहा असें मुलांस सांगावें.

**अनुलेखन ( शुद्धलेखन ):**—शुद्धलेखनाचें महत्त्व पुढें दिलेल्या गोष्टींवरून पटेलः (१) बुद्धीला चांगलें शिक्षण मिळतें. शुद्धलेखनाच्या वेळीं एकाग्रता, सावधानता, या गुणांची आवश्यकता असते. (२) मोठमोठ्या कचेरींत मोठमोठे अधिकारी पत्रव्यवहार तोंडानें सांगतात, कारकून लिहून घेतात. यावेळीं शाळेंतील शुद्धलेखनाच्या अभ्यासाचा उपयोग होतो. (३) मुलांच्या श्रवणेंद्रियाची परीक्षा होते. (४) भाषेला शुद्धता येते. (५) वरच्या वर्गांत शिक्षक शिकवीत असतांना पुष्कळ टिपणें करावयाचीं असतात, त्याला शुद्धलेखनाची मदत होते.

**शुद्धलेखनाचा पाठः**—वर्गाला योग्य असा उतारा निवडावा. उतारा क्रमिक पुस्तकांतील असला तरी चालेल. तो उतारा शिक्षकानें वाचून दाखवावा.

(१) त्यावर दोनतीन प्रश्न विचारावेत. लिहावयास कठीण असलेले शब्द फळ्यावर लिहावेत. (२) उतारा सावकाश पण एकदांच उच्चारावा. मुलांनीं लिहिण्यास सुरवात करावी. (३) सगळा उतारा वाचून झाल्यावर व मुलांचें लिहिणें संपल्यावर शिक्षकानें तो उतारा जरा जलदीनें वाचावा. (४) पाट्या तपासाव्यात. मुलांनीं आपापसांत तपासाव्यात किंवा शिक्षकानें तें काम करावें. कांहीं हुषार मुलांची शिक्षकानें मदत घेतल्यास वेळ वांचतो. (५) प्रत्येक मुलानें आपल्या चुका पांचदा लिहून काढाव्यात.

## प्रकरण १८ वें

# लेखी काम कसें तपासावें ?

शिक्षकाच्या जीवितांत कष्टदायक काम कोणतें असा प्रश्न विचारला तर त्याला लेखी कामाची तपासणी हें अचूक उत्तर मिळेल. या तपासणीसाठीं शिक्षकाला इतका वेळ खर्चावा लागतो व त्याला इतकी दगदग होते कीं पुष्कळसे शिक्षक या कामाकडे नेहमीं कानाडोळा करण्याला प्रवृत्त होतात. खरें पाहातां ही गोष्ट फार अनिष्ट आहे. मुलांना लिहावयास सांगावयाचें आणि तें न तपासतां ठेवावयाचें यासारखी शिक्षणक्षेत्रांत हानिकारक गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. कारण मुलांच्या चुका तावडतोब सुधारल्या नाहींत, तर त्या चुका त्यांच्या लेखनांत कायम होऊन बसण्याचा बराच संभव असतो; व यामुळें लेखी कामाच्या बुडाशीं असणारा हेतुच असाध्य होतो.

मुलें लेखनांत चुका कां करतात याचा आपण बारकाईनें विचार केला तर त्याचीं दोन कारणें स्पष्टपणें दिसून येतील. एक म्हणजे मुलांचें तोंडी काम व्यवस्थित रीतीनें झालें नसावें किंवा मुलांना लिहावयास दिलेला व्यवसाय त्यांच्या शक्तीच्या बाहेरचा असावा. एकाद दुसरा मुलगा लेखनाच्या बाबतींत निष्काळजी असूं शकतो. या कारणांपैकीं कोणतें कारण आपल्या विद्यार्थ्यांच्या बाबतींत असूं शकेल, हें व्यक्तिशः शिक्षकानें ठरवावें व त्याप्रमाणें आपल्या पाठांत दुरुस्ती करावी म्हणजे मुलांच्या चुकांचें प्रमाण आपोआपच कमी होत जाईल.

लेखी काम तपासतांना शिक्षकानें पुढील गोष्टींकडे लक्ष द्यावें. (१) व्याकरणशुद्धता (२) शुद्धलेखन (३) हस्ताक्षर (४) विचारांची मांडणी (५) भाषासरणी. सांप्रत बहुतेक शिक्षक व्याकरणशुद्धतेकडेच अधिक लक्ष देतात व लेखनांतील शुद्धाशुद्ध पाहतात. वास्तविक मुलांनें विचार कसे मांडले आहेत, परिच्छेदांची योजना व्यवस्थित आहे कीं नाहीं, योग्य अर्थ उत्पन्न होण्याला योग्य शब्दांची योजना विद्यार्थ्यांना करतां येते कीं नाहीं या मुद्यांकडे शिक्षकानें अधिक लक्ष देणें इष्ट असतें.

लेखी काम तपासण्याच्या बऱ्यावाईट अनेक पद्धति प्रचारांत आहेत. त्यांपैकीं परंपरागत आलेली पद्धति म्हणजे आठवड्यानें अगर पंधरवड्यानें वर्गांतील सर्व वह्या गोळा करावयाच्या, शिक्षकानें फावल्या वेळांत त्यांतील चुका दुरुस्त करावयाच्या आणि वह्या परत द्यावयाच्या. तळमळीचा शिक्षक हें काम मोठ्या प्रामाणिकपणें करतो. सहनशीलतेची खरोखर कसोटी असते. पण एवढा प्रचंड उद्योग करणारे कांहीं शिक्षक आढळतात. पण ही तळमळ, हा उद्योग वाऱ्यावारी जातो हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. दुरुस्त केलेल्या वह्या विद्यार्थी परत उघडून त्यांतील चुका आपण होऊन दुरुस्त करतील ही अशक्यकोटींतील गोष्ट आहे. यांतील खरी मख्खी म्हणजे चुका शिक्षकानें दुरुस्त न करतां त्या विद्यार्थ्यांनीं स्वतः दुरुस्त केल्या पाहिजे. या विधानाप्रमाणें आदर्शपद्धति म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यासमोर त्याची वही पाहाणें व चुका दुरुस्त करून घेणें. सोईसाठीं शिक्षक पांच पांच किंवा सहा सहा विद्यार्थ्यांचे गट तयार करतो. शाळा सुरू होण्यापूर्वीं अगर शाळा सुटल्यानंतर एकेक गट शिक्षकाकडे येतो. शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्याला जवळ घेऊन त्याच्या चुका दाखवितो, चुकांची मीमांसा करतो व तिथल्यातिथें मुलां-कडून चुका दुरुस्त करून घेण्यांत येतात. व्यक्तिशः प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष दिल्यामुळें व चूक कां झाली, कशी झाली हें पटल्यामुळें ही पद्धति विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें अत्यंत फायदेशीर ठरते. एकच अडचण दिसते कीं शिक्षकानें एवढा वेळ कुठून आणावयाचा ? यामुळें आदर्श परंतु अव्यवहार्य असा छाप या पद्धतीवर मारण्यांत येते. यासाठीं व्यावहारिक व सोईची अशी तिसरी पद्धति सुचविण्यांत येते. या पद्धतींत विद्यार्थ्यानें स्वतःच्या चुका स्वतःच सुधारावयाच्या असतात. शिक्षक लेखनांतील चुका खुणांनीं दाखवितो. त्या दुरुस्त करीत नाहीं. विद्यार्थी चुका पाहातो, त्या चुकांखालील खुणा जाणतो व त्याप्रमाणें स्वतः सगळ्या चुका दुरुस्त करून वही परत शिक्षकाला दाखवितो. या पद्धतींत शुद्धाशुद्ध-तेच्या चुका नीट दाखवितां येतात, पण विचारकल्पना, शब्दयोजना इत्यादि लेखनांतील महत्त्वाचा भाग चर्चिला जात नाहीं. यासाठीं शिक्षक खालीं आपला शेरा लिहितो व वरील गोष्टींचें दिग्दर्शन करतो.

या पद्धतींत उपयोजावयाच्या खुणा नीट रीतीनें आधीं ठरवाव्या लागतात. त्यांचा अर्थ विद्यार्थ्यांना माहीत असावयास पाहिजे. केवळ मार्गदर्शक म्हणून पुढें कांहीं खुणा दिल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| शु.—शुद्धलेखन | ^ | —अक्षर वगळलें गेलें | |
| व्या.—व्याकरण | ? | —काय म्हणावयाचें तें स्पष्ट नाहीं. | |
| वि.—विरामचिन्हें | × | —लागू पडत नाहीं | |
| वा.—वाक्प्रचार, म्हण चुकीची | ! | —अतिशयोक्त विधान | |

चुका दुरुस्त करीत बसण्यापेक्षां त्या होऊंच नये याबद्दल शिक्षकानें दक्षता घेतली तर किती तरी कंटाळवाणें काम टळेल. खालच्या वर्गांत लेखनांत येणारे कठीण शब्द फळ्यावर लिहून ठेवावेत. आपलें लेखन मुलांनीं मोठ्यानें स्वतःशीं वाचावें म्हणजे स्वतःच्या चुका स्वतःस दिसतात व लगेच त्यांची दुरुस्ती होते. लेखन चाललें असतां शिक्षकानें वर्गांत फिरावें, मुलाच्या चुका दुरुस्त कराव्यात, कांहीं मुलांच्या वह्या वर्गांत मोठ्यानें वाचून दाखवाव्यात व चुका कोणत्या व त्या दुरुस्त कशा करावयाच्या हें मुलांना विचारावें. निष्काळजीपणानें लिहिलेल्या वह्या तपासूं नये. म्हणजे मुलें नीट लिहूं लागतात.

खालच्या वर्गांतील लेखी कामांत शुद्धलेखनाकडे अधिक लक्ष द्यावें; भाषासरणी विचारांची मांडणी हीं वरच्या वर्गांसाठीं असतात. ज्या चुका पुष्कळसे विद्यार्थी करीत असतील, त्या चुकांची नोंद ठेवावी व अधून मधून एकादा तास घेऊन त्या चुका मुलांना समजून द्याव्यात.

लेखन कामाच्या तपासणीचा मूळचा हेतु हा कीं, मुलांनीं एकदां केलेल्या चुका परत करूं नये. हा हेतु साध्य होण्यासाठीं शिक्षकांना झटावयाचें असतें. सध्यां वर्गांत मुलें पुष्कळ असतात. त्यामुळें लेखनतपासणी व्हावी तितकी समाधानकारक होत नाहीं. शाळाधिकाऱ्यांनीं ही गोष्ट ध्यानांत घेऊन शिक्षकाच्या कामाची पाहाणी करणें इष्ट होईल. आमच्या मतें यांतूनहि मार्ग काढतां येण्याजोगा आहे. योग्य रीतीनें दुरुस्त करावयाचें लेखी काम शक्य तितकें कमी द्यावें व तें मात्र चांगलें तपासावें. याव्यतिरिक्त क्रमिक पुस्तकांतील धड्याखालीं असलेले प्रश्न लिहून आणणें, व्याकरणांतील लेखन-व्यवसाय इत्यादि प्रकार शिक्षकानें नजरेखालून घालावेत. बारकाईनें तपासलें नाहीं तरी चालेल. यामुळें पुष्कळसें लिहून होईल व मुलांच्या चुकाहि त्यांच्या नजरेस आणतां येतील. सर्वसामान्य चुकांची नोंद ठेवून त्याबद्दल वेळोवेळीं चर्चा केल्यास लेखनांत चुका कमी होतात हीहि गोष्ट विसरतां नये.

# परिशिष्ट १ लें

# भाषाशिक्षणांतील विविध क्रीडा

**खालच्या वर्गासाठीं :**

१. डोळेबंद खेळ:—झालेल्या गोष्टींचीं अगर पाठांचीं वाक्यें तक्त्यावर लावावींत. मुलांनीं तीं प्रथम मनांत वाचावींत. नंतर मुलांनीं आपापले डोळे हातांनीं झांकून घ्यावे किंवा मुलांना फळयाकडे पाठ करून उभें राहाण्यास सांगावें. मग शिक्षकानें तक्त्यावरील एकादा शब्द अगर वाक्य हळूच काढावें. मुलांनीं डोळे उघडावेत अगर फळयाकडे तोंडें करावींत. फळयावर नसलेला शब्द किंवा वाक्य मुलांनीं ओळखावें. शिक्षकांच्याऐवजीं वर्गांतील मुलांनीं आळीपाळीनें वाक्यें अगर शब्द काढण्याचें काम केल्यास अधिक रंग येतो.

२. जागा पालट:—मुलें वर्तुळाकार उभीं रहातात. प्रत्येकाकडे कांहीं शब्द किंवा वाक्यें दिलेलीं असतात. गोष्टीचा तक्ता समोर असतो. गोष्टींतील कोणत्याही दोन शब्दांचा किंवा वाक्यांचा उच्चार शिक्षक करतो. ज्या मुला-जवळ ते शब्द किंवा तीं वाक्यें असतात, तीं मुलें आपल्या जागा पालटतात. जागा पालटण्यास उशीर लागला तर तो मुलगा हरला.

३. अनुमान खेळ:—फळयावर कांहीं शब्द किंवा वाक्यें लिहितात. समोर मुलें वर्तुळाकार उभीं राहतात. एका मुलाला मध्यें आणून त्याचे हात-रुमालानें डोळे बांधतात. दुसरा एक मुलगा फळयावरील एका शब्दावर बोट ठेवतो. बाकीचीं मुलें तो शब्द आपापल्या पाटीवर लिहितात. पहिल्या मुलाचे डोळे सोडण्यांत आल्यावर तो कोणता शब्द मुलांनीं लिहिला असेल तें अनु-मान करतो. त्यानें सांगितलेला शब्द बरोबर नसेल तर मुलें "चूक, चूक" असें ओरडतात. बरोबर शब्द आल्यावर दुसऱ्या मुलावर डोळे बांधून घेण्याची पाळी येते.

४. शब्दओळख:—कोणत्याहि गोष्टीचा तक्ता समोर टांगावा. त्यांतील कोणताहि शब्द शिक्षकानें उच्चारावा. तो शब्द मुलांनीं तक्त्यांत दाखवावा. बरोबर रीतीनें दाखविणारा मुलगा दुसरा एकादा शब्द विचारतो व मुलें तो शब्द दाखवितात.

५. शब्द जमविणें:—पुष्कळशीं शब्दकार्डें किंवा वाक्यकार्डें मुलां-समोर शिक्षक ठेवतो. त्यांतील एकादे कार्ड शिक्षक उचलतो व फारच थोडा वेळ मुलांना दाखवितो. जो मुलगा तें कार्ड अचूक वाचतो तो धांवत जाऊन तें कार्ड घेऊन येतो. अशा रीतीनें जो अधिक कार्डें जमवील तो विजयी होतो.

६. शब्दनिवड:—मुलाकडे शब्दकार्डें किंवा वाक्यकार्डें देण्यांत येतात. मुलें तीं कार्डें आपल्यासमोर ठेवतात. शिक्षक एकाद्या मुलाला कार्ड निवडण्यास व वाचण्यास सांगतो. ज्यांच्या पुढील कार्ड वाचलें जातें, त्यानें तें तत्काळ शिक्षकांजवळ आणून द्यावयाचें. ज्या मुलांजवळ कमी कार्डें राहातील तो विजयी.

७. गोष्ट बनविणें:—शिकलेल्या गोष्टींतील शब्दकार्डें किंवा वाक्यकार्डें यांचे पुष्कळ गट तयार करावेत. मुलांचे वेगवेगळे गट पाडून त्यांना ते गट वांटून द्यावेत. प्रत्येक गटानें तीं कार्डें आपापसांत विभागून घ्यावींत व गोष्ट तयार करावी. जो गट गोष्ट आधीं तयार करील तो विजयी.

**वरच्या वर्गासाठीं:**

१ समानार्थी शब्द:—शब्दांचे दोन समूह घ्यावेत. पहिल्या गटांतील शब्दांचे समानार्थी शब्द दुसऱ्या गटांत विनाक्रमानें द्यावेत. या समूहांतील शब्दांच्या जोड्या जमविण्यास सांगावें.

२ विरोधार्थी शब्द:—वरीलप्रमाणेंच. फक्त दुसऱ्या गटांत समानार्थी शब्दांऐवजीं विरुद्ध अर्थाचे शब्द योजावेत.

२ वाक्यांश-जुळणी:—एका बाजूस उद्देश्य वाक्यें द्यावींत. त्यांसमोर विधेय-वाक्यें सरमिसळ करून लिहावींत. मुलांनीं उद्देश्य-वाक्यें व विधेय-वाक्यें यांचा योग्य क्रम लावावा.

४ वाक्य-पूरण:—अपुरीं वाक्यें द्यावींत. योग्य शब्द घालून मुलांनीं तीं पुरीं करावींत. जे शब्द मुलांनीं अभ्यासावे असें शिक्षकाला वाटेल ते शब्द वाक्यांत वगळावेत व मुलांनीं ते त्या त्या वाक्यांत योजावेत.

५ शब्द-निवड:—एक शब्द कमी असलेलें वाक्य लिहावें आणि त्या वाक्यासमोर ओळीनें तीन चार शब्द लिहावेत. या शब्दांपैकीं योग्य तो शब्द मुलांनीं निवडावा. उ० मुलगा दाराच्या ......लपला. समोर, पुढें, आड वरतीं-

......पानें डोक्यावर ठेवतात. फणसाचीं, वडाचीं, एरंडाचीं.उंदीर धोतर दातांनीं ......ओढतो, नेतो, कुरतडतो, धरतो.

६ शब्दार्थ-ओळख:—एकाखालीं एक अनेक शब्द लिहावेत. प्रत्येक शब्दाच्या समोर तीन चार शब्द ओळीनें लिहावेत. पहिल्या शब्दाचा योग्य अर्थ सांगणाऱ्या शब्दाखालीं मुलांनीं रेघ काढावी.

| | |
|---|---|
| उद्योग | कामधंदा, आळस, झोप, खेळ |
| कथा | गोष्ट, श्लोक, भाषण, वाचन |
| घामट | स्वच्छ, नीट, घामानें भरलेलें, धुतलेलें |

७ वाक्य-क्रम:—कोणता तरी परिच्छेद घ्यावा. गोष्ट असल्यास अधिक सोईचें. त्यांतील वाक्यें वर खालीं, सरमिसळ लिहावींत. मुलांनीं त्या वाक्यांचे क्रम लावावेत व मूळचा परिच्छेद किंवा मूळची गोष्ट तयार करावी.

केवळ मार्गदर्शनासाठीं म्हणून वरील खेळ दिले आहेत. त्याच्या आधारें किंवा स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर शिक्षकाला अशा प्रकारचे विविध खेळ तयार करतां येतील. मुलांचें शिक्षण क्रीडन पद्धतीनें झालें, तर सर्व मुलें त्यांत हौसेनें भाग घेतात. आणि खेळतां खेळतां अनेकविध गोष्टींचें त्यांना ज्ञान होतें. पाठ संपल्यावर आवृत्तीसाठीं म्हणून वरील प्रकारच्या खेळांची योजना शिक्षकानें अवश्य करावी म्हणजे पाठ यशस्वी होण्यास फार मदत होते.

---

## परिशिष्ट २ रें

# नमुन्याचे पाठ

खालच्या वर्गासाठीं:—वाचनाच्या पूर्वतयारीचे पाठ.

### पाठ १

प्रस्तावना:—गाय, वासरूं, मुलगा, मागच्या बाजूला घर, घराजवळ कांहीं झाडें अशा चित्रावरून चर्चेला सुरवात.

विवेचन:—चित्रांतील गोष्ट दाखवून

| | |
|---|---|
| प्रश्न:—हें काय आहे ? | उ०:—हें घर आहे. |
| ,, हा कोण आहे ? | ,, हा मुलगा आहे. |
| ,, या मुलाला आपण काय नांव देवूं या ? | ,, आपण याला " रामू " म्हणूं या. |
| ,, ही कोण आहे ? | ,, ही गाय आहे. |
| ,, हें कोण आहे ? | ,, हें वासरूं आहे. |
| ,, हें घर कोणाचें ? | ,, हें रामूचें घर आहे. |
| ,, ही गाय कोणाची ? | ,, ही रामूची गाय आहे. |
| ,, गाय रामूला काय देते ? | ,, गाय रामूला दूध देते. |
| ,, वासरूं कुठें उभें आहे ? | ,, वासरूं गाईजवळ उभें आहे. |

प्रश्नाचें उत्तर प्रथम एकेकट्या मुलाकडून काढून घ्यावें. नंतर सर्व विद्यार्थ्यांना म्हणावयास सांगावें. उत्तर पूर्ण वाक्यात्मक असावें. सर्व उत्तरें काढून घेतल्यावर व सर्व मुलांकडून तीं म्हणून झाल्यावर वर्गातील हुषार मुलाला चित्राबद्दल माहिती सांगण्यास सांगावें. उजळणीसाठीं वाटल्यास परिशिष्ट १ मधील क्रीडा घ्याव्यात.

## पाठ २

### पोशाकाविषयीं

**प्रस्तावना:**—चित्र–कोट, सदरा, टोपी, विजार घातलेला मुलगा. बाजूला कोट, सदरा, टोपी, विजार या वस्तूंचीं अलग चित्रें.

**विवेचन:**—पाठ १ प्रमाणें प्रश्न विचारून उत्तरें मुलांकडून काढून घ्यावींत.

## पाठ ३

### घरचीं माणसें

**प्रस्तावना:**—आई, वडील, मोठा भाऊ, लहान ताई माजघरांत आहेत असें चित्र.

**विवेचन:**—हे कोण आहेत ? हे रामूचे बाबा आहेत.

हो कोण आहे ? ही रामूची आई आहे.

हा कोण आहे ? हा रामूचा दादा आहे.

| | |
|---|---|
| ही कोण आहे ? | ही रामूची ताई आहे. |
| रामूचे बाबा काय करीत आहेत ? | रामूचे बाबा पुस्तक वाचीत आहेत. |

अशा रीतीनें बाकीच्यांबद्दल प्रश्न विचारावेत.

## पाठ ४

### सकाळचा कार्यक्रम

**प्रस्तावनाः**—चित्रें:-( १ ) मुलगा तोंड धूत आहे. ( २ ) देवाला नमस्कार करीत आहे. ( ३ ) दूध पीत आहे. ( ४ ) पुस्तक वाचीत आहे. ( ५ ) ताईबरोबर खेळत आहे.

**विवेचनः**—हा आपला रामू. (पहिलें चित्र दाखवून) रामू काय करीत आहे ? रामू तोंड धूत आहे. असेच प्रश्न बाकीच्या चित्रांसंबंधीं विचारावे. मुलांना उत्तरें नीट देतां आलीं म्हणजे

**आवृत्तिः**—एका मुलास उद्देशून

| | |
|---|---|
| तूं सकाळीं किती वाजतां उठतोस ? | मी सकाळीं ६ वा. उठतों. |
| उठल्यावर प्रथम काय करतोस ? | मी तोंड धुतों. |

असे प्रश्न विचारून सकाळच्या कार्यक्रमाची चर्चा करावी. अशा रीतीनें जेवण, रस्ता, शाळा, खेळ इत्यादि मुलांच्या जीवितांतील अनुभवांवर आधारलेलें संभाषण बरेच दिवस चालू ठेवावें.

## पाठ ५

विषयः—**मराठी** पोटविषय—**वाक्यरचना**

इयत्ता १ ली वेळ ३५ मिनिटें.

**साहित्य**—गाई, गुराखी, नदी, झाडें, डोंगर, पांखरें अशा प्रसंगाचें चित्र.

**प्रस्तावना व हेतुः**—या चित्रांत काय काय दिसत आहे ? आणखी काय आहे ? इत्यादि प्रश्नद्वारें चित्रांचीं नांवें ओळखून घेणें.

आतां या नांवाचे शब्दावरून वाक्यें बनवूं.

| विषय | पद्धति |
|---|---|
| प्रतिपादनः— | मुलांनीं सांगितलेलीं चित्रांचीं नांवें फळयावर टिपणें. नंतर क्रमवार शब्दास अनुसरून प्रश्न विचारणें.<br>किती गाई आहेत ? मुलें किती आहेत ? हा मुलगा काय करीत आहे ? दुसरा काय करतो आहे ? कुठें बसला आहे ? पांखरें काय करीत आहेत ? आकाशाचा रंग कोण ओळखतो ? ( निळा ) मग आकाशाचा रंग कसा आहे असें म्हणतां येईल ?<br>झाड कोठें आहे ? ( झाड नदीकांठीं आहे. ) गाय काय करीत आहे ? ( गवत खात आहे. ) हा मुलगा खालीं वांकून काय करतो आहे ? ( मुलगा दगड उंचलतो आहे. ) गाईंची राखण करणारास काय म्हणतात ? कोणास ठाऊक आहे कां ? ( गुराखी, ) मुलांना माहीत नसल्यास आपण नांव सांगणें. वगैरे प्रश्न विचारून वाक्यें तयार करून घेणें व तीं क्रमानें फळयावर लिहिणें. |
| २ मुलांचें वाचनः— | फळयावर लिहिलेलीं वाक्यें—दोन, तीन मुलांकडून वाचून घेणें. |
| ३ आवृत्तिः— | मुलगा कुठें बसला आहे ? गाई किती आहेत ? मुलें तीन आहेत, हें उत्तर मला पाहिजे आहे. तर मी कसें विचारीन ? मुलगा पांवा वाजवितो. हें कसें विचारावें ? याप्रमाणें एक, दोन मुलांना प्रश्न विचारावयास सांगून उत्तरें काढून घेणें व त्यांना योग्य तेथें मदत करणें. |
| गृहपाठः— | बोर्डावरील अपुरीं वाक्यें पुरीं करून घेणें व लिहून झालेल्यांपैकीं दोन वाक्यें लिहावयास सांगून तपासणें. |

| शब्द | फळ्यावरील काम |
|---|---|
| १ गाय | १ गाई चार आहेत. |
| २ मुलें | २ तीन मुलें आहेत. |
| ३ पांवा | ३ मुलगा पांवा वाजवीत आहे. |
| ४ पांखरें | ४ पांखरें उडत आहेत. |
| ५ आकाश | ५ आकाश निळें दिसत आहे. |
| ६ झाडें | ६ झाडें दोन आहेत. |
| ७ नदी | ७ झाडें नदीकांठीं आहेत. |
| ८ दगड | ८ मुलगा दगड उचलीत आहे. |
| ९ डोंगर | ९ गाय डोंगराजवळचें गवत खातें. |
| १० गुराखी | १० गुराखी गाई राखतो. |

१ ................निळें आहे.
२ मुलगा......... वाजवीत आहे.
३ ......... .....गवत खाते.
४ गुराखी......... राखतो.
५ झाड............आहे.

## पाठ ६

विषय—भाषा पोटविषय—वाक्यरचना

इयत्ता १ ली वेळ २५ मिनिटें

**साहित्यः**—शाळेचें चित्र.

**प्रस्तावना व हेतुः**—मुलांना चित्र दाखविणें.

**हेतुकथनः**—चित्रांतील प्रत्येक वस्तूबद्दल वाक्य तयार करूं ?

| विषय | पद्धति |
|---|---|
| **१ चित्रांतील वस्तु ओळखणेंः—** | हें चित्र कशाचें आहे ? ( शाळेचें )<br>शाळेचे पुढें कोणता भाग दिसतो ? (बाग)<br>बागेंत काय दिसतें ? ( झाडें )<br>झाडावर काय दिसतात ? ( फुलें )<br>दारावर काय दिसतो ? ( वेल )<br>शाळपुढें काय दिसतो ? ( झेंडा )<br>आपली शाळा सुरू होते हें आपणांस कसें कळतें ? ( घंटा )<br>शाळेंत कोण येतात ? ( मुलें )<br>त्यांचे हातांत काय दिसतात ? ( पुस्तकें )<br>आपणांस कोण शिकवितात ? ( गुरुजी ) |

| विषय | पद्धति |
|---|---|
| **२ वाक्यें तयार करणें:—** | वाक्य फळयावर लिहिणें. |
| **३ आवृत्ति:—** | मुलांकडून वाक्यें वाचून घेणें. |
| **४ गृहपाठ:—** | मुलांकडून वाक्यें पाटीवर लिहून घेणें. |

शब्द **फळयावरील काम**

शाळा, बाग, झाडें, फुलें, वेल, झेंडा, घंटा, मुलें, पुस्तक, गुरुजी.

१ ही आमची शाळा आहे. २ शाळेंत बाग आहे.
३ बागेंत झाडें आहेत. ४ झाडावर फुलें दिसतात.
५ दारावर वेली आहेत. ६ शाळेवर भगवा झेंडा दिसतो.
७ ही शाळेची घंटा आहे. ८ मुलांचे हातांत पुस्तकें आहेत.
९ आमचे गुरुजी फार मायाळू आहेत.

## पाठ ७

विषय—**भाषा** पोटविषय—**वाक्यरचना**

इयत्ता २ री वेळ ३५ मिनिटें

**साहित्य**—सूर्य, घरें, शेतकरी,ओढा, झाडें, देऊळ अशा प्रसंगाचें चित्र.

**प्रस्तावना व हेतु**—या चित्रांत तुम्हांस कोणकोणतीं चित्रें दिसत आहेत.? आणखी काय? इत्यादि प्रश्नांवरून चित्रांचीं नांवें ओळखून घेणें.

आज आपण या चित्राविषयीं अधिक माहिती मिळवूं.

| विषय | पद्धति |
|---|---|
| **१ प्रतिपादन:—** | सूर्य डोंगराआडून नुकताच वर येत असलेला दिसत आहे. अशा वेळीं आई तुम्हांस " सूर्य |

| विषय | पद्धति |
|---|---|
| | डोंगराआडून वर येत आहे. बाळ ऊठ " असें लांब वाक्य बोलते का ? मग काय म्हणते ? ( सूर्य उगवला. ) कोणती वेळ असावी ती ? ( सकाळ ) नुसतें सकाळ न म्हणतां पूर्ण वाक्य जमवून नीट कोण उत्तर देतो ? मी घरांत बसलों आहें. अशा वेळीं तेथूनच बाहेर सूर्यउगवल्याचें मी कशावरून ओळखेन ? ( सूर्य किरणावरून) सकाळीं सूर्याचीं किरणें कशीं दिसतात ? (सोनेरी) हीं सोनेरी किरणें कोठें कोठें पसरतात? हा रस्त्यानें कोण चालला आहे ? ( शेतकरी ) तो कोठें निघाला असावा ? ( शेताकडे ) कां ? हें चित्र कशाचें आहे ? ( ओढा ) ओढ्याचे कांठाला काय दिसत आहे ? ( झाडें ) गांवाचे जवळूनच ओढा वहात आहे. मग गांवांतील लोक पिण्याकरितां पाणी कोठून आणीत असतील ? ( ओढ्याचें ) शेतकऱ्याचें समोर हें कसलें चित्र दिसत आहे ? ( देऊळ ) कोणत्या देवाचें देऊळ असावें ? ( मारुतीचें ) कोणत्या वारीं आपण मारुतीला जातो ? ( शनिवारीं ) घरें लहान झोपड्यासारखीं दिसत आहेत. असा देखावा दिसतो. तेव्हां त्यास आपण कसलें गांव म्हणतों ? ( खेडेगांव ) |
| २ वाक्यें मुलांकडून वदवून घेणें— | फळ्यावर टिपलेल्या शब्दावरून तोंडीं वाक्यें मुलांकडून वदवून घेणें. शब्दांचे उच्चाराकडे योग्य लक्ष पुरवून चुकांचे उच्चार दुरुस्त करणें तसेंच चुकीचें वाक्य दुरुस्तीसाठीं मदत करणें. |
| ३ आवृत्तिः— | वाक्यांचा पुनरुच्चार करून घेणें, आणि चुकीचीं वाक्यें मुलांकडूनच " काय चुकलें ?" असें विचारून दुरुस्त करून घेणें. |
| ४ गृहपाठः— | हीं वाक्यें पाटीवर लिहावयास सांगून तपासणें. शुद्धाशुद्धतेकडे योग्य तें लक्ष पुरविणें. |

| शब्द | वाक्यें— |
|---|---|
| १ सूर्य. | १ सूर्य उगवला. |
| २ सकाळ. | २ सकाळ झाली. |
| ३ सोनेरी किरणें. | ३ सोनेरी किरणें घरावर पसरलीं. |
| ४ शेतकरी. | ४ शेतकरी बैल घेऊन चालला आहे. |
| ५ शेत. | ५ तो शेतांत काम करतो. |
| ६ ओढा. | ६ गांवाजवळ ओढा वहात आहे. |
| ७ झाडें. | ७ ओढ्याचे कांठीं झाडें आहेत. |
| ८ पाणी. | ८ गांवचे लोक ओढ्याचें पाणी पितात. |
| ९ देऊळ ( मारुतीचें ) | ९ जवळच मारुतीचें देऊळ आहे. |
| १० शनिवार. | १० लोक शनिवारीं मारुतीला जातात. |

## पाठ ८

**विषय—वाक्यरचना** पोटविषय—**चौकांतील शिपाई**

इयत्ता २ री वेळ ४० मिनिटें

**साहित्य**—रस्त्यावर शिपाई उभा आहे असें चित्र दाखविणें.

**प्रस्तावना व हेतु**—चित्राच्या सहाय्यानें चित्रांतील निरनिराळया वस्तु दाखविणें.

**हेतुकथन**—ह्या चित्रासंबंधीं आज आपण सात आठ वाक्यें लिहूं.

| विषय | पद्धति |
|---|---|
| **स्थळः**— | चित्र दाखविणें. हें कसलें चित्र आहे? ( रस्त्याचें )<br>हा येथें कोण उभा आहे? ( शिपाई ) |
| **पोशाखः**— | याचा पोशाख कसा आहे? ( डोक्यावर खाकी रंगाचा फेटा आहे. अंगांत खाकी रंगाचा सदरा आहे. अर्धी विजार आहे. कमरेला पोलिशी पट्टा आहे. पायांत चपला आहेत. पायाला पट्टा गुंडाळलेला आहे. ) |

| विषय | पद्धति |
|---|---|
| कर्तव्यः— | याला येथें कोणीं उभें केले आहे ? (पोलीस खात्यानें) याला येथें कशासाठीं उभें केलें आहे ? (गाड्या, सायकली, मोटारी यांची रहदारी व्यवस्थेशीर चालावी म्हणून ).<br>हा येथें उभा राहिला नसता तर काय झालें असतें ? (वाटेल त्यानें वाटेल त्या बाजूनें गाड्या, सायकली, मोटारी हाकल्या असत्या व अपघात झाले असते. )<br>गाड्या-घोड्यांची व्यवस्था पोलीस कशी ठेवितो ? हात दाखवून समोरच्या गाड्या उभ्या करतो व बाजूच्या गाड्या चालूं लागतात.<br>असें चौक कोणकोणते आहेत ? (बुधवार चौक, स्वारगेट चौक, लकडीपूल चौक ) पोलीस चौकांत केव्हां उभा रहातो व कां ? सकाळीं व संध्याकाळीं. कारण त्यावेळीं रहदारी जास्त असते म्हणून.<br>हें वर्णन कशाचें आहे. |
| आवृत्तिः— | प्रश्नोत्तरानें वरील माहिती काढून घेईन. वरील प्रश्न एका फळ्यावर लिहून तो फळा मुलांसमोर ठेवीन. वरील प्रश्नांचीं उत्तरें मुलांकडून पाटीवर लिहून घेईन. ज्या मुलानें चांगलें लिहिलें असेल त्याची पाटी वाचून दाखवीन व चुका सुधारीन. |

## फळ्यावरील काम

१ हें चौकाचें चित्र आहे.
२ हा शिपाई आहे.
३ याचा पोशाख खाकी रंगाचा आहे.
४ डोक्यावर खाकी रंगाचा फेटा आहे.
५ पायांत चपला आहेत. अंगांत खाकी रंगाचा शर्ट आहे.
६ याला पोलीस खात्यानें उभें केलें आहे.

७ गाड्या, मोटारी, सायकली यांची रहदारी व्यवस्थेशीर चालावी म्हणून.

८ वाटेल त्यानें वाटेल त्या बाजूनें गाड्या, मोटारी, सायकली हांकल्या असत्या व अपघात झाले असते.

९ हात दाखवून समोरच्या गाड्या उभ्या करतो व बाजूच्या गाड्या चालूं लागतात.

१० बुधवारचौक, स्वारगेटचौक, लकडीपूलचौक वगैरे.

११ सकाळीं व संध्याकाळीं. कारण त्यावेळीं रहदारी जास्त असते म्हणून.

## पाठ ९

**विषय—भाषा.** पोटविषय—**वाक्यरचना.**

इयत्ता ३ री वेळ ४० मिनिटें.

**साहित्य**—स्टेशन, आगगाडी, दुधवाला, झाडें अशा प्रसंगाचें काढलेलें चित्र. ( चित्र दाखवून ) कसला देखावा आहे ? (स्टेशनचा) कशावरून ?

**प्रस्तावना व हेतु**—या चित्रांत तुम्हांस आणखी काय दिसत आहे ? हा मनुष्य कोण असावा ? इत्यादि प्रश्नांवरून चित्रांचीं नांवें ओळखून घेणें. आज आपण ह्या चित्राविषयीं अधिक माहिती मिळवूं.

| विषय | पद्धति |
|---|---|
| **प्रतिपादन**<br>(१) स्टेशनचा देखावा | आपण या स्टेशनला नांव देऊं. कोण सांगतो ? आपण शिवाजीनगर स्टेशन हें नांव देऊं.<br>हा दूधवाला पहा कसा झरझर चालला आहे. हा कशानें दूध नेत आहे ? ( कावडीनें ) हा आतांच या गाडींतून उतरला आहे. हा दूधवाला कोठून आला असावा ? ( तळेगांव ) कोणकोणत्या गांवांहून पुण्यास दूध विकण्यास येते ? बरं हा हें दूध घेऊन कोठें जात असावा ? दररोज सकाळीं तुम्ही किती शेर दूध घेतां ? आपण दूध घेतल्यानंतर त्याचा कोणकोणत्या कामीं उपयोग करतों ? ( दहीं, चहा, कॉफ़ी, ) आणखी दुधाचा उपयोग काय ? लहान मुलांना दूध कां देतात ? ( लठ ) तुम्ही दूधवाल्याजवळून दूध घेतां. तो तुम्हांला फुकट दूध देतो का ? (नाहीं.) मग दूधवाल्यास मोबदला काय देतां ? ( पैसे. ) |

| विषय | पद्धति |
|---|---|
| (२) वाक्यें मुलांकडून वदवून घेणें | फळ्यावर टिपलेल्या शब्दावरून तोंडी वाक्यें मुलांकडून वदवून घेणें. व शब्दांचे उच्चाराकडे लक्ष पुरवून चुकीचे उच्चार दुरुस्त करून सांगणें. |
| (३) आवृत्ति | मुलांनीं उच्चारलेलीं वाक्यें क्रमानें पाटीवर लिहून घेणें. नंतर शुद्ध आहेत किंवा कसें यांचें बारकाईनें निरीक्षण करून ज्या मुलानें चांगलें लिहिलें असेल त्याची पाटी वर्गात वाचून दाखविणें. |

### फळ्यावरील काम

१ स्टेशन २ दुधवाला ३ कावड ४ तळेगांव ५ पुणें ६ एक शेर ७ दहीं ८ चहा–कॉफी ९ लठ्ठ १० पैसे.

(१) हा स्टेशनचा देखावा आहे.
(२) हा दूधवाला आहे.
(३) दूधवाला कावडीनें दूध नेत आहे.
(४) दूधवाला तळेगांवाहून आला आहे.
(५) दूधवाला पुण्यास आमच्याकडे दूध विकण्यास जात आहे.
(६) आम्हीं रोज एक शेर दूध घेतों.
(७) आम्हीं दुधाचें दहीं करतों.
(८) दूध, चहा व कॉफीमध्यें टाकतात.
(९) दुधानें लहान मुलें लठ्ठ होतात.
(१०) आपण दुधवाल्यास दुधाबद्दल पैसे देतों.

## पाठ १०

विषयः—भाषा. पोटविषयः—वाक्यरचना.

इयत्ता ३ री वेळ ४० मिनिटें

साहित्यः—बाजाराच्या चित्राचा नकाशा.

प्रस्तावना व हेतुः—आपण मंडईत जातों. कां ? ( भाजीपाला आणण्यासाठीं ). मंडईत कोणकोणत्या भाज्या येतात ? तेथील दुकानांची व्यवस्था कशी असते ? ( आळ्या पाडलेल्या असतात ) असे बाजार खेड्यांतसुद्धां भरतात. मग आज आपण खेडेगांवच्या बाजाराबद्दल माहिती मिळविण्यासाठीं जाऊं.

| विषय | पद्धति |
|---|---|
| प्रतिपादनः | |
| (१) देऊळ— | हें चित्र पहा आणि यांत काय काय दिसत आहे हें सांगा ?<br>कोणत्या देवाचें देऊळ असेल ? (मारुतीचें)<br>लोक केव्हां दर्शनास जातात ? (शनिवारीं) |
| (२) मोटार— | हीं मोटार कोठून आली असेल ? आणि बाहेर कां उभी आहे ? |
| (३) शाळा— | आज शाळा बंद असण्याचें कारण काय ? ( गांवचा बाजार आहे.) |
| (४) ओढा— | हा ओढा गांवाच्या अगदीं जवळ आहे. हा ओढा कसा वहात आहे ? |
| (५) गुरांचा बाजार— | हीं गुरें कुणाचीं असतील ? (शेतकऱ्यांचीं) कोणकोणतीं जनावरें आहेत ? ( गाई, बैल, बकरीं वगैरे ) या ठिकाणीं कशासाठीं आणलीं आहेत ? |
| (६) विहीर— | ही येथें एक विहीर आहे. या विहिरीचा काय उपयोग होतो ? |
| (७) खेळणीवाला— | हा कोण आहे ? याच्याजवळ कोणकोणतीं खेळणीं आहेत ? |
| (८) चिवडेवाला— | हा चिवडेवाला कसा ओरडतो ? |

| विषय | पद्धति |
| --- | --- |
| (९) वेस— | ही गांवची वेस आहे. या वेशींतून आपण आंत गेलों. पहा या. वेशींतून किती माणसें आंत जात आहेत. त्यांची रांगची रांगच लागली आहे. |
| (१०) कापडाचें दुकान— | हें कसलें दुकान आहे? (कापडाचें) येथें कोणकोणते कपडे विकावयास आणलेले आहेत? (कोट, शर्ट, झंपर वगैरे) |
| (११) कुंभार— | हें कसलें दुकान आहे? मडकीं कोण घडतो? (कुंभार). मडक्यांचा उपयोग काय? |
| (१२) घोंगडीवाला— | हें कसलें दुकान आहे? (घोंगड्यांचें) घोंगड्या कोण बनवितो? (धनगर) एका घोंगडीची किंमत काय असते? (पांच, सहा रुपये) |
| **नंबर लावणें—** | नंतर नंबर लावून त्याच्याबद्दल सुंदर सुंदर वाक्यें मुलांच्याकडून करून घेणें. मग या चित्राला नांव देणें. मुलांच्याकडून तोंडी वाक्यें बनवून घेणें. |
| **वाक्य लिहून घेणें—** | मुलांना पाटीवर वाक्यें लिहावयास सांगणें. |
| **आवृत्ति—** | ज्या मुलानें चांगलीं वाक्यें लिहिलेलीं असतील त्याची पाटी वर्गांत वाचून दाखविणें. |
| **गृहपाठ—** | आपण बाजारांत कोणकोणत्या वस्तु पाहिल्या त्याची यादी करून आणा? |

**फळ्यावरील काम**

(१) देऊळ
(२) खेडेगांव
(३) शाळा
(४) ओढा
(५) गुरें
(६) विहीर
(७) खेळणीवाला
(८) चिवडा
(९) वेस
(१०) कापडाचें दुकान
(११) कुंभार
(१२) घोंगडीवाला

# पाठ ११

विषयः—भाषा    पोटविषयः—वाक्यरचना

इयत्ताः—३ री    वेळ ३५ मिनिटें.

**पूर्वज्ञान**—'आंधळा भिकारी' ही कविता झालेली आहे.

**साहित्य**—आंधळ्या भिकाऱ्याचें चित्र.

**प्रस्तावना व हेतु**—आपण काल आंधळ्याची कविता शिकलों आहोंत. त्या कवितेमधील ( आंधळ्याचें चित्र दाखवून ) हा आंधळा भिकारी पाहा आणि या चित्राचें नीट निरीक्षण करा.

| विषय | पद्धति |
| --- | --- |
| **प्रतिपादनः**—<br>नवा पूल हा शब्द मुलांकडून काढून घेणें.<br>याप्रमाणें फळ्यावरील सर्व शब्द काढून घेणें | हा भिकारी आंधळा आहे. याला घर नाहीं. बायकामुलें नाहींत. मग याच्या पोटाला कोण चालणार ? तो आपलें पोट भरण्याकरितां कोठें बसलेला असतो ? ( नव्या पुलावर ) तो त्या ठिकाणीं कां बसतो ? ( लोकांची रहदारी जास्ती असते व आपणाला कोणीतरी पैसा देईल म्हणून ) आपला हा भिकारी श्रीमंत आहे का ? ( गरीब बापुडा ) हा भिकारी या पुलावर किती वेळ बसतो ? ( सकाळपासून संध्याकाळपर्यंत ) इतका वेळ तो कां बसतो ? ( दिवसभर बसल्यावर त्याला पोटापुरतें मिळतें ) हा आंधळा त्या पुलावर स्वस्थ बसलेला असतो का ? (नाहीं) तर तो तोंडानें काय म्हणत असतो ? ( देवदाता आंधळ्याला ) या आंधळ्याला एकादे दिवशीं पाऊस पडूं लागला किंवा भयंकर ऊन पडलें तर घरीं बसून चालेल काय ? ( नाहीं ) कां चालणार नाहीं ? ( त्याच्या पोटाला मिळणार नाहीं. ) मग हा आंधळा उन्हापावसांत कायम बसलेला असतो. तो आंधळा असल्यामुळें त्याला कोणकोणत्या गोष्टी एकच वाटतात ? ( रात्र आणि दिवस ) आंधळ्याला दुसरें कोणी नाहीं पण त्याची एक मैत्रीण आहे ती कोण ? |

| विषय | पद्धति |
|---|---|
| | (प्रेमळ काठी) तिला प्रेमळ असें कां म्हटलें आहे ? (ती नेहमीं त्याच्याजवळ असते व त्याला वाटेनें चालतांना उपयोगी पडते.) हा आंधळा तोंडानें 'देवदाता आंधळयाला पैसा' असें म्हणत बसतो. मग लोक त्याला काय काय देतात ? (पै-पैसा) या पै-पैशावर त्याचें पोट भरेल काय ? मग आपण त्याला कोणती मदत केली पाहिजे ? (अन्न, वस्त्र दिलें पाहिजे.) |
| मुलांकडून वाक्यें वदवून घेणें | फळयावर लिहिलेल्या शब्दांवरून मुलांकडून वाक्यें वदवून घेणें. प्रत्येक वाक्य दोन तीन मुलांकडून वदवून घेणें. |
| आवृत्तिः— | मुलांनीं उच्चारलेलीं वाक्यें पाटीवर लिहून घेणें व पाट्या तपासून चांगलीं वाक्यें लिहिलेली पाटी वर्गांत वाचून दाखविणें. |

### फळयावरील काम

| | |
|---|---|
| (१) नवा पूल | (१) आंधळा भिकारी नव्या पुलावर दररोज बसतो. |
| (२) गरीब बापुडा | (२) आंधळा भिकारी गरीब बापुडा आहे. |
| (३) सकाळ—संध्याकाळ | (३) तो सकाळपासून—संध्याकाळपर्यंत नव्या पुलावर बसतो. |
| (४) देवदाता-आंधळयाला पैसा | (४) तो तोंडानें देवदाता, आंधळयाला पैसा असें म्हणत असतो. |
| (५) ऊन—पाऊस | (५) तो उन्हा-पावसांत बसलेला असतो. |
| (६) रात्र—दिवस | (६) त्याला रात्र आणि दिवस सारखीच वाटतात |
| (७) प्रेमळ काठी | (७) प्रेमळ काठी ती त्याची मैत्रीण आहे. |
| (८) पै—पैसा | (८) लोक त्याला पै-पैसा देत असतात. |
| (९) अन्न—वस्त्र | (९) आपण त्याला अन्न, वस्त्र द्यावें. |

## पाठ १२

विषय—भाषा पोटविषय—व्याकरण–क्रियापदें

इयत्ता २ री वेळ ४० मिनिटें

**पूर्वज्ञान**—मुलांना वस्तूंचीं व प्राण्यांचीं नांवें माहित आहेत.

**साहित्य**—लिहिलेला फळा.

**प्रस्तावना व हेतु**—उंट आणि उंदीर ही गोष्ट मुलांकडून थोडक्यांत सांगून घेणें. लिहून आणलेला प्यारीग्राफ मुलांना दाखवून प्राणीवाचक व वस्तु-वाचक शब्द काढून घेणें.

| विषय | पद्धति |
|---|---|
| १ प्राण्यांचीं व वस्तूंचीं नांवें काढून घेणें व फळयावर लिहिणें. | ह्यांत प्राण्यांचीं नांवें कोणतीं आहेत? ( उंदीर, उंट )<br>वस्तूंचीं नांवें कोणतीं आहेत (शरीर, मान, वाट, नदी इ. )<br>पहिलें वाक्य वाचून दाखवून—<br>पहाणारा कोण ? ( उंदीर )<br>उंदरानें कोणतें काम केलें ? ( पहा-ण्याचें काम ) |
| ( २ ) कामाचें नांव दाखविणारे शब्द काढून घेऊन फळयावर लिहिणें व त्यावरून ह्या शब्दांना क्रियापदें म्हणतात हें मुलांना पटवून देणें.<br><br>**प्यारीग्राफ–उतारा**<br>एका लहान उंदरानें एक ओबड-धोबड उंट पाहिला. उंटाचें विचित्र शरीर पाहून तो चिमुकला उंदीर हंसला. उंटानें आपली मान खालीं वाकविली. त्याच्यापुढें पिटुकला उंदीर उभा होता. पुढें ते दोघे अरुंद वाटेनें चालले. त्यांना एक नदी भेटली. नदीचें खोल पाणी पाहून उंदीर भ्याला. | दुसऱ्या वाक्यांत——उंदरानें कोणतें काम केलें ? अशा तऱ्हेनें सर्व वाक्यां-तील कामांचीं नांवें दाखविणारे शब्द काढून घेणें व फळयावर लिहिणें.<br>पाहिला, हसला, वाकविली, उभा होता, चालले, भ्याला ह्या शब्दांवरून काय समजलें ? (कामाचें नांव समजलें) कामाचें नांव समजणाऱ्या शब्दांना व्याकरणांत एक नांव आहे, व त्याला क्रियापद असें म्हणतात.<br>येथें कोणतीं क्रियापदें आहेत ? क्रियापदाची व्याख्या मुलांकडून वद-वून घेणें. |

| विषय | पद्धति |
|---|---|
| ( ३ ) आवृत्ती—<br>वाक्यें पुरीं करा—<br>( १ ) रावणानें सीतेला चोरून ...<br>( २ ) तिचा शोध करण्यास मारुतीस रामानें ......<br>( ३ ) मारुती सीतेचा शोध करीत करीत लंकेंत ......<br>( ४ ) रावणानें मारुतीला ......<br>( ५ ) मारुतीच्या शेंपटीस राक्षसांनीं आग ......<br>( ४ ) गृहपाठ—धडा २२ वरून देणें. | प्यारिग्राफमधील गाळलेला भाग मुलांकडून प्रश्न विचारून पुरा करणें.<br><br>नंतर—आणखी कामाचीं नांवें दाखविणारे शब्द सांगा ?<br>—या धड्यांतील १० क्रियापदें लिहून आणा. |

## फळ्यावरील काम

| प्राण्याचें नांव दाखविणारा शब्द | वस्तूचें नांव दाखविणारा शब्द | कामाचें नांव दाखविणारा शब्द |
|---|---|---|
| १ उंदीर<br>२ उंट | १ शरीर<br>२ मान<br>३ वाट<br>४ नदी<br>५ पाणी | १ पाहिला ( पाहाणें )<br>२ हसला ( हसणें )<br>३ वाकविली ( वाकविणें )<br>४ उभा होता ( उभे असणें )<br>५ चाललें ( चालणें )<br>ह्यालाच 'क्रियापदें' म्हणतात. |

# पाठ १३

**विषय:—व्याकरण पोटविषय:—विशेषणें**

**इयत्ता ३ री** **वेळ ३० मिनिटें**

**पूर्वज्ञान:**—मुलांनो क्रियापदें व नामें ओळखतां येतात.

**साहित्य:**—विशेषणयुक्त अशी गोष्ट फळ्यावर लिहिली होती.

**प्रस्तावना व हेतु:**—मुलांनो, तुम्हांला नामें व क्रियापदें ओळखतां येतात कां ? मग पुढील वाक्यांतील नामें व क्रियापदें ओळखा:—रामा पडला, पुस्तक फाटलें, पाटी फुटली.

**हेतुकथन:**—अशा दुसऱ्या एका शब्दांच्या जाती ओळखण्यास शिकूं या.

| विषय | पद्धति |
|---|---|
| **प्रतिपादन:**— गोष्ट सांगणें | मुलांनो, तुम्हांस मी एक गोष्ट सांगतों. ती ऐका.<br>अशोक नांवाचा एक हुषार मुलगा होता. त्याचा एक तांबडा आणि चपळ घोडा होता. अशोक दररोज सकाळीं निळी विजार, पांढरा सदरा, काळी टोपी घालून घोड्यावर बसून गांवाबाहेर जाई. तेथें त्यास हिरवींगार शेतें आणि मोठे डोंगर व उंच झाडें दिसत. त्या ठिकाणीं तो आपला घोडा चारण्यास सोडून देई व तो लहान प्राण्याची शिकार करण्यास रानांत निघून जाई. |
| **विवेचन:**— प्रश्नपद्धति | अशोक कसा होता ? घोडा कसा आहे ? विजार कोणत्या रंगाची आहे ? सदऱ्याचा रंग कोणता आहे ? टोपी कशा रंगाची आहे ? शेतें कशीं दिसलीं ?<br>यावरून आपणांस काय दिसून आलें ? ( वस्तूंच्या ठिकाणचा गुण ) |

| विषय | पद्धति |
|---|---|
| मुलांच्या साह्यानें तयार केलेली व्याख्या | नामाचे गुणधर्म वर्णन करणारा जो शब्द त्यास विशेषण म्हणतात. |
| आवृत्तिः– | खालील नामें व विशेषणें यांच्या जोडया लावा.<br>कागद, टेबल, शाई, आंबा, सूर्य, आई, लाकडी, पिकलेला, मायाळू, पांढरा, तांबडी, तेजस्वी. |
| गृहपाठः | तुम्ही घरून खालील नामांना योग्य विशेषणें लिहून आणा.<br>कुत्रा, घोडा, गाय, बहिण, घर, फूल, सदरा, कोट, विजार. |

फळ्यावरील काम

| कसा | नाम |
|---|---|
| हुषार | अशोक |
| चपळ | घोडा |
| हिरवीगार | शेतें |

जोडया

| | |
|---|---|
| पांढरा | — कागद |
| लाकडी | — टेबल |
| पिकलेला | — आंबा |
| मायाळू | — आई |
| तेजस्वी | — सूर्य |
| तांबडी | — शाई |

## पाठ १४

विषय—भाषा पोटविषय—( गोष्ट ) बाळ घेता कां बाळ

इयत्ता बालवर्ग वेळ ३० मिनिटें

**पुर्वज्ञान**—कांहीं कांहीं सुंदर गोष्टी येतात.

**साहित्यः**—अनुकूल अशीं प्रसंगानुरूप निरनिराळीं चित्रें.

**प्रस्तावनाः**—तुम्ही ब-याच सुंदर सुंदर गोष्टी शिकलां आहांत. कोण-कोणत्या गोष्टी येतात ? आणखी कोणत्या येतात ?

**हेतुकथनः**—आज देखील तुम्हांला मी एक छानदार गोष्ट सांगणार आहें.

| विषय | पद्धति |
|---|---|
| **प्रतिपादनः**—१ बाळ घेतां कां बाळ अशी ताई म्हणते. | [बंगल्याकडे बोट करून] हें काय आहे ? हा बंगला किती सुंदर आहे. बंगल्यावर एक मोठी गच्ची, एक लहान गच्ची पण आहे. गच्चीवर चांदण्यांत बसल्यावर किती गंमत वाटते. या बंगल्यासमोर काय आहे ? बाग पण किती छानदार आहे. बागेंत लहान लहान झाडें आहेत. गवत पण उगवलें आहे. अशा या सुंदर बंगल्यांत आपल्या ताई रहातात. [चित्र दाखवून] ताईच्या हातांत कोण आहे ? ताई या बाळाला घेऊन रोज बागेंत गाणें म्हणत बसे. आज पण ती गाणें म्हणते,<br>बाळ घेता कां बाळ ।<br>माझं गोरं, गोरं बाळ ।<br>माझं छान छान बाळ ।<br>[ शिक्षकांनीं एक एक ओळ म्हणणें व मुलांना पाठीमागून म्हणावयास लावणें ] कोणतें गाणें ताई म्हणत होती ? ताईचें गाणें एका चिऊनें ऐकलें व चिऊ तेथें आली. [ तिच्याबरोबर तिचें बाळ दाखवून ] |
| २ चिऊ येते. तिच्याबरोबर तिचें बाळ येतें. व चिऊ ताईचें बाळ नको म्हणते. | चिऊबरोबर कोण आलंय ? चिऊनें कोणतं गाणं ऐकलं होतं ? मग चिऊनें ताईच्या बाळाकडे पाहिलें. आणि म्हणाली,<br>अहारे बाळ । माझ्या बाळाला मऊ, मऊ पिसं आहेत. तुझ्या बाळाला कुठंय मऊ मऊ पिसं ? |

| विषय | पद्धति |
| --- | --- |
| | माझं बाळ चिव, चिव करतं. तुझं बाळ कुठय चिव, चिव करतं? माझं बाळ भुर्रकन उडतं. तुझं बाळ कुठय भुर्रकन उडतं? मला नको बाई तुझं बाळ. माझं बाळ किती छान आहे. चिऊ बाळाला घेऊन भुर्रकन उडून गेली. |
| ३ पोपट येतो. त्याच्याबरोबर त्याचें बाळ येतें. पोपट ताईचें बाळ नको म्हणतो. | ताई परत गाणें म्हणूं लागली. [शिक्षकांनीं दुसरें बाळ हातांत घेऊन गाणें म्हणणें.]<br>बाळ घेता कां बाळ।<br>माझं गोरं गोरं बाळ।<br>माझं छान छान बाळ।<br>हें ताईचें गाणं आणखी कोणीतरी ऐकलं व ताईकडे आला. [पोपट व त्याचें बाळ दाखवून] कोण आलंय? त्याच्याबरोबर कोण आहे? पोपटानें ताईच्या बाळाकडे पाहिलें. आणि म्हणाला, अहारे बाळ। माझ्या बाळाची लाल लाल चोंच. तुझ्या बाळाची कुठंय लाल चोंच? माझ्या बाळाचा रंग कसा हिरवा. तुझ्या बाळाचा रंग कुठंय हिरवा? माझं बाळ मिरची खातं. तुझं बाळ कुठंय मिरची खातं?<br>मला नको तुझं बाळ. माझं किती छान आहे. मग पोपट उडून गेला. त्याचें बाळ पण गेलें. |
| ४ गाय येते. तिच्याबरोबर तिचें बाळ येतें. गाय ताईचें बाळ नको म्हणते. | ताई परत गाणें म्हणूं लागली. कोणतं गाणं म्हणाली? [शिक्षकांनीं दुसरें बाळ घेऊन परत गाणें म्हणणें]<br>बाळ घेतां कां बाळ।<br>माझं गोरं गोरं बाळ।<br>माझं छान छान बाळ। |

| विषय | पद्धति |
| --- | --- |
| | ताईचें गाणं आणखी कोणीतरी ऐकलं. व ताईकडे आली. [ गाय व तिचें बाळ दाखवून ] कोण आलंय ? तिच्याबरोबर कोण आलंय ? गाईनें ताईच्या बाळाकडे पाहिलें आणि म्हणाली, अहारे बाळ।<br>माझ्या बाळाला चार पाय. तुझ्या बाळाला दोनच पाय ? माझ्या बाळाला शेपटी आहे. तुझ्या बाळाला कुठंय शेपटी ?<br>माझं बाळ चारा खातं. तुझं बाळ कुठं चारा खातं ?<br>मला नको बाई तुझं बाळ. माझं किती छान आहे. मग गाय निघून गेली. तिचं बाळहि गेलें.<br>बाळाला न्यायला अगोदर कोण आलं होतं ? मग कोण आलं होतं ? पोपट कां नको म्हणाला ? मग कोण आलं ? बाळाला वाटलं खरंच आपणाला नेतील. म्हणून तें भ्यालें व लागलें रडायाला.मग ताई म्हणाली. काय झालंय रडायाला ? भीति वाटली हो ? मी माझा बाळ चिऊला देणार नाहीं. पोपटाला देणार नाहीं. गाईला देणार नाहीं. मी माझं बाळ कोणाला देखील मुळींच देणार नाहीं. मग बाळ रडायचं राहिलं. ताईनें बाळाचा मुका घेतला. बाळ हसलं. मग ताई बाळाला घेऊन गेली. |
| आवृत्तिः— | मुलांना गोष्ट सांगण्यास मदत करणें. |
| गृहपाठः— | घरीं गोष्ट सांगा बरं का. |

## पाठ १५

विषयः—भाषा. पोटविषयः— पद्य [ पितृस्मृति ]

इयत्ता ७ वी. वेळ ३५ मिनिटें.

**पूर्वज्ञानः**—महाराष्ट्रांतील कांहीं कवींची माहिती आहे.

**साहित्यः**—गिरीश कवींचा फोटो.

**प्रस्तावना व हेतुः**—महाराष्ट्रांत कोणते कवि आहेत ? गिरीश कवि एका कोजागिरी पौर्णिमेला आपल्या घराकडे जावयास निघाले. त्यावेळीं त्यांना बालपणची आठवण होऊन डोळ्यांतून अश्रु आले. ती कविता आज आपण शिकूं.

| विषय | पद्धति |
|---|---|
| **हेतुप्रश्न**— | कवि गिरीश यांना कोणाची आठवण झाली, हें शोधून काढा. |
| **शिक्षकाचें गायन** | कविता म्हणून दाखविणें.<br>हेतुप्रश्नाचें उत्तर काढून घेणें. |
| ( १ ) पुण्यपुरीहून गांवाकडे जातांना भयाणता पसरलेली पाहिली. आकाशांत पौर्णिमेचा चंद्र माथ्यावर आलेला होता. | कवि पुण्यास कशाकरितां राहात होते ? पुण्यास याला कोणता शब्द दिलेला आहे ? पुण्यपुरीहून गांवाकडे जातांना वेळ कोणती असावी ? रात्रीची वेळ कशावरून समजावी? जिकडे तिकडे शांतता होती. त्याला भीति वाटूं लागली. भयाणता वाटत असतांना तो तसाच रस्त्यानें चालूं लागला. आकाशांत त्याला काय दिसलें ? त्यावेळीं चंद्र कोठें दिसला. चंद्राबद्दल कवितेंत कोणता शब्द आहे ? |
| ( २ ) कोजागरी पौर्णिमा असल्यामुळें तारे अस्पष्ट दिसत होते. गांवाजवळ कवि येऊन थांबला. | तो दिवस कोणता होता ? कोजागरी पौर्णिमा कधीं येते ? त्या रात्रीला काय मजा करितात? अस्पष्ट हें कोणत्या शब्दांत सांगितलेलें आहे ? कवि गांवाजवळ येऊन थांबला. गांवापर्यंत येतांना त्याला काय दिसलें ? |

| विषय | पद्धति |
| --- | --- |
| (३) त्याचें चित्त अस्थिर झालें—जोरदार विचारांच्या लाटा उसळूं लागल्या. | गांवाकडे पाहून त्याचें मन कसें झालें ? कां ? असे एकामागून एक जोराचे विचार येऊं लागले. जोराचे विचार याला कोणते शब्द आहेत ? समुद्राला लाटा येतांना आपण पहातों त्याप्रमाणें पुनःपुनः विचार थैमान घालूं लागले. |
| (४) पूर्वीच्यां वैभवाची आठवण होऊन तें उजाड झालें. बालपणांतलीं चित्रें नजरेपुढून सरकूं लागून मन भरून आलें. | विचार करतांना त्याला लहानपणीं पाहिलेल्या वैभवाची आठवण होऊं लागली. वैभव याला शब्द काय आहे ? तें वैभव कोणतें असावें ? तें यावेळीं त्याला कसें भासलें ? कां बालपणांतील कोणतीं चित्रें दिसलीं ? या आठवणीनें कोणता परिणाम झाला ? मन भरून आलें हें कोणत्या शब्दांत सांगितलेलें आहे ? अशा रीतीनें तो रस्त्यानें चालत आहे. |
| (५) सगेसोयरे आनंदांत मग्न झालेले आहेत, हें पाहून त्याच्या जवळचे कोणी नसल्यामुळें अत्यंत वाईट वाटलें. | गांवांतून चालतांना त्याला काय दिसलें ? जिकडे तिकडे आनंदी आनंद त्या वेळेला दिसला. तो मात्र कष्टी होता. त्याला दुःखी असण्याचें कोणतें कारण होतें ? |
| (६) समोरच स्वतःचें पडकें घर पाहून जणूं काय तें भुतांचें घर आहे असें वाटलें. | दुःखांत असतांना समोरच त्याला काय दिसलें ? भिंती कशा दिसल्या ? घराला ओसाड असें कां म्हटलें आहे ? त्याच घरांतील अभ्यासाची खोली, जेवावयाची जागा इतर गोष्टींची त्याला आठवण झाली. भूतांच्या घराप्रमाणें त्याला तें घर दिसलें ? भूतांचीं घरें कोठें असतात ? त्याचें घर फक्त भूतांचें वाटलें, बाकीचीं घरें कशीं दिसलीं ? त्याचें घर अगदीं शून्य वाटलें. |
| (७) बाळया (कवि) गांवाहून परत आला कीं, आईच्या डोळ्यांतून आनंदाश्रु निघत आणि माझें कौतुक करीत असे. | सुटींत कवि घरीं जात असे. त्यावेळीं त्याचा आवाज ओळखल्यावर आई धांवत येई. कां ? कडी काढून त्याला आंत घेतल्यावर आंगावरून हात फिरवी. आणि ताब- |

| विषय | पद्धति |
| --- | --- |
| | डतोब तिच्या डोळयांतून अश्रु येत. ते अश्रु कोणते ? अत्यंत आनंद झाला म्हणजे डोळयांतून अश्रु येतात. त्याचें कौतुक इतरांना काय सांगत असे ? आईची आठवण म्हणून पितृस्मृति असें नांव कवितेला दिलेलें. |
| मुलांनीं कविता म्हणणें. | मुलांकडून कविता म्हणून घेणें. |
| आवृत्ति— | कवि कोणत्या दिवशीं गांवाकडे गेला होता ? त्याचें चित्त स्थिर कां नव्हतें ? बालपणचें कोणतें वैभव आठवलें ? त्याचें घर कसें दिसलें ? आई कोणतें कौतुक करीत असे ? |
| गृहपाठ— | कोजागरी पौर्णिमेच्या रात्रींचें वर्णन. लिहून आणा. |

फळयावरील काम

| | |
| --- | --- |
| पुण्यपुरी | पुण्यपुरी |
| अस्फुट | चंद्रमा |
| वेगांत लाटा | अस्फुट |
| भारावलों अंतरीं | विभवें |
| वत्सलपणें | भारावलों |

## पाठ १६

इयत्ता ६ वी — वेळ ३५ मिनिटें

विषय—मराठी—गद्य — पोटविषय—मन्वंतर वाचनमाला

धडा १२ वा [ कृष्णेचीं संस्मरणें ]

**पूर्वज्ञान**—हिंदुस्थानांतील नद्यांविषयीं मुलांना माहिती आहे.

**साहित्य**—महाराष्ट्राचा नकाशा.

**प्रस्तावना**—आपल्या हिंदुस्थानांतील मुख्य धंदा कोणता ? ( शेती ) शेतींसाठी कोणकोणत्या गोष्टींची जरूरी आहे ? शेतीला पाणी कोणापासून मिळतें ? [ पाऊस, विहिरी व नद्या. ] आचार्य कालेलकर यांनीं या नद्यांना लोकमाता म्हटलें आहे.कां ? आचार्य कालेलकर यांचेबद्दल थोडी माहिती सांगणें.

**हेतुकथन**—हिंदुस्थानांत मुख्य नद्या कोणकोणत्या आहेत ? महाराष्ट्रांत मुख्य नद्या कोणकोणत्या आहेत ? त्यांपैकीं कृष्णा ही एक लोकमाता आहे. तिचें वर्णन आचार्य कालेलकर यांनीं केलेलें आहे. त्याबद्दल आज आपण माहिती मिळवूं.

| विषय | पद्धति |
| --- | --- |
| **प्रतिपादन**— | हा आपला महाराष्ट्र व सह्याद्रि. महाबळेश्वरापासून पांच नद्या उगम पावल्या आहेत. कोणकोणत्या ? [ कृष्णा, वेण्या, कोयना, गायित्री व सावित्री ] |
| **हेतुप्रश्न**— | माहुलीला गेल्यावर आचार्य कालेलकर यांना कोणकोणत्या गोष्टी पाहावयास मिळाल्या ? तें शोधून काढा. |
| **१ मुलांचें मनांतील वाचन**:— | धड्यांतील भाग मुलांना वाचावयास सांगणें व नंतर हेतुप्रश्नाचें उत्तर काढून घेणें. |
| **२ आचार्य कालेलकरांची माहुलीस सफर**— | एकादशीच्या दिवशीं आचार्य कालेलकर गाडींत बसून माहुलीस जाण्यास निघाले. जातां जातां वाटेंत त्यांना कोणकोणत्या गोष्टी पहावयास मिळाल्या ? त्याच दिवशीं आणखी कांहीं लोक माहुलीस चालले होते. हे सर्व लोक आज तिकडेच कां चालले होते ? [ एकादशी ] |
| **३ नदीवर**— | नदीकांठीं गेल्यावर त्यांना कोणकोणत्या गोष्टी पहावयास मिळाल्या ? [सांखळी,गोटे] लोखंडाची सांखळी उंचावर ताणून कां बांधली असावी ? [ होड्या वाहून जाऊं नयेत. ] |

| विषय | पद्धति |
| --- | --- |
| | आचार्य कालेलकरांच्या दृष्टीला ही बांधलेली होडी भव्य वाटत होती. कां ? [ ते लहान होते ] कशावरून ? तेथें कोणता शब्द आहे ? [ बालदृष्टि ] कृष्णानदीच्या पाण्यांत त्यांना कसले दगड दिसले ? कांहीं गोटे गुळगुळीत होते. कां ? ते गार कां लागत होते ? त्यांनीं एक दगड हातांत घेतला नाहीं तर त्यांची दृष्टि दुसऱ्यावर जाई. कोणता गोटा घ्यावा हें त्यांना सुचेना ? [ सुंदर सुंदर दगड होते ] आणखी कोणत्या प्रकारचे गोटे होते ? |
| ४ जलविहार— | कृष्णाबाईनें मला प्रथम ओळखिलें असें आचार्य कालेलकर कां म्हणाले ? [ मूल व आई यांचें उदाहरण देईन. ] कृष्णानदींत ते कोणकोणते खेळ खेळले ?<br>या सर्वांना तेथें एक शब्द दिला आहे तो कोणता ? [ जलविहार ] आतां वेळही बराच झाला होता. ते दमले होते. त्यामुळें त्यांना कडकडून भूक लागली होती. त्यांनीं न्याहारी केली. कशाची ? शेंगदाणेच कां खाल्ले ? तो पहिलाच स्वाद होता असें ते कां म्हणाले ? त्यावेळीं तेथें भीक मागण्यास कोण आले होते ? [वासुदेव] त्याची टोपी कशी होती ? नंतर देवळांत थोडा वेळ विश्रांति घेऊन ते परतले. |
| ५ संगमावर— | महाबळेश्वरापासून सातान्यापर्यंत कृष्णानदी अगदीं धावत येते. कां ? ( उतार ) माहुलीचें माहात्म्य कशामुळें वाढलें आहे ? ( संगम ) कृष्णेला माहुलीजवळ कोणती |

| विषय | पद्धति |
|---|---|
| | नदी मिळते ? या दोन नद्यांना कोणाची उपमा दिली आहे ? संगमाबद्दल थोडें विवेचन करणें. या दोन नद्यांना बहिणी बहिणी म्हटलें तर चालेल कां ? कां ? आचार्य कालेलकर म्हणतात कीं या संगमाची आठवण पसतीस वर्षें माझ्या हृदयांत उमटली आहे. असें कां म्हणतात ? ( सुंदर दृश्य ) कृष्णानदी म्हटली कीं त्यांना या गोष्टीची आठवण होते. म्हणून त्यांनीं धड्याला नांवही तसेंच दिलें आहे. कोणतें ? (कृष्णेचीं संस्मरणें ) |
| ६ शिक्षकाचें वाचन— | शिक्षकानें नमुन्यादाखल वाचून दाखविणें. |
| ७ मुलांचें वाचन— | मुलांच्याकडून थोडा थोडा भाग वाचून घेणें. |
| ८ आवृत्ति— | माहुलीला माहात्म्य कशामुळें आलें आहे ? कृष्णानदींत त्यांनीं जलविहार कसा केला ? नदीकाठीं गेल्यावर त्यांना कोणकोणत्या गोष्टी पाहावयास मिळाल्या ? कृष्णेला लोकमाता कां म्हणतात ? |
| ९ गृहपाठ— | आचार्य कालेलकरांनीं कृष्णेच्या पहिल्या दर्शनाबद्दल घरीं पत्र पाठविलें असें समजून त्यांत काय काय लिहिलें असेल तें थोडक्यांत लिहून आणा ? |

### कृष्णेचीं संस्मरणें.

| | |
|---|---|
| दृश्य | १ कृष्णा |
| लोकमाता | २ वेण्या |
| बालदृष्टि | ३ कोयना |
| जलविहार | ४ गायत्री |
| माहात्म्य | ५ सावित्री |

REFBK-0006555

REFBK-0006555



०   ——आमचें प्रकाशन

१ मुंबई ते कलकत्ता ( शिल्लक नाहीं ) ...
२ प्रसाद ( शिल्लक नाहीं ) ...
३ मराठमोळा ( शिल्लक नाहीं ) ...
४ गुंतागुंत ( शिल्लक नाहीं ) ...
५ अधःपात आणि इतर गोष्टी ...
६ प्रौढांचें शिक्षण व साक्षरता प्रसार ( शिल्लक नाहीं )
७ जुईच्या कळया ( पुनर्मुद्रण ) ...
८ टॉलस्टॉयच्या आठ गोष्टी ( पुनर्मुद्रण ) शिल्लक नाहीं
९ माझ्या आठवणी व अनुभव ( पूर्वार्ध ) ...
१० गेल्ीं पंचवीस अधिवेशनें ...
११ कुंदकळया ...
१२ जासवंदीचीं फुलें ...
१३ सुरवात ...
१४ खरी दिवाळी ...
१५ सिंधच्या नवलकथा ...
१६ शेक्सपिअरच्या नाट्यकथा ...
१७ संतकवि तुकाराम ...
१८ भजनसार ( शिल्लक नाहीं ) ...
१९ माझी शाळा ( शिल्लक नाहीं ) ...
२० अध्यापनाचा परिचय ...
२१ शाळा कशी चालवावी ...
२२ शिक्षणविषयक लेखसंग्रह ( शिल्लक नाहीं ) ...
२३ मराठी भाषा कशी शिकवावी ? ...
24 History of English Literature (Guide)
२५ शिक्षक मासिक ( वार्षिक वर्गणी २ रुपये ) ...
२६ भगिनी मासिक ( वार्षिक वर्गणी २ रुपये ) ...

जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणें.

१२४८ शुक्रवार पेठ, पुणें शहर.